
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


महाराष्ट्र साहित्य परिषद
~ ग्रंथालय ~
ग्रंथकार महाराष्ट्र साहित्य पत्रिका
ग्रंथनाम जानेवारी ते डिसेंबर २०१०
दाखल अंक अंक ३३२ ते ३३५

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३३४/जुलै ते सप्टेंबर २०१०



नारायण सुर्वे

श्रम आणि सत्य । सौंदर्याची गाथा । सारे झूट मिथ्या । याच लोकि

अनुक्रमणिका



यूनियन रीच
यूनियन बैंक ऑफ इंडिया
अच्छे लोग, अच्छा बैंक
हमारे यहाँ आपका स्वागत है
साथ ही, हम आपके समय की भी क़दर करते है.
समय एवं मेहनत की बचत करें
संपर्क करें 1800 22 22 44 पर
और बैंकिंग सेवाएँ एवं अन्य जानकारी पायें.
24x7x365.
सेवाएँ
चेक बुक जारी करना
चेक भुगतान रोकना
नया पिन जारी करना
डेबिट / क्रेडिट कार्ड हॉट लिस्टिंग
इंटरनेट बैंकिंग खाता लॉकआउट
एस एम एस बैंकिंग के लिये रजिस्ट्रेशन
जानकारी
खाता शेष
आरटीजीएस / एनइएफटी / इसीएस निधि अंतरण स्थिति
क्रेडिट कार्ड लेनदेन अस्वीकार
डीमैट खाते की स्थिति
जारी चैक की स्थिति
बैंक उत्पाद की जानकारी
आइवीआरएस
पिन / टीपिन का निर्माण
निधि अंतरण (स्वयं का खाता)
खाता शेष
खातों का विवरण
चेक भुगतान रोकना
पिछले पाँच लेनदेन
तथा और भी सेवाएँ...
www.unionbankofindia.co.in

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

□ अंक क्र. ३३४ : जुलै ते सप्टेंबर २०१०

प्रकाशक :
डॉ. माधवी वैद्य
प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष - ०२०-२४४७५९६३

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

१) संपादकीय - विरूपिकेचे सौंदर्यशास्त्र ! / डॉ. सु. प्र. कुलकर्णी / ३
२) एका 'धवलगिरी'ची परिक्रमा... / डॉ. कल्याणी दिवेकर / ९
३) प्रस्तावनांची प्रस्तावना / डॉ. यू. म. पठाण / ११
४) मुस्लिम मराठी आत्मकथनाचे स्वरूप / शीतल चंद्रकांत जाधव / १४
५) एकनाथांचा कृष्ण / शीला निपुणगे / १९
६) देवनागरी लिपीत अक्षरक्रम (किंवा अक्षरावली) देण्याची एक पद्धत / शरद कृष्णाजी बोडस / २२
७) ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर ह्यांच्या जन्मशताब्दी निमित्त अभिवादन ! / डॉ. श्रीकांत केळकर / २४
८) अगस्त्य (पौराणिक कादंबरी) - डॉ. अनिल नागेश सहस्रबुद्धे / अंजली पटवर्धन / २७
९) दत्ता हलसगीकरांच्या कवितेचे यथामूल संपादन 'प्रतिबिंब' - लीला दीक्षित (पुस्तक परिचय) / सीमा होसूरकर / ३१
१०) बोली : समाज, साहित्य आणि संस्कृती-डॉ. कैलास सार्वेकर (पुस्तक परिचय) / डॉ. मनोहर जाधव / ३४
११) भावनांच्या आंदोलनांचा प्रवास 'मंज़िल-ए-मक्सूद पाकिस्तान' (पुस्तक परिचय) / दीपाली कात्रे / ३६
१२) भव्यतेचं परिमाण लाभलेल्या प्रदीर्घ प्रेमकहाणीचा प्रभावी अनु. : 'गॉन विथ द विंड' / माधव कर्वे / ३८
१३) एका ग्रंथाची जन्मकथा / प्रा. अरुण ब. मैड / ४१
१४) स्त्रियांची शतपत्रे (इ. स. १८५० ते १९५०) डॉ. स्वाती कर्वे / अनिल बळेल / ४३
१५) निवडक नवे... / स्वाती महाळंक, प्रा. मिलिंद जोशी / ४६
१६) म. सा. परिषद परीक्षा विभागाचा मार्गदर्शन मेळावा (कार्यवृत्त) / डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी / ५१
१७) कार्यवृत्त / डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह / ५४

मुद्रक-प्रकाशक
डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०.

अक्षरजुळणी
मेघा ग्राफिक सर्व्हिसेस,
स.नं. १४/२३/४, घर नं. १५९८,
मोती बेकरीमागे, धायरी, पुणे - ४११ ०४१

मुद्रणस्थळ
जंगम ऑफसेट प्रा. लि., २५/१० नांदेड फाटा,
सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०४१

किंमत १५/- रुपये

प्रकाशन : सप्टेंबर, २०१०

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक आणि संपादन-समिती, सल्लागार मंडळ अथवा प्रकाशक सहमत असतीलच, असे नाही.

संपादकीय

विरूपिकेचे सौंदर्यशास्त्र !

डॉ. सु. प्र. कुलकर्णी

'विंदा' करंदीकरांची 'विरूपिका' नारायण सुर्वेंच्या कवितेत आपले दुःख बोलू लागते. जीवन सुंदर आहे. चंद्रचांदण्यांचे, तरुण-तरुणींच्या सलज्ज कुजबुजीचे, हिरव्या हिरव्या गार गालिच्यांचे, फुलराणीचे, पक्षांच्या किलबिलाटाचे आणि आनंदीआनंदाचे आहे. तसे ते, अमावास्येच्या काळरात्रीचे, दैन्यदारिद्र्याने ग्रासलेले, नाले-गटारांचे, अन्यायाचे, शोषणाचे, बेवारशी फूटपाथवरचे आणि जिवंतपणी नरकयातना भोगावयास लावणारेही आहे. 'विंदां'नी विरूपिकेचे दर्शन दिले. निर्बुद्ध अन्याय सहन करणाऱ्यांचे, पिळवणुकीवर जगणारे भांडवलदार, सरंजामशहा, धर्मगुरू... इत्यादींच्या गुलामगिरीत जगणारी जीवन्मृत जनता दगडांचे अमरत्व घेऊन जगते. 'नाही रे उजाडत' म्हणून झोपलेला, कोडगे जीवन जगणारा समाज पेटून उठत नाही. कोयत्याच्या फटक्याने दोन वाघांना मारणारा धुळ्या धनगर पंचवीस रुपयांच्या कर्जापायी सावकाराचे पाय चाटतो. असा रूढिग्रस्त-स्थितिशील समाज... 'ती जनता अमर आहे' म्हणून 'विंदा' त्यांचा उपहास करतात. जीवनाचा कोडगा आनंद 'माझ्या मना बन दगड... हस रगड !' म्हणून घ्यायचा ! युगे न् युगे माणसाची पिळवणूक 'एका दांताकडून दुसऱ्या दांताकडे' चालूच आहे. असे असले तरी 'विंदां'ची विरूपिका नारायण सुर्वेंच्या कवितेत आक्रमक भाषा बोलू लागली.

'रक्ता रक्तातिल । कोसळोत भिंती ॥

मानवाचे अंती । एक गोत्र ।' ह्याच मानवतेच्या भूमिकेतून विरूपिकेचे सभासद एक झाले ! हा मानवतेचा संदेश घेऊन, हातात कामगारांच्या एकजुटीची तलवार घेऊन परिस्थितीशी झुंज देण्यास सिद्ध झाले.

'एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे

सावध असा, तुफानांची हीच सुरुवात आहे ।' असा इशारा देत 'कामगार आहे मी, तळपती तलवार आहे' ह्या आक्रमक रूपात तो प्रकटला. हक्कासाठी !

जीवनाची कुरूपता, अभावग्रस्तता आणि कष्टमय अंधार पाहून प्रकाशाचा स्वामी सूर्यही... रक्ताळलेली पश्चिम दिशा पाहून घावरा झाला... ऐन रणातुन त्याने माघार घेतली ! अंधारात...!

रक्तात भिजली पश्चिम । भानु होई घावरा ॥

अगा जरा धावुन कोणी । रथ त्याचा आवरा ॥

जीवनाची रक्तरंजित कुरूपता पाहून सूर्याचा रथही डळमळीत झाला. प्रकाश अंधाराला भ्याला ! त्याला कुणी सावरायचे ? कुरूपता, अभावग्रस्तता दूर करण्यासाठी कुणी यावे ? ती पचविणाऱ्यांनी !

'...असेल हिंमत लढणारांची- आणि सुळावर चढणारांची ।

निर्भय निधड्या छातीवरती- जुलूम रगडित जाणाऱ्यांची । त्यांनी यावे ॥'

अन्यायाविरूद्धच्या लढाईत भलेभले थकले. ते 'काळोखाचे कैदी' झाले. काही वेळा लाचार तडजोडींचे विचारही मनात आले. कवितेऐवजी रद्दी विकली असती तर देणेकऱ्यांचे तगादे तरी चुकवता आले असते... कदाचित् इमलेही बांधले असते. ''लोकसेवक'' बनून अडलेल्यांचे सलाम घेतले असते. 'फियाट'च्या मऊ गादीत बसून वाऱ्यालाही गुलाम केले असते.

जमलेच असते तर गावात चार कारखानेही बांधले असते ।

चषकातला घोष गिळीतच गालावरचे चंद्र न्याहाळिले असते ।

... दरेक सभासंमेलनाचे अध्यक्षस्थान आम्हीच भूषविले असते.

दारिद्र्यात दिवंगत झालेल्या कवींचे स्मारकही बांधले असते. ॥' (शब्दांचे ईश्वर)

पण आम्हाला कवितेतच खराब व्हायचे होते. कारण व्यथांना शब्दात अमर करायचे होते. जगणे कठीण झाले

तरी चांचपडत-ठेचाळत चालायचे । 'घडीभर अंधार राहील नंतर पहाटच आहे.' म्हणून फितूर 'अंधाराच्या कैद्यांच्या' पराभूत तत्त्वज्ञानाला बळी पडून-

'मग आजच सारी आयुधे टाकून येऊच का ?'
माफ करा एवढे काम मला सांगूच नका !' लढाईस तोंट फुटले; आणि आता माघार घेणे शक्यच नाही.''

हे चित्र केवळ कामगार वर्गाचे नाही; तर सर्व प्रकारे 'श्रमविक्री' करणाऱ्या जनचळवळीतील कामगारांचे आहे. नारायण सुर्वे म्हणतात- 'श्रमविक्री' हा केंद्रबिंदू आहे. कुणी शारीरिक श्रम तर कुणी बौद्धिक श्रम विकतात. 'गिरगावी-कामगार' आणि 'गिरणगावी-कामगार'; दोघेही श्रम-विक्रेतेच !' त्यांना बोलते करण्यासाठी सुर्व्यांनी शब्दांची कांस धरली. 'जसा जगत आहे तसाच शब्दात आहे... जाणवले, काळजात सलले; तेच शब्दरूप होऊन बाहेर पडले !'

'माझे शब्द तुम्हाला आमची कथा सांगतील
याच सोहळ्यासाठी दोन अश्रू जपून ठेवलेत'
(माझे शब्द)

सुर्वे म्हणतात, 'माझे काव्यजीवन सुरू झाले होते. शब्दांशी सोयरीक सुरू केली होती... साक्षात् माणसाला चित्रित करूनच त्याच्याद्वारा त्याचे जीवनभाष्य, जगणे व संघर्ष मी रंगवू लागलो.'

सुर्व्यांच्या शब्दांची प्रथमभेट झाली ती शेतकरी स्त्रीच्या कष्टाच्या 'वेदनेचा वेद' म्हणून गौरविली गेलेली लोकगीताच्या धाटणीची कविता-

डोंगरी शेत माझं ग, मी बेणू किती ।
आलं वरीस राबून, मी मरावं किती ।...

शेतकऱ्याच्या जीवनाचे कारुण्यपूर्ण भाष्य शेतकरी स्त्रीच्या तोंडून व्यक्त झाले आहे.

'महागाईने हैदोस घातला... सावकारी फास गळा आवळू लागला- घरात तान्ह्याला ठेवून आले... त्याला भूक लागली की तो रडंल. आलं पिक सावकार हिसकावून घेतो... उपासमार होते. कष्टाचं फळ पदरात पडेना.' परंतु ह्या नैराश्येने तिला ग्रासलेले नाही. 'जुलमी रावणाचे फास तोडायचे असेल तर एकीचं निशाण हाती घ्यावेच लागेल...'

'**भाकरीच्या चंद्रासाठी**' ही जिंदगी तर बरबाद झाली ! '**विरूपिका**' आपल्या अनुभवाचे दुःख जेव्हा बोलू लागते तेव्हा पारंपारिक उपमा-उत्प्रेक्षा-रुपकांची भाषा अपुरी पडू लागते;- कारण उपमान आणि उपमेय यांच्यातील ध्वन्यर्थ पोटाच्या आगीत केव्हाच भस्मसात् झालेला असतो. साऱ्या सौंदर्यशास्त्राला भुकेचेच ग्रहण लागते. विरूपिकेचा प्रत्येक शब्द भुकेची भाषा बोलू लागतो; तेव्हा पौर्णिमेच्या चंद्रानेही भाकरीचे रूप घेतलेले असते. सारा जीवनव्यवहार भुकेभोवती रूंजी घालीत असतो. बालरामाने हट्ट धरलेला चंद्र, कवींचा चंद्र, शास्त्रज्ञांचा चंद्र, भिषक्-वैज्ञानिकांचा चंद्र पोटातील राहू-केतूंनी ग्रासलेला आहे. विरूपिकेच्या भूमीवरील सूर्य राहूने ग्रासला आहे; तर चंद्र केतूने ग्रासला आहे. हा भुकेचा 'ग्रास' जीवनातील साऱ्या सौंदर्याचा अर्थच बदलून टाकतो. 'त्याच्या' डोळ्यातले सूर्यचंद्र 'लेथ' मशीनवर एकाग्र झालेले असतात. भव्य लेथवर काम करणाऱ्या हातांची एकाग्र सहज हालचाल, भट्टीचे तांबुस ऊन त्याच्या चेहऱ्यावर पडते; तेव्हा 'तो' 'तिला' मदनासम दिसतो-

'चार सोबत्यात शोभतोस जणू पौर्णिमेचा चंद्र
परतते पुन्हा खात्यात; लपवून उरात चंद्र.' (चंद्र)

'भाकरीचा चंद्र' मिळविण्यासाठी भव्य लेथवर धोकादायक काम करणाऱ्या रेखीव गतिमान हातांची 'तिला' काळजी वाटते-

'शहारते पाहून गतीस हात जपण्या धावतात...!' रोज 'लेथ' मशीनच्या विकराल राक्षसाबरोबर काम करताना कुठल्याही क्षणी हाताचा ग्रास घेतला जाईल; आणि भाकरीचा चंद्र घरी आणणाऱ्यालाच निकामी करून टाकील; ही निरंतर भीती उरात बाळगताना प्रीतीच्या चंद्राला कायमचे ग्रहण लागलेले असते. ते कमावणारे हात सतत राबले तरच तो भाकरीचा चंद्र खुराड्यात येणार !... तरच पोटातील आगीची पौर्णिमा होणार !!

येथे सूर्य उगवत नाही... गिरणीचा भोंगा वाजतो.भूपाळीचे स्वर जितके पवित्र आणि कर्णमधुर तितकाच तो भाकरी देणारा भोंगा पवित्र कर्णमधुर आहे. जीवनाचा सूर्य भोंग्याच्या इशाऱ्यावर उगवतो; आणि भोंग्याच्याच इशाऱ्यावर मावळतो ! पाय घराकडे ओढ

अनुक्रमणिका

घेतात; कारण-

'वाटेकडे लावुनिया डोळे-
उभी असतील हंसरी फुले.
कांकणाच्या गोड धुंदीत-
भाकरीचा वास दरवळे...।' (रवि चालला घरा)

पोट भरले की खुराड्यात दुखऱ्या अंगाने सुखाची स्वप्ने 'त्याची'-'ती' पाहू लागते. कधीही न पूर्ण होणारा हट्ट धरते...

'गाडी आणा बुरख्याची, बुरख्याची दोन चाकी'
...धावे शामकर्ण जोडी
वळणे घेऊन नागमोडी
मागे रथावानी गाडी
आत आमची हंसजोडी
संगे धावुनिया वारा हो, वारा मान टाकी
गाडी आणावी बुरख्याची, बुरख्याची दोन चाकी...।

भोंग्याच्या कर्णकटु आवाजाने हे स्वप्न कुठल्या कुठे विरून जाते. आणि विरूपिका गिरणीची लावणी गाऊ लागते-

'सात वाजता सकाळी । भोंगा वाजवी भूपाळी ।
सुरू पहिली पाळी । मोठ्या डौलात ।
चाक फिरे गरगरा । सुत निघे भरभरा
नटवाया वसुंधरा । आमच्या घामातुन ॥'

सुर्वे म्हणतात- 'दुःख देखणे करून दाखविण्यात... कारूण्य गोळा करून मांडण्यात काही अर्थ नाही.' असे शब्द म्हणजे मृगजळ ! सुर्वे यांच्या शब्दांनी अवघ्या सौंदर्यशास्त्राला धक्का दिला आहे. शब्दांमधून लक्षणार्थ आणि व्यंजनार्थ काढून हुरळून जाणारे कवी अभिधार्थापासून दूर काल्पनिक सौंदर्य-शोध घेतात. शब्दांच्या दुरुस्त-अर्थाने आणि शब्दांच्या दुरुस्त-मांडणीतून अर्थाची दुरुस्त प्रतिमाच काव्यबद्ध होते. ही अभिधार्थाशी बेइमानी आहे. वास्तवार्थाकडे पाठ फिरविणारे शब्द मी केव्हाच फेकून दिले आहेत. आम्ही 'सूर्यकुलातील लोक' आहोत. सूर्यप्रकाशात सर्वकाही सत्य उजेडात येते. मग ते कितीही कटु, कितीही कुरूप, ओंगळवाणे-किळसवाणे, दरिद्री आणि अष्टावक्र असो. जसेच्या तसे दिसणार. जसेच्या तसे पहायची लाज-वाटणारे दुरूस्त् प्रतिमांच्या स्वप्ननगरीत मश्गूल होतात. सगळे काव्यशास्त्र खोटे आहे. चंद्राच्या जागी चंद्रमुखी पाहणाऱ्यांना ते कसे कळावे ? चंद्राच्या प्रकाशात दगडही सुंदर दिसतो कवींना ! ते भ्रमिष्ट आहेत. दगडातूनही देव पाहणारे भ्रमिष्ट आहेत. दगड तो दगडच ! त्याचा संबंध छिन्नी-हातोड्याशी ! छिन्नी-हातोड्यांनी घडविलेल्या दगडातून राजमहाल आणि ताजमहाल बांधणारे, घडविणारे रक्ताळलेले हात... 'निर्मीक !' तेच खरे 'ब्रह्म' आहे. तो ऐसा गा मी ब्रह्म ! परंतु हा खरा फुल्यांचा 'निर्मीक' किंवा सुर्वेंचा 'ब्रह्म' सोन्याचा हात असूनही भुकेला आहे. त्याचेच 'सोने' त्याला मिळावे म्हणून संघर्ष करण्यातच त्याची जिंदगी बरबाद होत चालली आहे. सुर्वे म्हणतात 'आम्हालाही स्वप्ने पाहण्याचा मोह होत नाही; असे नाही !

'झूट बोलून आयुष्य कुणालाही सजविता येते
अशी आमंत्रणे आम्हालाही आली; नाहींच असे नाही.'
असे हंगाम शीळ घालीत गेले घरावरून
शब्दांनी डोळे उचलून पाहिलेच नाही, असेही नाही...'

अशी इमान विकणारी दुकाने पाड्यापाड्यात आहेत. अशा बेइमान उजेडात की जेथे सत्य दडविले जाते... शब्दांच्या विभ्रमांनी आणि व्यंग्यार्थाने-ध्वन्यार्थाने यथार्थाला चकविले आहे. सगळे बेतलेले आधीच ! ह्या बेतलेल्या आयुष्याच्या वाटेवरून म्हणे स्वर्गसुख मिळणार ! 'थूः !' अशा बेतलेल्या 'चार खांबाच्या' आयुष्यावर !! आणि बेतलेल्या आयुष्याची हुजरेगिरी करणाऱ्या, आत्म्याशी बेइमानी करणाऱ्या शब्दांवरही ! 'बेतून दिलेले आयुष्य' घेऊन आम्ही सूर्यमालिकेतील सर्वांचा विचार करतो. ह्या सर्वांना नाकारून माझे शब्द केव्हाच घराबाहेर निघाले 'अजून तुझी आवराआवर कशी झाली नाही ?

अजूनही त्याच मयसभेत ठेचकाळत आहेस ?
'ते रूद्राक्ष, पोथ्या, ते खुंटीवर टांगलेले देव-
...कालच म्हणाली, ''कुणीही भले केले नाही.''
कशाला हवे कोठीला टाळे ? उघडीच ठेव दारे
अजून तुला इथला मोह सोडवत का नाही ?...'
(सूर्यकुलातील लोक)

अजूनही चंद्र-चांदण्या-तारे-इंद्रधनुष्य- ह्या

अनुक्रमणिका

अपार्थिवाच्या अशाश्वतात पाय घुटमळतात. फसव्या प्रकाशाच्या दुनितयेत... फसव्या शब्दांच्या दुनियेत ? सुर्व्यांचा 'शीगवाला' खाटीक म्हणतो-

'एक धानमंदी ठेव बेटा !
सबद लिखना बडा सोपा है । .
सब्दासाठी जीना मुश्किल है ।...
...मी खाटीक आहे बेटा- मगर
गाभणवाली गाय कभी नही काटते. (शीगवाला)

...खाटकाला जे कळते; ते अर्थगर्भार शब्दांना व्यंग्यार्थाने मोडून-मुरगाळून तिच्या कलेवराला सजविणाऱ्या शब्दांच्या कारागीरांना कधी कळणार ? अशा शब्दांकडे पाठ फिरवून सुर्व्यांची कविता काट्याकुट्यांनी भरलेल्या वाटेवरून चालू लागते. रक्तबंबाळ !

सुर्वेंची कविता नाद-लयीत फारशी रमली नाही ! त्यासाठी शब्द वळविणे- खटपट करणे त्यांना जमलेच नाही. शब्दांचे सेनापती होण्यापेक्षा ज्याने भावार्थ प्रकट होईल ते स्वाभाविक लयतत्त्व त्यांनी स्वीकारले. प्रत्येक विचाराला त्याचे असे एक लयबद्ध शब्दसौंदर्य असते. सहज पालवी फुटावी; तसे ! अशरीरी स्वरसौंदर्य काळजाला भिडते खरे ! पण ती देणगी आळवायला उसंत कुठे आहे, जमिनीत खोल रूजलेल्या मुळांना पाणी देण्यापेक्षा पानाफुलांवरच बोलायला !

'जे सुंदर असते ना मर्ढेकर,
तेच सत्यही असते; आणि जे सत्य असते
ते क्रांतिगामी अन् गतिमानही असते.
अशाश्वत तर बदलतेच,
परंतु माझ्या रोजच्या लढाईत हेच मला प्रत्ययाला येते. तुमचा माणूसच पुसला. तर नंतर काय हो ....?
(मर्ढेकरांशी एक बातचीत)

चंद्रताऱ्यांचे स्वप्नसौंदर्य घेऊन शब्द आमच्याही खोपीत येतात. पण ते आम्हाला दोन दिवस समाचाराला आलेल्या सांत्वनपर शब्द बोलणाऱ्या पाहुण्यांसारखे वाटतात. ते आमच्या खोपीत किती दिवस राहणार ? जगरहाटी म्हणून येतात, आणि जातात! शाश्वत दुःखाच्या घरी अशाश्वत सुखाचे शब्द दुःखाचे भागीदार होण्यासाठी येत नाहीत. मग ते शब्द ओवी-अभंगांचे, गीताभागवताचे का असेनात ! पोट भरल्यावर वाचायचे ते शब्द आहेत. काही काळ बरे वाटते. मग पाहुणे निघून जावेत; तसे ते जातात ! आम्हाला त्याच दुःखाच्या खोपीत ठेवून ! आम्हाला बरोबर नेत नाहीत. त्यांच्याबरोबर आम्हाला घर सोडता येत नाही. ते निघाले की फक्त दारापर्यंतच जावे लागते- निरोप द्यायला ! परतलो, की उदास वाटते...! त्या चंद्रचांदण्यांच्या आणि गीता-भागवताच्या शब्दांना सोडावेच लागते. प्राणशून्य देहाला स्मशानात पोहोचवून यावे तसे !

'शब्द पाहुणे होऊन आले होते, त्यांना आज पोचवून आलो कां कोण जाणे उदास वाटते; स्वतःलाच हरवून आलो.' (पाहुणे)

ज्या गावात, ज्या वस्तीत सुखाचा सूर्य आणायचा आहे; ज्यासाठी लढणे हेच जीवन आणि काव्यजीवन आहे; त्याने चंद्रचांदण्याच्या आणि शब्दज्ञानाच्या मोहात पडायचे नसते. अशा ताटातुटी होणारच, त्याने भयकंपित किंवा उदास होऊन कसे चालेल ! लढाई अर्ध्यावर सोडून कसे चालेल ? कारण- कष्टकऱ्यांचे- श्रमकऱ्यांचे राज्य येणार आहे. त्या नवसृष्टीचे चित्र माझ्या दृष्टीला दिसते आहे. तोपर्यंत संघर्षाची गाणी गात राहिली पाहिजे.

'याच वस्तीतून आपला सूर्य येईल
तोवर मला गातच राहिले पाहिजे ।
नगरवेशीत अडखळतील ऋतु
तोवर प्रिये जागत राहिले पाहिजे. ॥'

संघर्षाने विजय मिळविल्याच्या आशादायक घटना सभोवताली घडत आहेत. स्वातंत्र्य मिळाले. भारतीय सेनेने गोवामुक्ती संग्राम जिंकला आहे. गोव्याचे सौंदर्य पूर्ण दिसू लागले आहे. उजाडेपर्यंत गातच राहिले पाहिजे. जीवनाने कितीही नकार दिला असला तरी कवी 'आनंदवनभुवनाचे' स्वप्न पाहतो. श्रमशक्तीच्या सहाय्याने ! श्रम आणि सत्य एकत्र आले की स्वाभाविक सौंदर्य शब्दातून प्रकट होते.

श्रम आणि सत्य । सौंदर्याची गाथा
सारे झूट मिथ्या । याच लोकी ॥

सुर्व्यांची कविता हे त्यांचे आत्मकथन आहे. त्याला वास्तवाची एक धार आहे. हे आत्मकथन म्हणजे थोडे

अनुक्रमणिका

वास्तव-थोडी कल्पना यांची चटकदार भेळ नाही. थोडे अश्रू-थोडा घाम- थोडे रक्त- थोडी घाण ! थोडा आक्रोश आणि गिरणीच्या भोंग्यालाही फिका पाडील असा क्रांतीचा घोष... यांचे ते वास्तवदर्शन आहे. सारे दर्शनशास्त्र त्यापुढे फिके आहे. ह्या दर्शनाच्या पलिकडे काही नाही. भूक आणि उपासमार हेच दर्शन आणि हेच ज्ञान ! आणि हाच (अ)मृतानुभव ! हीच गाथा आणि हीच पोथी ! सुर्वेच्या पोर्टरचे स्वगत हाच आत्मसंवाद-

'आपनच आपल्याशी बोलत ऱ्हानं बरं वाटतं
येळबी जातो, आन् हिसाबकिताब व्हतो मनाचा...
बोगीतनं,
मानसं उतरत्यात ढकलत चढत्यात, ही झुंबी.
पुन्हा फलाट रिकामाच, तस्स हाय सालं हो !'

लॉरेन्स ड्यूरेल यांनी आपल्या यशाबद्दल म्हटले आहे की, 'लोक माझे अभिनंदन करतात, ते माझ्या लिखाणाला मिळालेल्या पारितोषिकांबद्दल ! माझ्या लिखाणाबद्दल अभिनंदन करीत नाहीत.' सुर्वे गावोगावी गेले- जीव तोडून आपली मुक्तछंदातील कविता गायले! अर्थ किती जणांनी समजावून घेतला कुणास ठाऊक ! परभणीचे अध्यक्षपद त्यांना मिळाले त्यावेळी एका समजुतदार व्यक्तीने त्यांना अभिनंदन करीत विचारले... 'काय ? आता जिंदगी फुलबाग झाल्यासारखी- वाटते ना!' सुर्वे त्याच्याकडे बघतच राहिले. त्यांचा तो चेहरा मी तरी आयुष्यात विसरू शकणार नाही ! 'याचसाठी का केला होता- अट्टाहास?' साऱ्या कवितेच्या वेदनेचा वेद त्यांच्या चेहऱ्यावर दिसला !

कवितेने नवा अनुभव, नवे जीवनदर्शन द्यावे, असे त्यांचे मत होते. मग ते गीत असो की काव्य ! शाहीर अमरशेखांनी 'स्टॅलिनग्राडच्या पोवाड्या'तील शब्दांची आग आपल्या पहाडी गळ्यातून ओकली ! ते सुर्व्यांनी पाहिले होते. फुल्यांचे अखंड आणि आंबेडकरी जलश्यांनी त्यांच्या हृदयाच्या काव्यभूमीची मशागत केलेली होती. साक्षात् चळवळीचा अनुभव तर होताच ! त्यामुळे ४७ नंतरचे- स्वतंत्र भारताचे जीवन कसे असेल. कोण- राज्य करणार ? धनदांडगे की घर्मदांडगे? ह्या प्रश्नांमधून त्यांच्या कवितेने मराठीच्या सुखमय संसाराचे अपेक्षित चित्र शब्दबद्ध केले. गरीबांचे राज्य येणार... ते चंद्रसूर्य -तारे-फुले, आमच्याही कवितेत येतील-

'जेव्हा फुले हात उंचावून माझ्या (ही) घरी येतील
जेव्हा तारे आप्त म्हणून माझ्याही घरी येतील
...ऋतुंनो वाऱ्यांनो फुलांनो नाजुक पऱ्यांनो
जेव्हा माझ्या ह्या देशात याल कदाचित् मी नसेन
आताच तुमच्या हालचाली शब्दात येतात
तेवढ्या दर्शनानेच मी पुलकित पावेन !'

आणि जाता जाता ते असाही संदेश देतात-

जेव्हा मी अस्तित्वाच्या पोकळीत नसेन
तेव्हा एक कर,
तू निःशंक मनाने डोळे पूस...
...उगीचच चिरवेदनेच्या नादी लागू नको !
खुशाल; खुशाल तुला आवडेल असे एक नवे घर कर.
मला स्मरून कर,
हवे तर; मला विस्मरून कर !

यापेक्षा विरूपिकेने आणखी किती स्पष्टपणे आपले- सौंदर्यशास्त्र बोलावे ? फसव्या शब्दांच्या तथाकथित जीवनसौंदर्याला नाकारून !

-सु. कुलकर्णी

(संपादक)
(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे ३०)
संपर्क : ७ गायकवाड वसाहत, सावेडी मार्ग,
अहमदनगर. दूरभाष : ०२४१-२४२९७५५

अनुक्रमणिका

नारायण सुर्वे यांची साहित्यसंपदा



नारायण सुर्वे

काव्य :

ऐसा गा मी ब्रह्म १९६२

माझे विद्यापीठ १९६६

जाहीरनामा १९७५

नव्या माणसाचे आगमन १९९५

सुर्वे यांच्या कवितांचे संपादित ग्रंथ :

सनद (१९८२) (संपादक - कुसुमाग्रज)

गवसलेल्या कविता - (संपादक - विजय तापस)

सुर्वे यांच्या कवितेचा अनुवाद :

नारायण सुर्वेनी कविता (गुजराथी) अनु. वसंत जोशी

मेरा विद्यापीठ (हिंदी) अनु. मनोहर सोनकर

नारायण सुर्वे की कविता (हिंदी) अनु. पांडुरंग कापडणीस

मेरी दरसगाह (ऊर्दू) अनु. रफिया सबनम आबीबी

लेखसंग्रह :

माणूस - कलावंत - समाज

अनुवादित :

ऑन् द पेव्हमेंट ऑफ लाइफ (इंग्रजी)

अनु. - प्र. श्री. नेरूरकर, कृष्णा चौधरी

नारायण सुर्वेनी केलेले अनुवाद

तीन गुंड आणि सात कथा (मूळलेखक : कृष्णचंद्र)

दादर पुलाखालची मुले (मूळलेखक : कृष्णचंद्र)

नारायण सुर्वे संपादित ग्रंथ :

दलित काव्यदर्शन

कविता श्रमाची

गाणी चळवळीची

कॉ. डांगे- भारतीय राजकारणातील वादळ

मानसन्मान :

गौरव - पद्मश्री (१९९८)

कुबेर पुरस्कार (१९९९) जनस्थान (२००५)

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळातर्फे दोन पुरस्कार - ऐसा गा मी ब्रह्म १९६३

माझे विद्यापीठ १९६७

सोवियत रशियाकडून नेहरू पारितोषिक 'माझे विद्यापीठ'साठी

माझे विद्यापीठ (१९९९) नरसिंह सरस्वती पुरस्कार

'सनद'ला कऱ्हाड साहित्य पुरस्कार

'सनद' भारत सरकारचा पुरस्कार

अध्यक्षपदावर निवड :

कामगार साहित्य संमेलन १९६२

अ. भा. मराठी साहित्य संमेलन १९९५

दलित आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलन १९८९

महाराष्ट्र फौंडेशन गौरव पुरस्कार (४ पुरस्कार)

❖❖❖

एका 'धवलगिरी'ची परिक्रमा...

- डॉ. कल्याणी दिवेकर

[काही आत्मचरित्रलेखनात 'सत्य सांगणे' हा फार मोठा अडथळा असतो. प्रधानसरांसारख्यांच्या आत्मचरित्रलेखनात असत्याचाच अडथळा असतो. प्रधानसरांची 'वाटचाल' सत्याच्याच सहजसौंदर्याने वाचकांना अंतर्मुख करते. प्रधानसर म.सा.प.चे अध्यक्ष होते.

–संपादक]

''आत्मचरित्र हा सीमारेषेवरील वाङ्मयप्रकार आहे.'' असे मानून कथा-कादंबरीपेक्षा आत्मचरित्राला दुय्यम स्थान दिले जाते; पण काही आत्मचरित्रे वाचकांची जीवनविषयक जाणीव प्रगल्भ करतात आणि 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार किती सर्वसमावेशक, बहुआयामी आहे, याची साक्षही पटवतात. ग. प्र. प्रधान यांचे 'माझी वाटचाल' हे साधना प्रकाशनाने प्रकाशित केलेले आत्मचरित्र यांपैकीच एक.

ग. प्र. प्रधान कालवश झाल्यानंतर या शुभ्र-धवल माणसाच्या सहवासात आलेल्या अनेकांनी त्यांच्या आठवणी जागवल्या. प्रधानसरांच्या जाण्यानं निर्माण झालेली निष्प्रेम पोकळी आणि मनाची काहिली काही प्रमाणात कमी करण्यासाठी पुनः एकदा 'माझी वाटचाल' हाती घेतलं.

ग. प्र. प्रधान हे नाव 'साधना परिवारा'ची कक्षा ओलांडून आता सर्वमान्यतेच्या पातळीवर जाऊन पोचले आहे. प्रधानसरांच्या व्यक्तिमत्त्वातील कमालीची विनयशीलता, ऋजुता, त्यांचे अजातशत्रुत्व, आत्मपरीक्षण करीत स्वतःकडे तटस्थपणे पाहण्याची सवय आणि कधीही न आटणारा प्रेमाचा झरा ! या सर्वांमुळे हे आत्मचरित्र म्हणजे एका संवेदनशील मनाने वाचकाला सोबत घेऊन केलेली 'परिक्रमा' वाटते. यामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करताना आलेले अनुभव जसे आहेत, तसेच ज्या व्यक्तींमुळे आयुष्य घडले, त्यांच्याबद्दलची कृतज्ञ जाणीवही आहे. स्वातंत्र्यसंग्रामाच्या अखेरच्या टप्प्यात का होईना, पण आपल्याला सामील होता आले, याबद्दल प्रधान स्वतःला भाग्यवान समजतात. स्वातंत्र्यसंग्रामातील या सहभागामुळेच मध्यमवर्गीय पांढरपेशा कुटुंबात जन्म घेऊनही ते आत्मकेंद्रित झाले नाहीत. शाळेत असतानाच कर्मवीर आण्णांच्या शाळेतील मुलांचे कष्ट पाहून ते प्रभावित झाले; आणि जात, धर्म, वर्ण आणि वर्ग यांच्या भिंती गळून पडल्या. सुरक्षित घरकुलाच्या संकुचित कक्षा ओलांडून एका विशाल कुटुंबाचे ते सदस्य बनले. साताऱ्याहून पुण्याला आल्यावर इंग्रजी साहित्याची गोडी लागली. डिकन्सच्या कादंबऱ्यांनी एका वेगळ्याच जगाची ओळख झाली. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतरचे कामगारांचे जीवन किती खडतर आहे, याची जाणीव झाली. पुढे खांडेकरांच्या 'उल्का' कादंबरीने तर दारिद्र्याबद्दलच एक तऱ्हेचे आकर्षण वाटू लागले.


आपल्या देशातील असंख्य लोक भीषण दारिद्र्यात होरपळत असताना आपण स्वतःच्याच सुखात गुरफटणे बरे नाही, हा विचार तीव्र झाला. याविषयी प्रधान सर लिहितात, की-

''१९४२ साली मी घर सोडून गेलो; परंतु खरे तर 'उल्का' वाचल्यावर भाऊसाहेब खांडेकरांचा हात धरून मी मनाने माझ्या घरातून बाहेर पडलो.'' (पृ. १३) पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषबाबू यांच्या विचारांचे आकर्षण वाटू लागले आणि मधू लिमये, वंडू गोरे, नानासाहेब गोरे, शिरूभाऊ लिमये, एस. एम. जोशी यांच्या 'सोशॅलिस्ट स्टडी सर्कल'मध्ये सामील होत पुढे 'राष्ट्र सेवा दला'चे सच्चे कार्यकर्ते बनले. एका बाजूला क्रांतिकारकांचा आत्मसमर्पणाचा मार्ग आणि दुसरीकडे अहिंसात्मक सत्याग्रह यांपैकी श्रेष्ठ मार्ग कोणता, याबद्दल काही काळ मनात संभ्रम निर्माण झाला खरा, पण बंडू गोरे यांनी समजूत काढल्यामुळे आणि पुढे वाचनातून हे उमगत गेले, की बहुजनसमाजात काम करीत त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची आकांक्षा रुजवून आपल्याला एक खंबीर संघटना उभी करायची आहे. स्वातंत्र्य हाकेच्या अंतरावर असताना काठावर उभे राहून स्वातंत्र्यसंग्राम न्याहाळणे शक्यच नव्हते. भूमिगत चळवळीत सामील झाल्यावर 'येरवडा विद्यापीठा'त शिकायची संधी मिळाली. तिथे महात्मा ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या ग्रंथांचे वाचन केल्यानंतर दलितांच्या प्रश्नाची खरी ओळख त्यांना झाली. शंकरराव मोरे यांच्याशी झालेल्या चर्चेतून ग्रामीण भागातील

अनुक्रमणिका

मुला-मुलींच्या शिक्षणाविषयीची निकड लक्षात आली. साने गुरूजी, महात्मा गांधी यांच्या निकट जाण्याची संधी मिळाल्यामुळेच फर्गसन महाविद्यालयात अध्यापनाचे काम करताना चाकोरीपेक्षा वेगळा विचार करता आला. १९४५ ते ५५ या काळात इंग्रजी साहित्याच्या वाचनाबरोबरच मानसशास्त्र, सौंदर्यशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयांचा व्यासंग करता आला.

अर्थात् ग्रंथांच्या छापील पानांमध्ये अडकून पडणारे हे व्यक्तिमत्त्व नव्हतेच; कारण जीवनाचा ग्रंथ वाचण्याची जी दृष्टी सरांना लाभलेली होती, तिच्यामुळे कोणतेही काम करताना मनःपूर्वकता आणि वास्तवाचे भान त्यांनी जागे ठेवले. मग ते पुणे विद्यापीठाच्या सीनेट किंवा कार्यकारिणीचे काम असो; किंवा विधानपरिषदेतलं कामकाज असो. आपल्या अठरा वर्षांच्या आमदारकीमध्ये त्यांनी अनेक कल्याणकारी योजना मार्गी लावल्या. जव्हारमधला आदिवासींचा प्रश्न, ग्रामीण भागात काम करणाऱ्या महिलांचे प्रश्न असे असंख्य प्रश्न सोडवताना प्रधानांची भूमिका एका निष्ठावंत कार्यकर्त्यांचीच राहिली.



स्वतःशी प्रतारणा न करता आणि कोणालाही साधन म्हणून न वापरता लोकशाही समाजवादाचा पुरस्कार करणारा हा भला माणूस सतत विद्यार्थ्यांच्या भूमिकेत वावरला. आपल्या मर्यादांचे भान राखत परिस्थितीचा अभ्यास करण्याची सवय असल्यामुळे या पुस्तकातील त्यांचे विचार हे केवळ उद्‌गार वाटत नाहीत, तर प्रश्नाच्या नेमक्या आकलनाबरोबरच वाचकाला शहाणं करून सोडणारं ते भाष्य असतं. म्हणून "विधानसभा, विधानपरिषद आणि संसद ही चर्चामंडळे नसून सत्तासंघर्षाची स्थानेच आहेत." किंवा "लोकशाही ही केवळ राज्यपद्धती नाही, तर जीवनदृष्टी आहे."

"लोकशाहीच्या पायातील दोन शृंखला म्हणजे सामाजिक विषमता आणि आर्थिक विषमता." यासारखी वाक्ये कोरडी वाटत नाहीत. तर आयुष्यभराच्या चिंतनाचं सार म्हणून ती येतात, आणि त्यांना सुभाषिताचं वजन लाभतं.

या पुस्तकात काय नाही ! व्यक्तिचित्रे आहेत, शिक्षणक्षेत्र, समाजकारण, राजकारण या क्षेत्रातील जिवंत, रसरशीत अनुभव आहेत, कुटुंबातील व्यक्तींबद्दलचा ओसंडून वाहणारा जिव्हाळा आहे, काही अनुत्तरित राहिलेल्या प्रश्नांविषयीची कासाविसी आहे. आणि सर्वांमधून सतत जाणवत राहणारा आपुलकीचा प्रेमाचा स्पर्श आहे. म्हणूनच असंख्य व्यक्तींबद्दल लिहिताना केवळ व्यक्तिचित्र उभं न करता सहवासचित्र रेखाटण्यावर त्यांचा भर आहे. या माणसापासून मला काय मिळालं, याबद्दलचा कृतज्ञ भाव आहे. लोकमान्य टिळक, नामदार गोखले आणि महात्मा गांधी यांच्याविषयी अनेकांनी आजवर लिहिलं आहे, पण या तिघांमधलं नातं उलगडण्याचा प्रधानांचा प्रयत्न अपूर्व आहे. प्रधानांच्या मते हे तिघे म्हणजे केवळ व्यक्ती नसून विचार आहेत.

या पुस्तकातून प्रधानसर सतत वाचकाशी बोलतात. या बोलण्यात जशी निरहंकारी वृत्ती आहे, तसाच टोकाचा प्रांजळपणा आहे. यामागे आत्मपरीक्षणाची सवय तर आहेच; पण प्रधान सरांच्या व्यक्तित्वातील स्फटिकासारखी पारदर्शकता आहे. ती वाचकाचं अंतरंग उजळून टाकते.

❖❖❖

डॉ. कल्याणी दिवेकर
'ध्रुव' ३१ ब, माधवबाग सहनिवास, कोथरूड,
पुणे ४११ ०३८. दूरभाष : २५४३१६७२

प्रस्तावनांची प्रस्तावना*

- डॉ. यू. म. पठाण

आजवर आपल्याकडे वाङ्मयाच्या साधनग्रंथांची (Source books) कल्पना फारशी रुजली नाही. वाङ्मयाचे साधन-ग्रंथ दोन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारात विशिष्ट कालखंडातील महत्त्वाचे/लक्षणीय ग्रंथ निवडून त्याविषयी संक्षेपात परिचयात्मक माहिती नोंदविली जाते व त्या ग्रंथांतील लक्षात घेण्याजोगे उतारे दिले जातात. दुसऱ्या प्रकारात असे ग्रंथ निवडून त्यातील विविध वैशिष्ट्यांचे सविस्तर विवरण केले जाते. यांतील पहिल्या प्रकाराचा प्रयत्न संतसाहित्याचे व्यासंगी भाष्यकार, भाषाशास्त्रज्ञ व माझे गुरू डॉ. शं. गो. तुळपुळे त्यांनी 'प्राचीन मराठी गद्य', 'प्राचीन मराठी पद्य' तसेच 'Old Marathi Reader या सारख्या ग्रंथांच्या रूपाने केला आहे. माझ्या या ग्रंथाचा समावेश दुसऱ्या प्रकारच्या साधन-ग्रंथात करता येईल. वाङ्मयाच्या साधन-ग्रंथांची संकल्पना रूढ झाल्यास त्यांचा उपयोग वाङ्मयाच्या अभ्यासकांना, अध्यापकांना, संशोधकांना, त्याचप्रमाणे सर्वसामान्य वाचकांनाही निश्चितपणे होईल, असा विश्वास वाटतो. या साधन-ग्रंथांमुळे त्या त्या कालखंडाच्या वाङ्मयाच्या स्वरूपाचा, त्यातील स्थिती-गतीचा व परिवर्तनांचा आलेख रेखाटता येईल. असे विविध भाषांतील साधन-ग्रंथ निर्माण झाल्यास त्यांचा तुलनात्मक साहित्याध्ययनास आणि भाषाध्यायनास फार उपयोग होईल. साधन-ग्रंथांच्या निर्मितीत त्या त्या भाषेच्या साहित्यातील मानदंडांचे मोलाचे साहाय्य होते.

मध्ययुगीन मराठी साहित्याचा विचार करीत असताना आपण कोणकोणते मानदंड मानतो ? या संदर्भात लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी, नामदेव, तुकोबांच्या अभंगगाथा, नाथ-भागवत, दासबोध, सभासद बखर (श्रीशिवप्रभूंचे चरित्र), होनाजी बाळा-रामजोशी यांच्या लावण्या, मुक्त-मयूरांची भारते इ. नावे आपल्या डोळ्यांसमोर येणं स्वाभाविक आहे. याशिवाय मला जे ज्ञात, अल्पज्ञात वा अज्ञात असे जे मानदंड जाणवले त्यांच्यापैकी काही मानदंडांविषयी विवेचन केले आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या ग्रंथाच्या विविध खंडांसाठी ज्या मौलिक प्रस्तावना लिहिल्या, त्यांचा संग्रह 'ऐतिहासिक प्रस्तावना' या नावानं प्रसिद्ध आहे. त्याला मराठी भाषा व वाङ्मय तसेच महाराष्ट्राचा इतिहास यांच्या दृष्टीने एक लक्षणीय संदर्भमूल्य आहे. या संदर्भातील हे विविध खंड म्हणजे एक प्रकारे मानदंडच होत.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्यासारख्या दिग्गजांच्या पाऊलखुणांवर चालणे तर अशक्यच आहे पण त्यांच्या या प्रस्तावनांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून व ते पाथेय सोबत घेऊन मी थोडीफार वाटचाल करण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे. गेल्या चार-पाच दशकांत नियोजनपूर्वक संशोधन करून मी मध्ययुगीन मराठी साहित्यातील ज्या काही ज्ञात, अल्पज्ञात वा अज्ञात मानदंडांचे संपादन केले व त्यांच्यासाठी विवेचक प्रस्तावना लिहिल्या, त्यांचा संग्रह या ग्रंथात केला आहे. तथापि, या ग्रंथातील ऋद्धिपूर-लीळा ('श्रीगोविंदप्रभुचरित्र') हा ग्रंथ मी संपादिलेला नाही व त्याला मी प्रस्तावनाही लिहिली नाही. महानुभावीय सांप्रदायिक चरित्रलेखन या दृष्टीने मी त्याच्याविषयी एक स्वतंत्र लेख लिहून त्याचा समावेश या ग्रंथात केला आहे. त्याचप्रमाणे वीरशैव संतकवी मन्मथस्वामी यांच्या 'परमरहस्य' या ग्रंथाचे संपादनही मी केले नाही. ते तीन-चार दशकांपूर्वी माझे ज्येष्ठ स्नेही व वीरशैव सत अहमदपूरचे डॉ. शिवलिंग शिवाचार्य यांनी केले व त्यांच्या इच्छेनुसारच मी या ग्रंथाला विवेचक प्रस्तावना लिहिली होती तसेच तिच्यामध्ये वीरशैव धर्मांचे तात्त्विक अधिष्ठान असलेल्या षट्स्थल सिद्धान्ताचे विवरण केले होते. ती या ग्रंथात समाविष्ट केली आहे. माझ्या या ग्रंथात वरील दोन मानदंडांशिवाय मला मध्ययुगीन मराठी साहित्याचे जे अन्य मानदंड जाणवले, त्यांचे संपादन केले असून त्या ग्रंथांना मी लिहिलेल्या प्रस्तावनांचा समावेश केला आहे. त्यांना मी मध्ययुगीन मराठी साहित्याचे मानदंड का मानतो, याचे

* *'मध्ययुगीन मराठी : आणखी काही मानदंड' भूमी प्रकाशनाच्या या आगामी ग्रंथाची प्रस्तावना.*

अनुक्रमणिका

उत्तर पुढील विवेचनातून व माझ्या प्रस्तावनांतून मिळेल.

कवी चोंभा नि त्याचे 'उखाहरण' हे अप्रतिम आख्यानकाव्य आहे याविषयी मराठी वाङ्मयेतिहासात नाममात्र वा अल्पस्वल्प माहिती दिली जात असे. हा संपूर्ण ग्रंथच उपलब्ध झाला नव्हता, हे याचे प्रमुख कारण होते. इति. वि. का. राजवाडे यांना त्यांची ४९ पृष्ठेच उपलब्ध झाली होती. तीही तिसगावच्या रामदासी मठात. त्यावरून हा कवी ब्राह्मण होता व या 'उखाहरणा'च्या प्रतीचा लेखक यजुर्वेदी ब्राह्मण होता, असे त्यांनी मत मांडले होते. (वस्तुतः हा यादवकालीन कवी कोळी होता व त्याने स्वतःविषयीचे हे उल्लेख अनेक ठिकाणी आपल्या काव्यात केले आहेत, याविषयीची अनेक प्रमाणे मी माझ्या प्रस्तावनेत दिली आहेत.) या ग्रंथाचे आद्यन्तयुक्त हस्तलिखित मराठवाड्यातील गोपाळचावडी (लिंबगाव, जि. नांदेड) येथील महानुभाव मठात उपलब्ध झाले. ते मी दोन-तीन दशकांपूर्वी संपादन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाद्वारा प्रकाशित केले. या ग्रंथाची हस्तलिखित ४९ पृष्ठे तिसगावच्या रामदासी मठात व साद्यंत हस्तलिखित गोपाळचावडीच्या महानुभाव मठात उपलब्ध झाली असली तरी त्यात समर्थ संप्रदायाची वा महानुभाव संप्रदायाची कोणतीही वैशिष्ट्ये आढळत नाहीत. (खरे तर हा ग्रंथ तेराव्या-चौदाव्या शतकातील असल्याने त्यात समर्थ संप्रदायाची वैशिष्ट्ये असण्याचा प्रश्नच नव्हता.) या आख्यानकाव्याला मी 'अप्रतिम' का म्हटले, याचा प्रत्यय मी त्यातील स्वभावचित्रणस कल्पनाविलास, रसाविष्कार, वर्णनकौशल्य, तत्कालीन समाजजीवनदर्शन इ. विषयी प्रस्तावनेत केलेल्या विवरणातून येईल. त्याचप्रमाणे चोंभा हा असामान्य प्रतिभेचा कवी कसा होता, याचीही प्रचीती येईल. विविध 'संतमालिकां'त त्याचा अपरिहार्यपणे उल्लेख येतो, यामुळे त्याला त्याच्या काळात व त्याच्यानंतरच्या काळात मिळालेल्या समाजमान्यतेचीही प्रचीती येते. त्याच्या या अपूर्व काव्यावरून तो यादवकालीन 'रुक्मिणी स्वयंवर' काव्याचा कर्ता महानुभाव. कवी नरेंद्र याच्या तोडीचा कवी असावा, असे म्हणण्याकडे आपल्या मनाचा कल होतो.

मी चौदाव्या शतकातील नवरसनारायण या महानुभाव महाभारतकाराचं 'शल्यपर्व' संपादून ते विस्तृत प्रस्तावनेसह चार-पाच दशकांपूर्वी मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने प्रसिद्ध केले होते. माझ्या या संपादनापूर्वी कवी नवरसनारायण व त्याचं 'शल्यपर्व' याविषयी मराठी वाङ्मयेतिहासात फारच तुरळक माहिती उपलब्ध होती. नवरसनारायण व शाङ्‌र्गधर भोजने हे एकची वेगवेगळे, याविषयी व त्यांच्या परंपरेविषयी मतमतांतरे होती. त्याचप्रमाणे नवरसनारायणाने वेगळ्या महानुभावीय महाभारताची रचना केली असावी की नाही, याविषयी प्रमाणभूत आधार मिळत नव्हता. त्यासाठी मी महानुभावीय सांकेतिक लिपीतील व अन्य हस्तलिखिते मिळवून 'शल्यपर्वा'ची पाठभेदयुक्त संहिता सिद्ध केली. जैन 'पद्मपुराणा'तून जैनधर्मियांना अभिप्रेत असलेल्या वेगळ्या रामायणाची व रामकथेची कल्पना येते; त्याचप्रमाणे महानुभावांचे वेगळे महाभारत कसे असेल याची कल्पना नवरसनारायणाच्या 'शल्यपर्वा'वरून व त्याला मी लिहिलेल्या प्रस्तावनेवरून येते. त्याच्या साहाय्याने महानुभावीय महाभारताचा आलेख रेखाटण्यास साहाय्य होते. 'शल्यपर्वा'तील लक्षणीय काव्य-वैशिष्ट्यांप्रमाणेच त्यातील महानुभाव तत्त्वज्ञानाची व यादवकालीन भाषिक वैशिष्ट्यांची मी सविस्तर व सप्रमाण चर्चा या प्रस्तावनेत केली आहे.

'दृष्टान्तपाठ' या महानुभावीय ग्रंथाचे संपादन माझ्यापूर्वी काही मान्यवर अभ्यासकांनी केले आहे. वस्तुतः 'दृष्टान्त' व त्यावरील 'सूत्र' हा 'लीळाचरित्रा'तील भाग होय. त्याला शेवटी 'दार्ष्टान्तिक' हा भाग केशिराजबास या महानुभाव पंडिताने लिहिला व या दृष्टान्तांचे संकलन केले. या

लेखकांना विनंती

१) लेख 'फुलस्केप' आकाराच्या कागदावर एका बाजूलाच लिहावेत.
२) सुवाच्य अक्षर असावे; किंवा टंकमुद्रित करून पाठवावेत.
३) लिखाणासोबत सदर लेख अन्यत्र प्रसिद्ध झाला नसल्याचे पत्र जोडावे.
४) लेखाबाबत पत्रव्यवहार करू नये. लेखनाची स्थळप्रत आपल्याजवळ असू द्यावी.
५) प्रसिद्धीयोग्य लेखाबाबत संपादक संपर्क साधतील.

दृष्टान्तांचे स्वरूप 'बोधकथां'प्रमाणे आहे. एका अर्थाने 'दृष्टान्तपाठ' हा ग्रंथ म्हणजे महानुभावांचा 'हितोपदेश' हा ग्रंथच आहे. या ग्रंथाचा महिमा असा की त्यावर पुढे महानुभाव पंडितांनी 'दृष्टान्तस्थळ', 'दृष्टान्त-अन्वय' व 'दृष्टान्तहेतू' यासारखे ग्रंथ लिहिले. अशा प्रकारची प्रेरणा त्यांना 'दृष्टान्तपाठ' या ग्रंथामुळे मिळाली. चौदाव्या 'शतकातील या मानदंडस्वरूप महत्त्वपूर्ण ग्रंथातील वाङ्मयीन तात्त्विक व भाषिक वैशिष्ट्यांचे विवरण होणे आवश्यक आहे असे मला उत्कटतेने जाणवले म्हणून मी त्याविषयीचे सविस्तर विवरण संपादिलेल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केले आहे. संतसाहित्याभ्यासक, संशोधक व महानुभाव सांप्रदायिकांना ते उपयुक्त वाटेल. लोकतत्त्वीय अभ्यासाच्या दृष्टीने हा ग्रंथ जसा लक्षणीय आहे, त्याचप्रमाणे ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या दृष्टीनेही कसा उपयुक्त आहे, याची कल्पना माझ्या या ग्रंथाच्या प्रस्तावनेवरून येईल.

नागेश संप्रदाय हा महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सीमाप्रदेशावरील समन्वयवादी संप्रदाय असून त्याचे विशिष्ट तत्त्वज्ञान आचारधर्म, गुरुपरंपरा व साहित्य आहे, हा विचार मी सर्वप्रथम १९६०-६१ साली माझ्या 'नागेश संप्रदाय' या पुस्तिकेत मांडला. ही पुस्तिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळाने प्रसिद्ध केली. मराठी वाङ्मयेतिहासकार व डॉ. रा. चिं. ढेरे यांच्यासारखे मान्यवर संशोधक यांनीही याला मान्यता दिली. त्यामुळे महाराष्ट्रातील वारकरी, महानुभाव, नाथ, समर्थ आणि, दत्त या संप्रदायांत नागेश-संप्रदाय' या संप्रदायाची नव्याने भर पडली. अज्ञानसिद्ध हे या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचे भाष्यकार होते. त्यांनी 'वरदनागेश' या ग्रंथात नागेश संप्रदायाचे तत्त्वज्ञान विशद केले. या ग्रंथास मी सविस्तर प्रस्तावना लिहून तो सर्वप्रथम प्रकाशित केला. त्या ग्रंथामुळे महाराष्ट्रीय धर्मसंप्रदायात एका महत्त्वाच्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची भर पडली व अज्ञानसिद्धांच्या 'वरदनागेश' ग्रंथाला मध्ययुगीन मराठी वाङ्मयात मानदंडाचे स्थान प्राप्त झाले.

महानुभाव कवी कृष्णमुनी डिंभ यांच्या ऋद्धिपुर-माहात्म्य' या दुर्लक्षित ग्रंथाचे मी हेतुतः संपादन करून त्याला जी प्रस्तावना लिहिली, तिच्यात 'माहात्म्य' या काव्यप्रकाराची संकल्पना विशद करून मध्ययुगीन मराठी वाङ्मयात त्याचे वेगळे स्थान कसे होते, ते स्पष्ट केले आहे. महानुभावीय 'पंचकृष्णां'तील अवतारस्वरूप श्रीगोविंदप्रभू यांचे वास्तव्य अमरावती जिल्ह्यातील ऋद्धिपूर येथे होते. त्यांच्यामुळेच ऋद्धिपुराला एका पवित्र क्षेत्राचे स्थान व माहात्म्य प्राप्त झाले. अशा प्रकारच्या मध्ययुगीन मराठीतील अन्य माहात्म्य-ग्रंथांचे अध्ययन, संशोधन व संपादन व्हावे, हाही माझा या ग्रंथाच्या प्रकाशनामागील हेतू होता. त्याचे सूतोवाच मी या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केले आहे.

सांप्रदायिक चरित्र, महाकाव्य, आख्यानकाव्य, बोधकथा, भाष्यग्रंथ याप्रमाणेच बखर-गद्य हेही मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे एक लेणे आहे. त्यातील 'सभासद-बखर' ('श्रीशिवप्रभूंचे चरित्र') आणि 'भाऊसाहेबांची बखर' या अत्यंत लोकप्रिय बखरी असून त्यांची वाङ्मयीन गुणवत्ता आपले लक्ष वेधून घेते. मी या दोन्ही बखरींचे संपादन केले असून त्यांच्या वाङ्मयीन व भाषिक वैशिष्ट्यांचे विवेचन त्या ग्रंथांच्या प्रस्तावनांमध्ये केले आहे. या दोन्ही बखरी म्हणजे मध्ययुगीन मराठी साहित्याचे मानदंडच आहेत. त्यांपैकी एका बखरीची निवड करणे फार अवघड आहे. पण त्यातील एका बखरीचीच निवड करावयाची असल्याने मी पेशवेकालीन 'भाऊसाहेबांच्या बखरी'ची निवड केली आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेत मी या बखरीतील स्वभावचित्रण, वर्णनकौशल्य, रसाविष्कार, समाजदर्शन, पेशवेकालीन भाषेची वैशिष्ट्ये इ. चा परामर्श घेतला आहे. 'सभासद बखर' हीही तितकीच महत्त्वाची असल्याने जिज्ञासूंनी मी संपादिलेल्या त्या बखरीची प्रस्तावनादेखील त्या ग्रंथातून अवश्य वाचावी.

वरील विवेचनावरून मध्ययुगीन मराठीच्या काही ज्ञात! अल्पज्ञात वा अज्ञात मानदंडांच्या स्वरूप-वैशिष्ट्यांची कल्पना येईल व त्यांच्या अध्ययन-अध्यापन-संशोधनास या साधन-ग्रंथामुळे अधिक गती मिळेल, असा विश्वास वाटतो.

❖❖❖

डॉ. यू. म. पठाण
२ आनंदनगर, टाऊन हॉल, औरंगाबाद - ४३१ ००१
फोन : (०२४०) ६५०१९८६, २४०२०८२

मुस्लिम मराठी आत्मकथनाचे स्वरूप

- शीतल चंद्रकांत जाधव

[मराठी मातीशी एकरूप झालेले परंतु 'मुस्लिम' ह्या विशेषणाने आत्मकथन वेगळे होत नाही; तर एकूणच जीवनाचे वैविध्य अनुभवणाऱ्यांनी आत्मकथनाद्वारे आत्मप्रकटीकरण केले आहे. वयाच्या कोणत्याही टप्प्याला ते करता येते. तो आत्मचरित्राचाच एक प्रभावी हिस्सा होऊ शकतो. 'वेगळ्या जीवनानुभवाचे कथन' म्हणून आत्मकथन हा लेखनप्रकार कसा वेगळा असतो; त्याचे हे चित्रण आहे. –संपादक]

इ. स. १३ व्या शतकापासून मुस्लिम मराठी लेखकांनी मराठी साहित्यात लेखन केलेले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये 'मुस्लिम' म्हणून कोणतेच वेगळेपण नसल्याने ते 'मुस्लिम' मराठी साहित्य आहे हे स्पष्ट होत नसे. 'मुस्लिम मराठी साहित्य' ही संकल्पना १९३५ साली सांगली येथील सय्यद अमीन यांनी मांडली तेव्हा 'मुस्लिम मराठी' असे काहीसे वेगळेपण जाणवले. मुस्लिम समाजजीवनाचे चित्रण, मुस्लिम मानसिकता जेव्हा वास्तव पातळीवर लेखकांनी आपल्या साहित्यात मांडली तेव्हा मुस्लिम मराठी साहित्य वेगळे मानले जाऊ लागले.

मराठी आत्मकथनाचे स्वरूप :

मराठी साहित्यामध्ये असणाऱ्या विविध साहित्य प्रकारात प्रत्येक साहित्य प्रकाराची काही खास वैशिष्ट्ये आहेत. कादंबरी, कथा, काव्य, निबंध, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराबरोबर आत्मकथन हा वाङ्मय प्रकार नव्यानेच मराठी वाङ्मयामध्ये आपले मूळ रोवताना दिसतो. तसे पाहिले तर मराठी साहित्यामध्ये आत्मकथन हा साहित्यप्रकार बराच उशिरा रूजलेला आहे. मराठी साहित्यामध्ये असणाऱ्या दलित साहित्याच्या उदयामुळे आत्मकथन या साहित्यप्रकाराला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. दलित साहित्यात आत्मचरित्राच्या लेखन ऊर्मीतून 'आत्मकथन' हा वाङ्मय प्रकार उदय पावलेला आहे. मराठी समाजातील स्त्रिया आणि मुस्लिम साहित्यिकांनी 'आत्मकथन' साहित्यप्रकारात गुणात्मक स्वरूपाचे लेखन केले. त्यांच्या साहित्यिक योगदानामुळे 'आत्मकथन' या साहित्यप्रकारालाही अधिक महत्त्व आले.

आत्मकथन म्हणजे काय ?

आत्मकथन हे एक प्रकारे आत्मचरित्रच असते. या दोन प्रकारात लेखकाच्या लेखनकाळाचा भेद असतो. त्या भेदाला अनुसरून लेखनस्वरूपात फरक होतो. आत्मचरित्रामध्ये लेखकाच्या वयाची मर्यादा असते तसे आत्मकथन लेखकाला वयाची मर्यादा नाही. आत्मकथनामध्ये लिखाण करण्यास प्रौढत्व, वृद्धत्व यांची वाट पहावी लागत नाही. जशी आत्मचरित्र लिहिताना वयाच्या अखेरीस आत्मचरित्र लिहिण्याची इच्छा व्हावी लागते. आपणास काहीतरी सांगायचे हीच प्रेरणा आत्मकथनामागे असते. आत्मकथनांमध्ये प्रिय, अप्रिय व्यक्ती, संस्था, समाज, राजकारण यांचा समावेश 'मी'चा अभ्यास करता होतो. आत्मकथन म्हणजे आयुष्यातील विविध टप्प्यांचे चित्रण करणे, याला वयाची मर्यादा नाही. मराठी साहित्यामध्ये आत्मकथनाचा प्रारंभ १९६० नंतर झालेला आहे.

"१९६० नंतर मध्यमवर्गीय सवर्ण समाजाबाहेर, गावकुसाबाहेर राहणाऱ्या, उपेक्षित, भटक्या, जाती जमातीतील लेखकांनी जी आत्मचरित्रे लिहिली त्यांस 'आत्मकथन' असे म्हटले जाते."[१]

मराठी साहित्यामध्ये दलित आत्मकथनकारांनी आत्मकथने लिहून मराठी साहित्याचे दालन समृद्ध केलेले आहे. त्याचप्रकारे मुस्लिम मराठी साहित्यिकांनी आपले वेगळेपण जपत आत्मकथन या वाङ्मय प्रकारामध्ये वेगळा असा ठसा उमटवलेला आहे. मुस्लिम मराठी साहित्यिकांनी काही मोजकीच आत्मकथने लिहिलेली आहेत. त्यामध्ये पुरुषांनी लिहिलेली आत्मकथने आणि स्त्रियांनी लिहिलेली आत्मकथने असे स्वरूप आहे.

मुस्लिम मराठी लेखकांची आत्मकथने :

मुस्लिम मराठी साहित्यामध्ये मुस्लिम लेखकांनी आत्मकथन या वाङ्मय प्रकारामध्ये आपले वेगळेपण दाखवलेले आहे. मुस्लिम मराठी आत्मकथनकारांची संख्या ही अल्प आहे परंतु वाङ्मयनिर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मुस्लिम मराठी आत्मकथनाची सुरुवात ही कॅप्टन फकीर मोहम्मद जुळवे यांच्या 'माझ्या दर्यावर्दी

अनुक्रमणिका

जीवनातील भरती ओहोटी' या आत्मकथनापासून झालेली आहे. कॅप्टन जुळवे यांची जिद्द, चिकाटी, नवीन काही करण्याची धडपड त्यातून प्रामुख्याने जाणवते. त्याचबरोबर हुसेन जमादार यांचे 'जिहाद' हे आत्मकथन पुण्याच्या मानसन्मान प्रकाशनाने १९९३ साली प्रसिद्ध केले. या आत्मकथनास 'दमाणी पुरस्कार' आणि 'महाराष्ट्र फौंडेशन' असे मराठी साहित्यातील पुरस्कार मिळाले आहेत. समाजातील रूढी परंपरांशी लढणारे 'जिहाद' हे आत्मकथन आहे. अगदी तटस्थवृत्तीने लिहिलेले हे आत्मकथन आहे. लेखकाने प्रत्येक घटना, प्रत्येक प्रसंगाचे, प्रत्येक व्यक्तीचे चित्रण अत्यंत संयमाने, समतोल वृत्तीने केलेले आहे. सुधारणावादी चळवळ ही लेखकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने, चळवळीचा आलेख हा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा तसेच या आत्मकथनाचा केंद्रबिंदू झालेला आहे. या आत्मकथनामध्ये मुस्लिम समाजजीवनाचे, त्यांच्या अंतरंगाचे चित्रण आलेले आहे. मुस्लिम समाजामध्ये असणाऱ्या रूढी, रीती, अंधश्रद्धा, लोकांच्या समजुती यांचे चित्रण आत्मकथांमध्ये आलेले आहे.

'जिहाद' आत्मकथन पाच भागामध्ये लिहिलेले आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारखे काहीतरी समाजासाठी करावे या ध्येयाने प्रेरित होऊन लेखकाची आजपर्यंतची वाटचाल झालेली आहे. मनापासून जे काम लेखकाला करावे वाटते; ते त्यांनी केले. जमादार समाजातील मुस्लिम तलाकपीडित स्त्रियांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना न्याय देण्याचे काम करतात. अनेक तलाकपीडित स्त्रियांच्या असणाऱ्या वेदना, दुःख वास्तव पातळीवर आत्मकथनात मांडलेले आहे. "मुस्लिम समाजातील तलाकाने होरपळलेल्या अनेक स्त्रियांच्या शोकात्म, मूक व्यथा-वेदनांनी भरलेल्या दर्दभऱ्या जीवन कहाण्या या आत्मचरित्राची उंची वाढवतात."[२] असे फ. म. शहाजिंदे म्हणतात. लेखकाने आपल्या आत्मकथनामध्ये अनेक व्यक्तिचित्रे अत्यंत नेटकी आणि कमीतकमी शब्दात रेखाटलेली आहेत.

महार आणि मुस्लिम या दोन जातींच्या मध्ये गुंतून पडलेल्या इब्राहिम खान यांचे 'मुस्लिम महार' हे तीन पिढ्यांचे चित्रण करणारे आत्मकथन आहे. हे आत्मकथन कोल्हापूरच्या 'प्रचार' प्रकाशनाने इ.स. १९९० साली प्रसिद्ध केले आहे. मुस्लिम आणि महार या दोन जातींमुळे लेखकाच्या तीन पिढ्यांची होणारी पिळवणूक, त्यांना मिळणारा हीन दर्जा आत्मकथनाच्या पानापानामध्ये लेखकाने सांगितलेला आहे. 'महार' जात सोडून मुस्लिम धर्म स्वीकारल्यावर होणारी वाताहात येथे पहावयास मिळते.

'जाग्या झालेल्या सावल्या' हे डॉ. अजीज नदाफ यांचे, एका नाट्यकलावंताचे, कलंदर शिक्षकाचे अनुभव सांगणारे आत्मकथन आहे. हे आत्मकथन बावीस प्रकरणांमध्ये लिहिलेले आहे. कथात्मक स्वरूपाचे असे आत्मकथन आहे. महाराष्ट्रातील मराठमोळ्या मुस्लिम माणसाचे जीवन मराठमोळ्या भाषाशैलीतून साकारलेले असे नदाफ यांचे आत्मकथन आहे. शिक्षण, राजकारण, समाजकारण याने आपले क्षितिज रूंदावणारे 'क्षितिजे अपार' हे हुसेन दलवाईंचे आत्मकथन आहे. एका खासदाराचे आत्मकथन आहे. त्यामुळे मुस्लिम मराठी साहित्यामध्ये आत्मकथन या वाङ्मय प्रकाराचे दालन अधिक संपन्न झाले आहे.

मुस्लिम मराठी आत्मकथनांमध्ये इतर भाषेतील अनुवादित आत्मकथने गाजलेली आणि वैशिष्ट्यपूर्ण अशी आहेत. कवी निदा फाजली यांचे 'दिवारोंके बीच में' हे आत्मकथन,कवी इब्राहीम अफगाण यांनी 'हाक' या शीर्षकाने केलेले आहे. राष्ट्रपती अबुल पाकिर जैनुलाबदिन अब्दुल कलाम यांच्या आत्मकथनाचा अनुवाद माधुरी शानभाग यांनी 'अग्निपंख' या नावाने केला आहे.

मुस्लिम मराठी लेखिकांची आत्मकथने :

मुस्लिम मराठी लेखकांनी आत्मकथने लिहून मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले. तसेच मुस्लिम मराठी लेखिकांनीही थोडीफार आत्मकथने लिहून आपले वेगळे असे अस्तित्व निर्माण केलेले आहे. कवयित्री शांतादेवी तडवी यांचे 'संधिप्रकाशात' हे आत्मकथन एकेकाळच्या उत्कृष्ट प्राध्यापिकेचे आत्मकथन आहे. 'काव्य जगावे कसे?' याची प्रात्यक्षिके हे आत्मकथन दाखवते. शांतादेवी तडवी यांची विविध रूपे या आत्मकथनामध्ये येतात. 'मी भरून पावले आहे' हे मेहरून्निसा दलवाई यांचे आत्मकथन आयुष्यभर पतीच्या कार्याला हातभार लावणाऱ्या व त्यातच स्वतःला धन्य मानणाऱ्या लेखिकेचे आहे. हे आत्मकथन ९ ऑगस्ट १९९५ रोजी साधना प्रकाशनाने

प्रसिद्ध केलेले आहे. हमीद दलवाईंविषयी असणाऱ्या आठवणी सरिता पतकींना सांगून त्या 'मी भरून पावले आहे' या आत्मकथनात्मक पुस्तक रूपात सर्वांसमोर मांडलेल आहेत. या आत्मकथनाचा आत्मा हमीद दलवाईंचे व्यक्तिमत्त्व आहे. आत्मकथनाचे जीवित मेहरून्निसा दलवाई आहेत. आत्मकथनामध्ये हमीद दलवाई व मेहरून्निसा दलवाई यांच्या सहवासातील एकोणीस वर्षे सुख-दुःख, ताण-तणाव, हमीद दलवाईंचे जीवघेणे आजारपण आलेले आहे.

हमीद दलवाई समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांना लेखिकेने प्रत्येक प्रसंगामध्ये साथ दिली. त्यांच्या सहचारिणी झाल्या. त्यांच्या प्रत्येक गोष्टीत रस घेऊन त्यांना मानसिक आधार देणाऱ्या फक्त लेखिकाच होत्या. प्रतिभा जावळीकर म्हणतात की, ''मेहरून्निसा दलवाई यांनी लिहिलेले 'मी भरून पावले आहे' हे आत्मकथन समाज सेवेत पतीचा प्रयत्न व लेखिकेने त्यांना दिलेली साथ हे (सामंजस्य) अतिशय मनोज्ञ आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासात पतीने दिलेले योगदान अपूर्व आहे.''[३] लेखिकेचे आत्मकथन आपल्या पतीच्या कार्याची महती सांगण्यासाठी आहे. हमीद दलवाई हे मोठे सामाजिक कार्यकर्ते झाले; ते आपल्या पत्नीमुळे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांनी हमीद दलवाईंना त्यांच्या कार्यासाठी मोकळे सोडले; ज्यामुळे त्यांना दुसरे कोणतेच ताण-तणाव होऊ नयेत म्हणून लेखिका काळजी घेतली. मेहरून्निसा दलवाईंनी घरातल्या आर्थिक व कौटुंबिक कटकटीपासून त्यांना दूर ठेवले. त्यामुळे हमीद दलवाई मोकळेपणाने समाजकार्य करू शकले. लेखिका म्हणते, शेवटी शेवटी ते मला म्हणायचे, ''मेहरू आज मी जो आहे, तो तुझ्यामुळेच आहे.''[४] याच्यातच मी सगळं भरून पावले आहे, असे लेखिका म्हणतात. लेखिकेने केलेले लेखन मोकळेपणाने, प्रामाणिकपणाने कोणत्याही प्रकारची लपवाछपवी न करता जे घडलं, जे सुखदुःख भोगलं ते तसंच्या तसं सांगितलेलं आहे.

श्रीमती खातुनबी बशिरूद्दीन मत्तिकोप यांचे 'खातुन' हे आत्मकथन मध्यमवर्गीय स्त्रीचे जीवन कथन करणारे आहे. 'खातुन' हे आत्मकथन २००० साली प्रकाशित झालेले आहे. या आत्मकथनाची प्रस्तावना डॉ. सरोजिनी बाबर यांनी केलेली आहे. डॉ. बाबर यांची बहीण सौ. शरदिनी मोहिते यांनी प्रस्तावनेच्या आधी थोडं लिहिलेलं आहे. यानंतर स्वतः लेखिकेने मनोगत व्यक्त केलेले आहे. त्यामध्येच 'निमित्त दोन चार...'असे लेखिकेच्या इंजिनिअर मुलाने लिहिलेले आहे. लेखिकेने पंचवीस प्रकरणात विभागून आत्मकथन लिहिलेले आहे.

या आत्मकथनाच्या माध्यमातून भारतीय मुस्लिम स्त्रीने भारतीय गृहिणीची प्रपंचातील कर्तृत्वाची शक्ती किती अफाट असते हे आत्मकथनातून दाखवून दिलेले आहे. माणुसकी या धर्माचा अवलंब करून त्या माणुसकी धर्मानुसार वागणाऱ्या अशा लेखिका आहेत. अनेक जाती धर्मातील हजारो माणसे जोडणाऱ्या अशा लेखिका आपले वेगळेपण दाखवतात. सहजता, सोज्वळता, प्रासादिकता, आत्मियता, आचरणातील सर्वधर्मसमभाव, शालीनता, माणुसकी, साधेपणा, प्रामाणिकपणा, जिद्द, जिकाटी, घर उभारण्याची ऊर्मी, सेवा आणि प्रेम या आत्मकथनामध्ये पावलोपावली जाणवतात. हेच ह्या आत्मकथनाचे वैशिष्ट्य आहे.

आपल्या उद्ध्वस्त जीवनाचे बिनधास्तपणे चित्रण करणाऱ्या मल्लिका अमरशेख यांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' हे आत्मकथन आले. लेखिकेची स्पष्ट व बेधडक निवेदनशैली असल्यामुळे हे आत्मकथन प्रसिद्धीच्या झोतात आले. लेखिकेने कोणताही आडपडदा न ठेवता, कोणाचीही कसलीही भीती न बाळगता वास्तव स्वरूपात आपल्या जीवनातील प्रसंगांचे चित्रण केले. 'स्त्री-पुरुषांच्या आदिम नाट्यातील संबंधाचे नाट्यात्मक असे नागडे चित्रण''[५] या आत्मकथनामध्ये लेखिकेने केलेले आहे, असे फ. म. शहाजिंदे म्हणतात.

मल्लिका अमर शेख यांनी जाती व धर्माबाहेर विवाह करून एक वेगळाच पायंडा पाडलेला आहे. या विवाहामध्ये असणारे ताण-तणाव लेखिकेच्या आत्मकथनामध्ये आलेले आहेत. 'मल्लिका अमरशेख ह्या संवेदनशील कवयित्री असून त्या जातीधर्म इत्यादी भेदांच्या पलिकडे गेलेल्या असल्यामुळे त्यांना त्यांचा मुस्लिम मराठी आत्मचरित्रकार म्हणून केलेला हा उल्लेखही आवडणार नाही,' असे फ. म. शहाजिंदेंना वाटते.

नसीमा हुरजूक यांचे काही वेगळ्या ढंगाचे आत्मकथन आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने 'चाकाची खुर्ची' हे

आत्मकथन २००१ साली प्रसिद्ध केलेले आहे. लेखवजा असणारे आत्मकथन आपले वेगळेपण जपत आहे. स्वतः अपंग असतानाही इतर अपंगांसाठी आपले संपूर्ण जीवन वेचणाऱ्या, अपंगाच्या जीवनात चैतन्य निर्माण करणाऱ्या अशा नसीमा हुरजूक आहेत. लेखिका पॅराप्लेजियाच्या पेशंट (म्हणजे कमरेखालील भागाला संवेदनाच नाही) अशा अवस्थेमध्ये असणाऱ्या लेखिका आपल्या 'चाकाची खुर्ची'च्या साहाय्याने आपली स्वप्ने पूर्ण करतात. आपल्यासारख्या अपंग मुलांचे पुनर्वसन करण्याचे स्वप्न नसीमा हुरजूक प्रत्यक्षात पूर्ण करतात.

'चाकाची खुर्ची' या आत्मकथनामध्ये लेखिकेने केलेला अपंगत्वाशी संघर्ष, त्याचबरोबर अपंगांसाठी उभी केलेली संस्था स्थापन करण्यासाठी केलेला संघर्ष, येथे पहावयास मिळतो. शून्यातून विश्वनिर्मिती करणाऱ्या अशा नसीमा हुरजूक आहेत. स्वतःच्या स्वप्नांना समर्पित केलेले हे आत्मकथन आहे. आत्मकथनामधील व्यक्तिचित्रे ही लक्षणीय व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. साधी सरळ भाषाशैली आहे. एक लोकोत्तर असे नसीमा हुरजूक यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

'भोगले जे दुःख त्याला' हे आशा आपराद यांचे आत्मकथन आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे यांनी प्रकाशित केलेले हे आत्मकथन आहे. महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार मिळालेले हे पुस्तक परिस्थितीशी, काळाशी झगडणाऱ्या अशा आपराद यांचे आहे. "आयुष्यात येणाऱ्या संकटांशी सामना करत लढत राहिलं तर जगणं मनासरखं जगता येतं हा संदेश देणाऱ्या या आशा आपराद यांचं हे मनोगत आहे,"[६] असे शीतल महाजनी म्हणतात. सामान्य मुस्लिम कुटुबांतत लहानाच्या मोठ्या झालेल्या, लेखिका वयाच्या एकोणिसाव्या वर्षी चार मुलींची आई होतात. अशा लेखिकेचे आत्मकथन मनाला चटका लावून जाते. जे भोगलं ते लिहिणारी ही लेखिका आहे. त्यामुळे लेखिकेला पश्चात्ताप करून घेण्याचा प्रश्नच आलेला नाही. हे आत्मकथन अनेकांना जगण्याची प्रेरणा देणारे ठरते. कारण लेखिकेने सोसलेल्या हाल अपेष्टा, त्यातून शिक्षणाची असणारी आवड, ती आवड जपून त्या जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण करतात व कोल्हापूर येथे प्राध्यापकाची नोकरी करतात. दारिद्र्य, प्रत्यक्ष जन्मदात्रीचा वैरभाव, अल्पवयातील मातृत्व, शिक्षणाची आस अशा संघर्षाच्या अनेक आघाड्यांवर एकाकी झुंज देऊन आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या निभिंड व प्रामाणिक लेखिकेचे हे आत्मकथन वाचकांच्या मनाचा ठाव घेतेच; पण अस्वस्थ करून जगणे झुंजण्याची ताकद देणारे एका खास उंचीला पोहचलेले हे आत्मकथन आहे. या आत्मचरित्राला आतापर्यंत अत्यंत प्रतिष्ठेचे सात पुरस्कार मिळाले आहेत. त्यात महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार, दिल्लीचा काकासाहेब गाडगीळ मातृपितृ पुरस्कार, सोलापूरचा भैरव रतन दमाणी पुरस्कार, लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार अशा दर्जेदार संस्थांच्या पुरस्कारांचा जणू वर्षावच झालेला आहे.

तात्पर्य, मराठी मुलुखात पिढ्यान् पिढ्या वास्तव्य करून मराठी बनलेल्या व मनाने पुरते भारतीय झालेल्या मुस्लिम साहित्यिकांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण साहित्य निर्मितीने मराठी साहित्याला समृद्ध केले आहे आणि 'मुस्लिम मराठी साहित्य' म्हणून एक वेगळे दालन समृद्ध होत आहे.

निष्कर्ष :

मुस्लिम मराठी साहित्याचा समावेश मराठी साहित्यात प्रारंभापासून झालेला आहे. १९३५ मध्ये अमीन सय्यद यांनी मुस्लिम मराठी साहित्याची संकल्पना मांडली.

मराठी साहित्यात 'आत्मकथन' हा साहित्यप्रकार साठच्या दशकात दलित साहित्यात मोठ्या प्रमाणावर लिहिला गेला.

दलित साहित्याच्या प्रभावामुळे स्त्रिया, शूद्र आणि अल्पसंख्यांक समाजाला साहित्यात आत्मप्रकटीकरणाचे बळ मिळाले. त्यामुळे आत्मकथन साहित्यप्रकार मराठी साहित्यात जाणीवपूर्वक लिहिला जाऊ लागला. आत्मकथनाची संकल्पना-व्याख्या अधिक स्पष्ट झाली.

कॅप्टन फकीद मुहंमद जुवळे यांचे 'माझ्या दर्यावर्दी जीवनातील भरती ओहोटी' हे आत्मकथन मुस्लिम मराठी साहित्यातील पहिले आत्मकथन होय.

हुसेन जमादार, हमीद दलवाई, फ. म. शहाजिंदे, इब्राहिम खान, डॉ. अजीज नदाफ, निदा फाजली इत्यादि लेखकांची आत्मकथने मुस्लिम मराठी साहित्यात वेधक ठरली.

शांतादेवी तडवी, मेहरूनिसा दलवाई, खातुनबी बशीरूद्दीन मत्तिकोप, मल्लिका अमर शेख आणि आशा

अपराद या मुस्लिम मराठी लेखिकांनी आपल्या आत्मकथनलेखनाने मराठी साहित्यात योगदान केले आहे.

नसीमा हुरजूक यांचे 'चाकाची खुर्ची' हे एक वैशिष्ट्यपूर्ण मुस्लिम मराठी आत्मकथन आहे. एक अपंग, झुंजार व समाजसेवी मुस्लिम स्त्रीची ती तेजस्वी जीवनकहाणी आहे.

भारतीय मराठी मुस्लिमांनी लिहिलेल्या साहित्याला आज मुस्लिम मराठी साहित्य म्हणून ओळखले जाते. दर्जेदार साहित्यनिर्मिती हा या साहित्याचा विशेष बनला आहे. मराठीतील सर्व साहित्य प्रकारात मुस्लिम मराठी साहित्यिक निर्मिती करीत आहेत.

संदर्भ :

१) वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोष, पृ. क. १०३.
२) फ. म. शहाजिंदे - 'मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखक सूची', प्रकाशक : दयानंद शेटगार, व्यवस्थापक, भूमी प्रकाशन, २१, कृषिनगर, विराट हनुमानाच्या मागे, रिंग रोड, लातूर, पहिली आवृत्ती, २००४, पृ. कृ. २१९.
३) प्रतिभा जावळीकर - 'आत्मभान', प्रकाशक : अशोक कि. कुमठेकर, रजत प्रकाशन, ११८, मैथिली टॉवर्स, वीर सावरकर चौक, टिळकनगर, औरंगाबाद, आवृत्ती - पहिली, २० सप्टेंबर २००९, पृ. कृ. ४७.
४) मेहरुन्निसा दलवाई - 'मी भरून पावले आहे,' प्रकाशक : साधना प्रकाशन, ४३१, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०, आवृत्ती तिसरी, ८ मार्च २०००, प्रस्तावना, पृ. क्र. १०..
५) फ. म. शहाजिंदे - 'मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखक सूची', प्रकाशक : दयानंद शेटगार, व्यवस्थापक, भूमी प्रकाशन, २१, कृषिनगर, विराट हनुमानाच्या मागे, रिंग रोड, लातूर, पहिली आवृत्ती, २००४, पृ. क्र. २४८.
६) तनिष्का (मासिक) - सकाळ पेपर्स लिमिटेडचे प्रकाशन, वर्ष - ४, अंक - ५, मूळ संपादक - उत्तम मारूती कांबळे, जानेवारी २०१०, पृ. क्र. ८.

संदर्भग्रंथ सूची

१) संपादक : प्रा. चंद्रकुमार नलगे, डॉ. गंगाधर पानतावणे - स्त्री आत्मकथन
२) अ. म. जोशी - चरित्र-आत्मचरित्र
३) महेबूब सय्यद - मुस्लिम मराठी साहित्य : एक आकलन
४) वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश
५) प्रतिभा जावळीकर - आत्मभान
६) मेहरून्निसा दलवाई - मी भरून पावले आहे
७) फ. म. शहाजिंदे - मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप.

❖❖❖

शीतल चंद्रकांत जाधव
मु. पो. उंब्रज, भैरोबा गल्ली, ता. कराड, जि. सातारा.

नवे आजीव सभासद

१) बडे भागिनाथ नामदेव, पाथर्डी
२) ईधाटे संजीव सतीश, पाथर्डी
३) गोखले वसंत रामचंद्र, पुणे
४) हिंगे पद्नाभ प्रभाकर, पुणे
५) गिरी घनश्याम आनंदराव, राजापूर
६) मते हनुमंत बाजीराव, सोलापूर
७) पुजारी सुनील श्रीमंतराव, सोलापूर
८) मुरूडकर (झेंडेवाले) गिरीश पद्माकर, पुणे
९) मुंजाळ महेंद्र, पुणे
१०) कोपर्डेकर प्रदीप गणपतराव, पुणे
११) महाजन मधुकर गोविंद, पुणे
१२) जाधव शैल-शिल्पा अरूण, अक्कलकोट
१३) जाधव अरुण काशिनाथ, अक्कलकोट
१४) जाधव किरण काशिनाथ, अक्कलकोट
१५) हरवाळकर स्वामीनाथ यशवंत, अक्कलकोट
१६) हरवाळकर पुष्पा स्वामीनाथ, अक्कलकोट
१७) पाटील सपना उल्हास, अक्कलकोट
१८) पांढरे विद्युलता ज्ञानेश्वर, अक्कलकोट
१९) सूर्यवंशी टिप्रामजी शंकरराव, अक्कलकोट
२०) हळगोद शिवपुत्र गिरेप्पा, अक्कलकोट
२१) वळसंगकर अ. शहिद गुलावबराव, अक्कलकोट
२२) नागनाळीकर म. रफीक महिबूबसाहेब, अक्कलकोट
२३) शहा प्रशांत रमेशचंद्र, अक्कलकोट
२४) शहा पराग अरविंद, अक्कलकोट
२५) शहा निनाद कैलासचंद्र, अक्कलकोट
२६) साठे भीमराव धोंडिबा, अक्कलकोट
२७) पवार शंकर बाबूराव, अक्कलकोट
२८) झिपरे श्रीकांत महादेव, अक्कलकोट
२९) भोसले सुरेश शिवाजीराव, अक्कलकोट
३०) बावर दत्तात्रय रामचंद्र, अक्कलकोट
३१) शिंपी दिनकर देविदास, अक्कलकोट
३२) सिरसाटे महादेव धोंडिबा, अक्कलकोट
३३) खोबरे अभय गुणधर, अक्कलकोट
३४) हतुर ईरप्पा राचप्पा, अक्कलकोट
३५) काळे सिद्धराम मल्लपा, अक्कलकोट
३६) दिवटे विश्वनाथ सायबप्पा, अक्कलकोट
३७) भकर गौरीशंकर शरणप्पा, अक्कलकोट
३८) पडवळकर रमेश श्रीधर, अक्कलकोट
३९) सुरवसे संजिवनी नागनाथ, अक्कलकोट
४०) सुरवसे नागनाथ शंकर, अक्कलकोट
४१) गायकवाड राहुल विठ्ठल, अक्कलकोट
४२) निंबाळकर बापूजी बळी, अक्कलकोट
४३) सुरवसे स्वामीराव बळी, अक्कलकोट
४४) बोरगांवकर अनिल गोपाळराव, अक्कलकोट
४५) बोरगावकर इंद्रजीत अनिल, अक्कलकोट

एकनाथांचा कृष्ण

- शीला निपुणगे

[सगुण–साकाराच्या आधाराने निर्गुण–निराकाराला जवळ करणारी भक्ती संप्रदायाची चळवळ अनन्यसाधारण आहे. वारकऱ्याच्या वारीची ही सुबोध वाटचाल निर्मळ मनाचा आविष्कार आहे. त्या वाटचालीतलाच हा नाथांचा कृष्ण !

–संपादक]

अखिल भारतीयांचे परम दैवत असलेला श्रीकृष्ण हा समस्त संतमंडळींचाही अतिशय लाडका होता. बहुतेक सर्व संतांनी कृष्णभक्तिपर वेधक रचना केल्या आहेत. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांची पदे, विराण्या यांमधून या भक्तिप्रेमाचा उत्कट प्रत्यय येतोच. त्याआधी बारा-तेराव्या शतकात महानुभाव पंथातील 'महदाइसा' या मराठीतील आद्य कवयित्रीने 'महदंबेचे धवळे' रचून कृष्णकौतुक केले. 'धवळे' म्हणजे 'धवलगीत' किंवा 'वरप्रशस्तीचे विवाहगीत'. महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांचे गुरु 'श्रीगोविंदप्रभु' यांच्या सांगण्यावरून महदंबेने हे धवळे रचून कृष्णोत्सवात म्हटले. हीच परंपरा मौखिक तसेच लिखित स्वरूपात आश्चर्यकारकरीत्या पुढे चालू राहिली.

पंधराव्या शतकात, एकनाथांचे पणजोबा संत भानुदास (जन्म - १४४८) यांनी कृष्णप्रीतीतून लोभस पदे लिहिलेली दिसतात.

'वृंदावनीं वेणु कवणाचा माये वाजे
तेणें नादें गोवर्धनु गाजे'

हे त्यांचे भावमधुर पद आजही लोकप्रिय आहे.

भानुदासांच्या याच प्रेमभक्तीला संत एकनाथांनी समाजहिताची जोड दिली. जनमानसात रुजलेल्या कृष्णभक्तीतूनच त्यांनी समाजाचे उन्नयन केले. त्यांनी रचलेल्या असंख्य पदे, भारुडे, गवळणी अशा वैविध्यपूर्ण, अभिनव रचनांमधून विशुद्ध भक्तिभावनेबरोबरच नाथांच्या अलौकिक प्रतिभासामर्थ्याचीही प्रचिती येते.

एकनाथांच्या श्रीकृष्णविषयक काव्यातून तान्ह्या बाळकृष्णापासून योगेश्वर श्रीकृष्णापर्यंत विविध कृष्णरूपांचे हृदयंगम दर्शन घडते.

'ऐक ऐक सखये बाईऽऽ नवल मी सांगूं काईं ।
त्रैलोक्याचा धनी तो हा यशोदेसी म्हणतो आई ॥'

अशी अल्पाक्षरी. मनोरम तरीही आशयघन रचना एकनाथ लीलया करून जातात.

कृष्णाच्या लौकिक रुपाचे वर्णन करतानाच एकनाथ त्याच्या असामान्यत्वाचेही गुणगान करतात-

'देवकीने वाहिला ऽऽ यशोदेने पाळिला ।
पांडवांचा बंदीजन होऊनियां राहिला ॥
ब्रह्मांडाची साठवण योगीयांचें निज धन ।
चोरी केली म्हणऊन उखळासी बंधन ॥

इतक्या सहजतेने कृष्णाचे विश्वरूप ते साकार करतात.

'सकळ तीर्थें जया चरणीं सुलभ हा शूलपाणी ।
राधिकेसी म्हणतो तुझी करीन मी वेणीफणी ।...'

राधा-कृष्ण प्रीतीला परतत्त्वाचा असा दिव्योदात्त स्पर्श देतानाच साध्यासुध्या गुरेराखी सवंगड्यांमध्ये रमणाऱ्या प्रेमळ कान्ह्याचे गोपरूप एकनाथ चितारतात-

'शरण एका जनार्दनीं कैवल्याचा मोक्षदानी ।
गाईगोप गोपबाळां मेळविलें आपुलेपणीं ॥'

गोपवेषातील हा 'गवळ्याचा पोर' साक्षात् कैवल्यदानी आहे. याची ग्वाही अशा पदांमधून मिळत राहते.

एकनाथांच्या बाळकृष्णविषयक रचनांमधून यशोदेचे मातृहृदय, त्याच्या काळजीने कळवळणारे तिचे मातेचे मन, गोपींच्या तक्रारींवर तिने दिलेल्या प्रतिक्रिया यांचे भावरम्य चित्रण येते-

'माझा कृष्ण देखिला काय ।
कोणि तरी सांगा रे (गे बाई) ॥'

अशी यशोदेच्या मनाची आकुल अवस्था वर्णितानाच एकनाथ महाराज म्हणतात-

'हातीं घेऊनियां फूल । अंगणिं रांगत आलें मूल ।
होते सारवीत चूल । कैसी भूल पडियेली ॥'

हातात फूल घेऊन रांगत रांगत अंगणात येणाऱ्या या बालकृष्णाचे रूप आहे तरी कसे ?

'माथां शोभे पिंपळपान । मेघवर्ण ऐसा जाण ।
त्याला म्हणती श्रीभगवान । योगी-ध्यान-विश्रांति ॥'

अनुक्रमणिका

माथ्यावर पिंपळपान धारण केलेला हा मेघःश्याम बालकृष्ण म्हणजे योगीजनांचे विश्रांतिस्थान आहे. साक्षात् श्रीभगवान आहे.

चराचराला व्यापून उरलेला हा ब्रह्मांडानायक गोकुळात मात्र गोपबाळांसमवेत क्रीडा करतो.

'संगें घेऊनि गोपाळ । बाळ खेळे अळुमाळ ।
पायीं पोल्हारे झळाळ । गळां माळ वैजयंती ॥...'

पायात झळाळणारे वाळे-साखळ्या, गळ्यात वैजयंती माळा घातलेला हा सुकुमार बाळकृष्ण गोपसख्यांना घेऊन नाना खेळ खेळतो. आपल्या या 'अळुमाळ' बाळाला शोधण्यासाठी यशोदामाता मग गोकुळात घरोघरी जाते-

'एका जनार्दनीं माय । घरोघराप्रती जाय ।
कृष्णा जाणावे ते काय । कोणी सांगा गे ॥'

कृष्णाचे हे वेल्हाळ रूप- खरे तर- जाणण्याच्या पलीकडचेच. 'कानडा' विठ्ठल म्हणजेच हा कृष्ण ही खूण सर्वच विठ्ठलभक्तांना मनोमन पटलेली आहे.

यशोदेच्या उत्कट कृष्णप्रेमाप्रमाणेच गोपींच्या 'कान्ह्या'विषयीच्या तक्रारींचे, लटक्या राग-रुसव्याचे चित्रणही एकनाथ बहारीने करतात. कृष्णाविषयीच्या अथांग भक्ति-प्रीतीतून आलेल्या गोपींच्या या विविध विभ्रमांचे दर्शन एकनाथांनी लिहिलेल्या अनेक गवळणींमधून घडते.

कृष्णाच्या खोड्यांनी त्रासून गेलेल्या गोपी जेव्हा नंद-यशोदेकडे त्याचे गाऱ्हाणे घेऊन येतात, तेव्हाही त्यातून त्यांच्या मनातील अतूट भावभक्तीच प्रतीत होताना दिसते.

'कृष्णाला भुलविलें गोपीनें' असे मिष्किलपणे सांगतानाच एकनाथ महाराज गोपींचे गाऱ्हाणे मांडतात-

'यशोदे, तुझा कान्हा हा राहिना, मी मारिन क्रोधानें
नंदजि, तुमचा कृष्ण लाडका, हांका मारिन मोठ्यानें ।
'वेताटि घेउन नावेंत बैसला, वांचविलें देवानें ।
एका जनार्दनीं पूर्ण कृपेनें, नाहिं ऐकिलें मातेनें ॥'

गोपींची गाऱ्हाणी यशोदा कानाआड करते आणि कृष्णाची बाजू घेऊन तो कसा निर्व्याज आहे हे पुनःपुन्हा पटवून देते, हे सारेच मोठे मोहक आहे; कारण गोकुळात, मनुष्यजन्मात वावरणारा कृष्ण हा 'वैकुंठीचा राणा' आहे याची खात्री त्या सर्वांनाच आहे.

एकनाथांच्या 'गवळणी' हा त्यांच्या गीतरूप वाङ्मयाचा लक्षणीय विशेष तर आहेच; शिवाय त्यांमधून विविध मनोभावनांचे पदर अलगद उलगडत जातात. मुग्ध शृंगार, विप्रलंभ शृंगार यांबरोबरच धीटपणा तसेच प्रीतीची उघड याचनाही त्यांमध्ये आहे-

'हरि माझ्या मंदिरिं कधिं तरी याल् ॥धृ.॥
येतां जातां रोखोनि पाहतां वाइट तुमची चाल्
मंचकिं शेज पुष्पांची केली. परिमळु सुगंधि घ्याल् ॥'

पण या शृंगारिक वर्णनानंतर शेवटी-

'एका जनार्दनिं पूर्ण कृपेनें मोक्षपदासी न्याल्'

अशी सायुज्यमुक्तीची आसच प्रकट होते.

उत्कटता, सहजता, गेयता, लयबद्धता, शब्दलावण्य, शैलीसुंदरता या सर्वांना व्यापून उरलेली परमार्थप्रवणता यांचा सुखद प्रत्यय विस्मयकारकरीत्या नाथांच्या गवळणींमधून येत राहतो. याच उत्कटतेतून-

'मशि बोल किं रे गिरिधारी । नटनाटक मोठा हरी ॥'

अशी लाडिक विनवणी, लटक्या रुसव्यातून राधा करते, त्यावेळी राधा-कृष्ण संवादातूनही एकनाथ बहार आणतात-

'कृष्णा गुज गुज गोकुळीं उठली ।
तुझी माझी संगत तुटली ।
तुझ्या भुललें मंजुळ बोला ।
तुझ्यापायिं जिव अर्पण केला ।'

असे राधा काकुळतीने आणि उद्वेगाने म्हणते, त्यावर-

'राधे घडिघडिघडि भरुं नको रागें ।
एवढा क्रोध सांडी मागें ॥'

अशी समजावणी कृष्ण करतो. तरीही-

'कृष्णा काय करूं दैवाला ?
कुण्या सवतिनें घातच केला ॥'

असे राधा व्यथित होऊन म्हणते तेव्हा तिची व्यथा तो जाणतो. जीव-शिव एकरूप होतात. नाथ म्हणतात-

'मन मिळालें ऐसें मना । एका भुलला जनार्दना ॥'

अर्थपूर्णतेबरोबरच गेयता-लयबद्धता यांमुळे एकनाथांच्या गवळणी लोकांना विलयण मोहित करून गेल्या आणि मग शर्करावगुंठित गोळीप्रमाणे त्यांनी पारमार्थिक तत्त्व जनमानसापर्यंत पोहोचविले.

'कैशि जाऊं मी वृंदावना । मुरली वाजवितो कान्हा ।'

अशा आजही रसिकमनांना मोहविणाऱ्या गवळणीमध्ये-

'कासे पीतांबर, कस्तुरी टिळा, कुंडल शोभे काना ।...

पैलतिरी हरी वाजवी मुरली, नदि भरली यमुना ॥'

असे आकर्षक वर्णन येते, त्याचबरोबर-

'काय करूं मी कवणाला सांगू
हरिनामाची सांगड आणा ॥'

अशी पारमार्थिक प्रतिमा एकनाथ सहजी योजतात- तीही त्यातील आर्ततेला अजिबात धक्का न लावता ! आणि त्यातूनच मग-

'नंदाच्या हरीने कौतुक केलें अंतरीं जाणे खुणा ॥'

अशी सहजखूण पटते. द्वैत सरते. जीवात्म्याचे परमात्म्याशी मीलन घडवू पाहणाऱ्या या रचनांमधून एकनाथांचे प्रातिभ सामर्थ्य नव्याने प्रत्ययाला येत राहते.

कृष्णभेटीसाठी तळमळणाऱ्या सासुरवाशी गोपींचे हृद्गत एकनाथ तितक्याच हृद्यतेने मांडतात-

'अरे कृष्णा तुझी मुरली देखिली मी आज
यमुनेच्या वाटे दृष्टी पडली सहज
कुंजवनामध्ये झोंबी खेळूं पाहसी आज
जाते शुद्ध पंथा कृष्णा आडविशी कान्हा ॥'

असे विशुद्ध भक्तिभावातून म्हणणारी ही सासुरवाशीण- द्वैत सासरा, क्रूरदृष्टी सासू, कोपिष्ट पती असा 'घरच्या' जाचाचा पाढा वाचते आणि-

'घरीं जाच दारीं जाच तुझा पुरवला
दोहोंपरीस आणिक तिसरा मुरलीचा झाला'

अशी लटकी तक्रारही करते. अर्थात् माया-मोहाच्या जंजाळातून सुटण्याची तिची धडपडच एकनाथ यातून दाखवितात-

'तुजवीण संसार मज झाला पाठमोरा
तुझ्या मुरलीने माझा बुडवीला थारा
तिच्या नादें ऐसें वाटे व्यर्थ हा पसारा
एका जनार्दनीं साऱ्या झाल्या येरझारा ॥'

संसार, शेवटी असारच आहे. जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्तता हवी असेल, तर जीव कृष्णाकडेच लावला पाहिजे; हे अंतिम तत्त्व नाथ येथे किती खुबीने मांडतात !

'अरे कृष्णा अरे कान्हा मनरंजना मोहना ।'

असे आंतरिक प्रेरणेतून कृष्णाला उत्कटतेने संबोधून एकनाथ लोकांना, 'जगात कसे वागावे' याचा वस्तुपाठ घालून देतात.

'ऊंस गोड झाला म्हणुनि काय, मुळापासोनि खावा
प्रीतीचा पाहुणा झाला म्हणुनि काय, फार दिवस राहावा'

असे रोखठोक सवाल विचारून, अशा पदांमध्ये एकनाथ व्यवहाराशी परमार्थाचा अलगद मेळ घालून टाकतात.

विरोधाभासातून कृष्ण कौतुक करणारी नाथांची एक ठसकेबाज रचना आहे. तिचा उल्लेख केला नाही, तर हा लेख अपूर्ण राहील.

'असा कसा देवाचा देव बाई ठकडा ।
देव एका पायाने लंगडा ग बाइ ॥'

देवघरातला बाळकृष्ण लंगडा, तसाच तो 'ठकडा' ही! या लबाडाच्या खोड्या किती म्हणून वर्णाव्यात ?-

'गवळ्याघरीं जातो । दहींदूध खातो ।
करि दह्यादुधाचा रबडा ग बाइ ॥
शिंकेंचि तोडितो । मडकेंचि फोडितो ।
पाडि नवनीताचा तो सडा ग बाइ ॥

अशा चित्रमयतेने एकनाथ कृष्णलीला कथन करीत जातात; पण हाच खट्याळ, खोडकर, व्रात्य कान्हा वाळवंटात जातो, तेव्हा तेथे कीर्तनरंगात रंगतो, इतकेच नव्हे; तर साधुसंतांशी आवेशाने वादविवाद (शास्त्र चर्चाही) करतो.

'वाळवंटीं जातो । कीर्तन करितो ।
घेतो साधुसंतांशी झगडा ग बाइ ॥'

इथवर कृष्णक्रीडा सांगताना सांभाळलेला ठसका शेवटी मात्र वत्सलभक्तीत विलीन होऊन जातो. एका भिक्षेकरणीचे, जोगिणीचे रूपक योजून एकनाथ शेवटी म्हणतात-

'एका जनार्दनिं । भिक्षा वाढा बाइ ।
देव एकनाथाचा बचडा ग बाइ ॥'

भारुडे, गवळणी, पदे, जोहार, अर्जदास्त अशा नानाविध गद्य-पद्यरूप वाङ्मयातून एकनाथांनी सतत जनजागरण केले. जनार्दनस्वामींच्या प्रेरणेने 'चतुःश्लोकी भागवत' आणि 'एकनाथी भागवत' हे दोन महत्त्वाचे ग्रंथ सिद्ध केल्यानंतर नाथांनी 'रुक्मिणी-स्वयंवर' हे पौराणिक आख्यानकाव्य लिहिले. यातील सतराव्या अध्यायात त्यांनी 'जीव' आणि 'शिव' यांचे लग्न लावले आहे आणि शेवटच्या अठराव्या अध्यायात 'बोधा'च्या खांद्यावर कृष्णाला बसवून आणि 'देहाभिमाना'च्या कडेवर रुक्मिणीला देऊन, झेंडा नाचवून ही मंगलकथा पूर्ण केली.

(पान क्र. २६ वर पहा...

देवनागरी लिपीत अक्षरक्रम (किंवा अक्षरावली) देण्याची एक पद्धत

शरद कृष्णाजी बोडस

[श्री. बोडस यांनी मराठीचा व्यावहारिक वापर करताना येणाऱ्या अडचणींचा विचार करून अक्षरक्रमाबाबत सुचविलेल्या उपायांवर वाचकांचे आणखी काही विचार असल्यास कळवावेत. विशेषतः 'कॅपिटल' आणि 'स्मॉल' अक्षरे देवनागरीत आणता येतील काय ? – संपादक]

१. एखाद्या प्रश्नात किंवा उत्तरात बरेच पर्याय असतील तेव्हा, तसेच एखाद्या खेळात/स्पर्धेत बरेच संघ/चमू असतील तेव्हा; अक्षरक्रम देण्याची जरूरी भासते. अशावेळी आपण इंग्रजी अक्षरक्रम A, B, C, D, E, F, G, H वापरतो. यातील अक्षरांचे मराठीकरण करून, कधीकधी आपण पुढील अक्षरक्रम वापरतो : अ, ब, क, ड, इ, फ, ग, ह. पण अक्षरक्रम आणखी थोडा लांबवायचा झाल्यास, अडचणी येतील. उदा. : C साठी क लिहिल्यानंतर K साठी काय ? Q साठी काय ? V व W साठी काय ? शिवाय मराठीत स्वतःचा अक्षरक्रम हवाच ना !

२. आपण देवनागरी लिपीतील अक्षरे स्वतंत्रपणे घेऊन जर एक पूर्णपणे नवा अक्षरक्रम बनविला; तर जास्त सोयीस्कर व तर्कसुसंगत होईल. मराठी न म्हणता देवनागरी म्हणण्याचे कारण हे की, हा अक्षरक्रम लोकप्रिय झाल्यास, हिंदी भाषकही याचा स्वीकार करतील. (हे स्वप्न चांगलेच आहे !)

३. मी नागपूरला शाळेत शिकत असताना संस्कृत व मराठी शिकविणारे आमचे मास्तर, श्री. पाठक प्रश्नपत्रिकेत पुढील प्रकारचे अक्षरक्रम वापरीत. म, नो, ह, र... क, म, ल .... अ, र, विं, द .... श्री, रा, म ... शं, क, र, पु, त्र .... असे अक्षरक्रम गमतीदार वाटले तरी, एकसूत्रीपणा नसल्याने, ते सरसकट कायमस्वरूपी वापरता येणार नाहीत. असे अक्षरक्रम नियमबद्ध करता येणार नाहीत.

४. आपल्या गरजेनुसार छोटी-मोठी एकके (युनिट) आपण वापरतो. उदा. विद्यालयात भूमितीय आकृत्या काढताना किंवा पर्जन्यमान सांगताना आपण मिलिमिटर व सेंटीमीटर ही एकके वापरतो. पण प्रवासातील अंतरे सांगताना किलोमीटर हे एकक वापरतो. यानुसार देवनागरी अक्षरक्रम (अक्षरावली) असा लवचिक असला पाहिजे की, तो आपल्या गरजेनुसार छोटा किंवा मोठा निवडून आपण वापरू शकू.

५. देवनागरी अक्षरक्रम (अक्षरावली) लोकप्रिय/लोकमान्य करायचा असल्यास, सर्व स्तरातील लोकांचा विचार करावा लागेल. साक्षर वा अल्पशिक्षित लोकांना असा नवा अक्षरक्रम सोयीचा वाटला पाहिजे. तसेच देवनागरीत लिखाण करणाऱ्या अमराठी भाषकांनाही हा सोयिस्कर वाटला पाहिजे. जेथे जेथे देवनागरी लिपी वापरली जाईल, तेथे तेथे हा अक्षरक्रम पोचला पाहिजे, आणि वापरला गेला पाहिजे. सरकारी पातळीवरही हा वापरात आला पाहिजे. पुढील प्रकारच्या साहित्य संस्थांनी यात रस घेतल्यास, हे काम लवकर व व्यवस्थितपणे पार पडेल :

महाराष्ट्र साहित्य परिषद (मसाप), पुणे/विदर्भ साहित्य संघ, नागपूर,/मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद,/महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

६. हा अक्षरक्रम (अक्षरावली) बनविताना पुढील पथ्ये पाळली आहेत :

क. (पथ्य क्रमांक एक) : **श, ष, स,** या तीन अक्षरांमधील फरक बऱ्याच जणांच्या लक्षात येत/रहात नाही. यास्तव ही तिन्ही अक्षरे न वापरता, यापैकी एकच अक्षर वापरावे. तसेच **व, ब** मध्ये घोटाळा होऊ शकतो. म्हणून या दोन अक्षरांऐवजी फक्त एकच घ्यावे.

अनुक्रमणिका

च. (पथ्य क्रमांक दोन) : इकार व ऊकार यातील ऱ्हस्व वा दीर्घ बऱ्याच जणांना गोंधळात टाकतात. यास्तव नव्या अक्षरक्रमात 'ऱ्हस्व-दीर्घ' हा फरक ठेवायचाच नाही.

ट. (पथ्य क्रमांक तीन) : श्री, ऋ, ऌ, ङ्, ञ, ण, ळ, क्ष, ज्ञ ही अक्षरे बऱ्याच जणांना अडचणीची वाटतात. यास्तव ही सर्व अक्षरे, आपल्या अक्षरक्रमात नसावीत.

त. (पथ्य क्रमांक चार) : अल्पशिक्षित मराठी भाषक आणि इतर बरेच अमराठी भाषक, - 'ह' हे अक्षर पहिल्या हलन्त्य व्यंजनाबरोबर आल्यास, उच्चार पूर्ण नीट करीत नाहीत. उदा. **क-ख** जोडीतील ख (क्+ह=ख). अशाच आणखी जोड्या **ग-घ, च-छ, ज-झ, ट-ठ, ड-ढ, त-थ, द-ध, प-फ, ब-भ.**

माझ्या माहितीनुसार तमीळ लिपीत वरील जोड्यांमधील दोन्हींचा एकच अक्षर आहे. जसे **क-ख** या दोन्हींना एकच अक्षर आहे. याचाही विचार व्हायला हवा.

७. वरील सर्व मुद्दे विचारात घेऊन, पुढील छोटे/मोठे देवनागरी अक्षरक्रम (अक्षरावल्या) मी सुचवितो :

क. छोटा अक्षरक्रम : अ, क, च, ट, त, प, य, श ... एकूण आठ अक्षरे. या व्यवस्थेत प्रत्येक वर्गातील पहिले अक्षर घेतले आहे.

च. मध्यम लांबीचा अक्षरक्रम : (वरील **क, ट, त** ही तिन्ही पथ्ये पाळली आहेत) : अ, क, ग, च, ज, ट, ड, त, द, न, प, ब, म, य, र, ल, श, ह... एकूण अठरा अक्षरे.

८. वरील दोन अक्षरक्रम पुरेसे मोठे आहेत. दैनंदिन व्यवहारात किंवा घटनेची/कायद्याची पोटकलमे लिहिताना यापेक्षा मोठ्या अक्षरक्रमाची जरूर भासणार नाही. तरीपण अपवादात्मक परिस्थितीत यापेक्षाही बऱ्याच मोठ्या अक्षरक्रमाची जरूर भासू शकते.उदा. एखाद्या स्पर्धेत सहभागी स्पर्धक संघांची संख्या मोठी असू शकते. नुकत्याच झालेल्या वर्ल्डकप हॉकी आणि वर्ल्डकप फुटबॉल मध्ये भाग घेतलेल्या संघांची संख्या (प्रत्येक खेळात) ४८ होती.

९. केवळ ही पद्धत परिपूर्ण असावी म्हणूनच खूप लांब अक्षरक्रम देत आहे. प्रचंड मोठा अक्षरक्रम बनविणे सोपे आहे. वरील १८ अक्षरांच्या मोठ्या अक्षरक्रमातील प्रत्येक अक्षराची बाराखडी घेतल्यास हे सहज जमेल. याकरिता आपल्याला संपूर्ण बाराखडी घेऊन चालणार नाही. पथ्य **'च'** लक्षात घ्यावे लागेल. उदा. क च्या बाराखडीतील पुढील सहा अक्षरे घेता येतील.

'क का कि कू के को'.

टीप : **के आणि कै** ही दोन्ही अक्षरे घेणे जाणीवपूर्वक टाळले आहे. एक/दोन मात्रा घेताना चूक होऊ शकते. यातील फक्त के हेच अक्षर घेतले आहे.

तसेच **कं आणि क:** हीही अक्षरे गाळली आहेत. यांच्या लिहिण्यात व विशेषतः उच्चारणात चूक होऊ शकते. शिवाय बाराखडीच्या बाहेरील **कृ आणि क्र** हीही अक्षरे घेतलेली नाहीत. कृ चा उच्चार क्रि असा सुद्धा केला जातो. क्र हे जोडाक्षर नकोच. पुत्र ऐवजी पुत्तर असा विश्लेष होतोच ना ! गुरुमुखीत जोडाक्षरे नसतात. क च्या बाराखडीतील ही सहा अक्षरे (क का कि कु के को) घेतल्यास कोणालाही कसलीही अडचण पडू नये.

ट. याप्रमाणे **च** या (मध्यम लांबीच्या) अक्षरक्रमातील प्रत्येक अक्षराच्या बाराखडीतील फक्त सहा अक्षरे घेऊन, प्रचंड मोठा (१८x६) १०८ अक्षरांचा अक्षरक्रम बनविता येईल.

आपल्या जरूरीनुसार आपण हा अक्षरक्रम- ८, १८ किंवा १०८ अक्षरांचा बनवू/निवडू शकतो.

१०. देवनागरी लिपी वापरणाऱ्या आपण सर्वांनी या अक्षरक्रमाचा (अक्षरावलीचा) आग्रह धरला पाहिजे. याची जास्त जबाबदारी भाषा-अभ्यासकांवर आहे.

❖❖❖

शरद कृष्णाजी बोडस
अद्वैतानंद को. हौ. सोसायटी,
१२२१ सदाशिव पेठ, पेरूगेट चौकाजवळ,
पुणे - ४११ ०३०.
दूरभाष : (०२०) २४४८६१६०

ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर ह्यांच्या जन्मशताब्दी निमित्त अभिवादन !

(२ मार्च १९१० ते १ मार्च १९९९)

डॉ. श्रीकांत केळकर

राष्ट्रीय पंडित, न्याय मीमांसा वेदांत व्याकरण-साहित्य-पुराण आदि सर्वच क्षेत्रात असाधारण प्रभुत्व असलेले, गुळवणी महाराजांचे उत्तराधिकारी म्हणून आदरणीय व प्रतिष्ठित असलेले आदरणीय दत्तमहाराज-कवीश्वर ह्यांच्या ही जन्मशताब्दी उत्सवाची सुरुवात झालेली आहे. प्रगाढ पांडित्य सामाजिक/वैचारिक/धार्मिक/सांस्कृतिक क्षेत्रांतील उत्तुंग कार्य, मानवतावादी उदार व समन्वयवादी आचरण आणि इतरांना समजून घेऊन वागविणारे एक महान व्यक्तित्व म्हणजे पंडित महामहोपाध्याय-दत्तात्रेयशास्त्री, धुंडिराज-कवीश्वर ! विद्वान निष्ठेने आणि सातत्याने शास्त्रप्रामाण्य मानणारे समाजजीवनाचे जागरूकतेने व सावधपणे जागरण, प्रबोधन करणारे दत्तमहाराज गृहस्थाश्रमाचे आदर्शत्वाने पालन करीत असतानाच योग, वैराग्य, समाधानी वृत्ती, स्थितप्रज्ञता, पारमार्थिक, आध्यात्मिक आणि धार्मिक क्षेत्रात असूनही मानवता उदारपणा, अंतःकरणाचे मोठेपण, उपदेश करताना व्यवहार आणि सामान्य साधकाची योग्यता, समता व काम करण्याची ताकद पाहून नेमकेपणे प्रबोधन करण्याचे असामान्य कौशल्य ह्या आणि इतर असंख्य विशेषांनी आजीवन कार्य करीत होते.

माझ्यासारख्या सामान्याला त्यांचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठ येथे त्यांनी केलेले अध्यापन, दिलेली वागणूक, व्यवहार काटेकोरपणे, नेटकेपणाने सांभाळून, सौजन्य न सोडता सर्वांना विश्वासात घेऊन अनेक प्रकारचे अनेक ठिकाणचे न्यायनिष्ठेने, शिस्तीने व अनुशासन पुरस्कार करण्याचे प्रशासन कौशल्य, अजूनही आठवते. जीवननिष्ठा किंवा जीवनाचा आधार देणारे वाटते. अनेक प्रकारचे उद्योग धावपळ करून नव्या शिक्षणाच्या बरोबरच प्राचीन पद्धतीने अध्ययन करण्याचा आमचा प्रयत्न करताना गुरुजींनी जी वागणूक दिली, जसे अतिशय सौजन्य सौहार्द सहानुभूती व सभ्यपणाने वागविले, ते त्यांचे शिक्षक म्हणून फार मोठेपण वाटते. मला काय येते, क्षमता किंवा योग्यता किती, आकलन कसे व कितपत असा विचारसुद्धा न करता वात्सल्य आणि आदराने, विषय अतिशय सहज करून सांगितला. ग्रंथांची ही गरज नसे. पहिले वाक्य मी वाचले की त्यांचे प्रवाही प्रसन्न आणि मूलग्राही विवेचन सुरू होत असे. शास्त्रप्रत, प्रमाणनिष्ठ, नेमके, मूलग्राही विवेचन ते करीत असत. त्यांचे शास्त्रातील, विचारातील, दृष्टान्त देण्यातील प्राविण्य, सहज पण मार्मिक असे. कोठे पांडित्य प्रदर्शन किंवा दिखाऊपणाचा भाग नसे. कमीत कमी शब्दात नेमकेपणाने, यथार्थ विवेचन करताना, कोठेही कोणाबद्दल वेडेवाकडे किंवा लागेल असे बोलणे नसे. वेदान्तामधील अनेक ग्रंथ, वेदान्तसार, ब्रह्मसूत्र, गीता उपनिषदे, सिद्धान्तलेखसंग्रह, सिद्धान्तबिंदुसारखे ग्रंथ त्यांचा मुखातून ऐकण्याचे भाग्य मला मिळाले. सर्व बाजूंनी विचार उदाहरणे, न्याय आणि प्रामाण्य ह्यांचे विवरण असे नेमक्या वेळात अध्यापन संपत असे. संपताना पुनः कधी या हे सांगणे ऋणतेचे (आर्जवपूर्ण) सहृदयतेचे आणि आपल्याबरोबर इतरांची ही सोय पाहणारे असे. त्यांचे व्यक्तिमत्व प्रसन्न, शांत, सौम्य, विवेकी आणि तितकेच तेजस्वी होते. वाणी व उच्चारांत उच्चावचता, जोर देणे आणि काटेकोरपणाने नेमकी लय सांभाळून प्रवाहपूर्णताही असे. नवीन जाणण्याची आणि सामान्य विद्यार्थ्यांकडूनही कौतुकाने ऐकण्याची सहजता होती. परीक्षांची कामे, स्वाध्याय व उत्तरपत्रिका तपासण्याचेही अतिशय दक्षतेने, नीटनेटके व नेमके असे. सांगतानाही स्नेह, वात्सल्य, सौजन्य, सांभाळूनच दाखवून देत. हे शिक्षकाचे व ह्या महामानवाचे वेगळेपण मनावर ठसणारे होते. आजही अविस्मरणीय निधी असल्याप्रमाणे वाटते.

न्याय-मीमांसा-व्याकरण, वेदान्त, साहित्य, पुराणे, धार्मिक व वैचारिक ग्रंथातून त्यांचा अधिकार, व्यासंग, प्रभुत्व अलौकिक स्वरूपाचे म्हणून दुर्लभ वाटते.

सभा-संमेलने-परिषदा, चर्चासत्रे, पारायणे, उत्सव व कोणत्याही समारंभामध्ये दिलेली वेळ नेमकेपणाने पाळून, व पूर्ण विषय उभा करणे हे कौशल्य अभिमानार्ह व अनुकरणीय होते. पण त्याचा त्यांना अभिमान किंवा जाणीवही नसे. कधीही घड्याळ न पाहता किंवा वापरता, हा नेमकेपणा, ह्यांच्या योगशास्त्रातील पारंगतता व कौशल्य

अनुक्रमणिका

ह्यामुळे आहे. सभाशास्त्राचे सर्व संकेत, नियम व संयोजकांचा अधिकार व सोय पाहून त्यांचे आदर्शवत् आचरण हा कौतुकाचा आणि सर्वांच्या अभिमानाचा विषय असे. औचित्य पाळणे हे ही असाधारण वैशिष्ट्य आढळून येते, जे आज सहजासहजी दिसत नाही. असंख्य पुरस्कार व सन्मान मिळून ते शांतपणे वागत.

दत्तसंप्रदायात आणि आध्यात्मिक क्षेत्रात विख्यात असलेल्या कवीश्वर-कुळात त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्वज काव्यकौशल्याने 'कवीश्वर' झाले. वासुदेवानंद टेंब्येस्वामीमहाराजांचा त्यांच्या परिवारात स्नेह होता. दत्तमहाराजांनाही स्वामींनी बालपणीच ओळखून आशीर्वाद दिला होता. ज्यांची योग्यता जाणून तशी ज्येष्ठांना जाणीव करून दिली होती, असे ऐकतो. वडील धुंडिराज हे श्रेष्ठ प्रवचनकार, प्रवोधनकार, भागवत पारायण, प्रवचनादि कार्यात, यशस्वी व प्रभावशाली होते. मराठवाडा आणि विदर्भ येथे ह्यांचा शिष्यवर्ग मोठा होता. दत्त पितामही महाराजांची मातृ, पितृ, पितामह आणि गुरुबद्दलची निष्ठा, भक्ती आणि सेवापरता, अलौकिक होती. नम्र, शालीन वृत्ती, मर्यादा पालन, सर्वांशी आदर भावनेने वागणे आणि कोठेही ढोंग, दिखाऊपणा किंवा दुटप्पीपणा नसणे हे त्यांचे वैशिष्ट्य. चित्त, वाणी आणि क्रिया ह्याच्यावद्दल नुसतीच एकरूपता नव्हती, तर ते सदाचाराचे व सौजन्य-सौदार्हपूर्ण व्यक्तित्वाचे प्रतीक होते. धीरवृत्ती, शांतस्वभाव, संयम, विवेकशीलता, तितिक्षा, सहिष्णुवृत्ती आणि असाधारण कर्तव्यनिष्ठा इत्यादी त्यांच्या व्यक्तित्वाचे व कार्यांचे मोठेपण होते. सृजनतेने व समर्थपणे ते आपले काम करीत असत.

वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी भागवताचे पहिले पारायण केले. ते पुढे. सतत ६० वर्षेपर्यंत अनेक ठिकाणी वर्षांतून अनेकवेळा, नियमितपणे, कोणतीही अडचण, संकट, गैरसोय सोसूनही पार पाडले. एक आदर्श आणि तितकाच अनुकरणीय प्रकल्प, जो जीवनदर्शी ठरला. लहानवयातच विवाह होऊनसुद्धा जवळजवळ आठ वर्षे पर्यंत त्यांनी आपले परंपरागत, शास्त्रीय, अध्ययन अत्यंत निष्ठेने पूर्ण केले.

नरसोबावाडी, सांगली व धारवाड येथील त्यांचे उच्च स्वरूपाचे अध्ययन, शास्त्र-प्रमाण, गुरुनिष्ठा सापेक्ष होते. अत्यंत प्रभावपूर्ण व तितकेच गंभीर व समस्त विषयांचे अवगाहन करणारे होते. मानदंड म्हणून त्याही काळात मानले जात असे. शिकत असतानाही स्वतःच्या वर्गात, सहकारी व कनिष्ठ वर्गातील छात्रांना ते शिकवीत असत, इतके कौशल्याने की त्यांचे गुरू अतिशय प्रसन्न असत. सहयोगी आनंदित व समस्त ज्येष्ठ हितचिंतक, अभिमान बाळगीत असत. अजूनही धारवाडच्या आठवणी गुरू-गुरूबंधु-संस्थाप्रमुख सांगत असतात. न्याय व मीमांसा विद्वान म्हणून त्यांनी पुण्याच्या शांकरमठात अध्यापन अतिशय काळजीपूर्वक केले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठात शास्त्रीय स्वरूपाचे अनेक शास्त्रांचे, तंत्रांचे व विषयांचे सफल कार्यक्षम व यथार्थ असे दीर्घकाळ केले. जणू तपश्चर्या होती. अनेक देशातील व परदेशी विद्वान त्यांच्या अध्यापनाचा फायदा घेत असत. ह्यात हॉर्वडचे विख्यात शोधकर्ते डॉ. डॅनिअल इंगॉल्स ह्यांचा ही अंतर्भाव होता. व्याकरण शास्त्राच्या अध्यापनाने हॉर्वड येथे असंख्य विद्वानांचे तिथे जाऊन उच्च शिक्षण पूर्ण करता आले. ज्या परंपरेमध्ये डॉ. शि. द. जोशी (पंडितजी) सारखे दोन्ही परंपरांचे उर्धन्य विद्वान उत्तम यश व यशस्वी आयुष्य मिळवू शकले व हॉवर्डची परंपरा, संस्कृतविद्येच्या बाबतीत कायम ठेवता आली.

पं. कवीश्वर गुरुजींनी सर्व व्यासंगक्षेत्रातील आदरणीय व सदाचरणी विद्वान म्हणून आजीवन कार्य केले. कृतज्ञता व सर्वांबद्दल आत्मीयता, सर्व काही करून काहीच केले नाही; असे सहजपणे वावरणे, सामाजिक-सांस्कृतिक-शैक्षणिक, वैचारिक क्षेत्रात अजातशत्रू म्हणून व चालते बोलते विद्यापीठ किंवा ज्ञानकोश अशी मान्यता मिळविली. टेंबे स्वामी महाराजांचे चरित्र त्यांनी संपादन करून उत्तम प्रकाशित केले. त्यांचे विशाल व विख्यात साहित्य बारा खंडामध्ये, चिकित्सकपणे व संशोधनाची शिस्त पाळून, मुद्रण-मुद्रितशोधन, संपादन, प्रकाशन ही सर्व जबाबदारी एकट्याने व साक्षेपाने पार पाडली. सर्व व्याप संभाळून सातत्याने व प्रमाणशास्त्र आणि गुरुनिष्ठा पाळून, कोठलाही गाजवाजा किंवा प्रसिद्धी न होऊ देता ! हे त्यांचे कर्तृत्व योग्याचे व कर्मयोग्याचे होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांच्यावर सोपविलेली. निंबार्काचार्यांचे ब्रह्मसूत्र भाष्याची जबाबदारी त्यांनी सानुवाद चिकित्सापूर्वक विवेचन व प्रतिपादन एकट्याने

पूर्ण केली. आणि विद्यापीठात केलेली दीर्घकाळ सेवा, जाणून कृतज्ञताबुद्धीने विद्यापीठाला अर्पण केले.

गुळवणी महाराजांचा स्नेह, विश्वास व आत्मीयता ही दत्तमहाराजांची अमानत होती. ठेव होती. निधी होता. त्यांच्याबरोबर त्यांच्या अनेक प्रकारच्या कार्यात त्यांनी स्वतःला समर्पित केले होते. निष्ठेने, भक्तीने व श्रद्धेने भाषण, लेखन, चिंतन, प्रतिपादन, संपादन, प्रकाशन, प्रबोधन आणि सतत प्रवास करीत ज्यांनी केले. अन्य कोणत्याही कामात सगळीकडून बोलवीत असताना गेले नाहीत. त्यांचे उत्तराधिकारी म्हणून लोकसंग्रहाचे प्रबोधनाचे, सहाचरणाचे काम आजीवन स्वतः आघाडीवर राहून ८९व्या वर्षांपर्यंत चालविले. जीवननिष्ठा आणि तपश्चर्या ह्यांचेच हे उदाहरण आहे.

वडिलांच्या धुंडिराज शास्त्राच्या, कामात त्यांनी पूर्ण सहकार्य केले आणि त्यांच्या पश्चात् कायम ते नरसोबावाडी कोल्हापूर, पुणे, नगर, जालना, देऊळगाव राजा, विदर्भ मराठवाडा व हैदराबाद पर्यंत सातत्याने, नियमिततपणे व निष्ठेने चालविले. एक उत्कृष्ट परंपरा निर्माण केली. लोककल्याण साधण्यासाठी निःस्पृह वृत्तीने निरपेक्षपणे, सर्वांना संभाळून स्वतःकडे प्रसंगी, वाईटपणा घेऊन स्वार्थ, त्याग, सेवा आणि निष्ठापूर्वक सर्वत्र संचार केला. 'वासुदेव-निवास' येथे प्रचंड काम नियमितपणे पारायण, उत्सव, समारोह ह्याबाबतीत कायम ठेवले. सर्वत्र लक्ष ठेवले. सर्वांना कामात गुंतवून संघटन कौशल्य व संस्था प्रगतीकडे नेण्याचे शिवधनुष्य पेलले; बंधु पं. श्रीपादशास्त्री संस्कृत प्राप्त कार्याचे संघटक, प्रचारक व महाराष्ट्रात आदर्श स्वरुपात शासनापासून संस्था, संघटना, व्याप्ति व साधारण रसग्राही लोकापर्यंत वावरत होते. त्यांचेही प्रचंड कर्तृत्व होते. सर्व संस्था संघटना, व्यक्ति आणि संस्कृतप्रेमी ह्या सर्वांच्या विश्वासाचे प्रतीक होते. कवीश्वरकुलाचे सगळे मोठेपण व सतत काम करण्याची प्रवृत्ती, त्यांच्याकडे ही ओतप्रोत होती. संस्कृत स्थायी समितीचे काम त्यांचा प्राण होता, श्वास होता.

स्व. ती. दत्तमहाराजांच्या पत्नी लक्ष्मीबाई वयाच्या बाराव्या वर्षी बार्शीच्या पाठक घराण्यातून कवीश्वरकुलात सूनबाई म्हणून आल्या आणि पहिल्या दिवसांपासून घरची परंपरा, कुलधर्म, आचार विचार व सर्व ज्येष्ठांपासून सर्वांना संभाळण्याचे काम त्यांनी केले. दत्तमहाराजांच्या मातोश्री व्रतस्थ कर्मयोगिनी होत्या. त्यांचा वारसा, त्यांनी सर्व प्रपंच परमार्थ आणि लोकसंग्रहातून आलेल्या स्थितीत, वैवाहिक आयुष्याच्या ६६/६७ वर्षांपर्यंत निष्ठेने, सेवाभावाने व मातृनिर्विशेष वत्सलतेने संभाळला. प्रतिष्ठित केला.

दत्तमहाराजांनी 'वासुदेव निवास' व लोकनाथ स्वामी महाराज प्रतिष्ठान ह्याचे कार्य निष्ठेने आजीवन केले. अनेकांना शक्तिपात दीक्षा देऊन अनुग्रह दिला, सर्वांना आध्यात्मिक जीवनात आणले. आणि स्वास्थ्य समृद्धीच्या काळात ही त्यांची समाधानी समवधात वृत्ती, स्थितप्रज्ञाची होती. आईसाहेबांच्या मृत्यूनंतर एका महिन्यातच दत्तमहाराजांनी आपली जीवितयात्रा वयाच्या ८९ व्या वर्षी कृतार्थपणे संपविली. आजही त्यांच्या प्रेरणेने काम चाललेले आहे. अशा ज्ञान, कर्म भक्ती, योगनिष्ठ महामानवाच्या शताब्दिवर्षकाळात त्यांच्या गुणांचे, व्यक्तित्वाचे कार्याचे, जीवननिष्ठेचे स्मरण करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करणे, अगदी आवश्यक आहे.

❖❖❖

डॉ. श्रीकांत केळकर
श्रीशैलम, धर्माधिकारी वासुदेव नगर, सावेडी, नगर - ४१४००२
फोन : ०२४१-२४३०९६३, मोबा. : ९२७०६८०७६८

(पान क्र. २१ वरून पुढे चालू...)

या ग्रंथाचे वैशिष्ट्य एकनाथ स्वतःच सांगतात-

'ये ग्रंथींचे निरोपण । जिवा शिवा होतसे लग्न ।
अर्थ पाहतां सावधान । समाधान सात्त्विकां ॥'

अशा तऱ्हेने आपल्या अभिजात 'वाङ्मयातून नाथांनी जनसामान्यांना खरोखरच 'सावध' केले आणि अलौकिक आनंद देऊन संतुष्टही केले. ज्ञानदेवांनी उभारलेल्या भक्तिपंथाच्या देवालयाला एकनाथांनी भक्कम खांब दिला आणि ते मजबूत केले. एकनाथांचे सामर्थ्य आणि माहात्म्य संत बहिणाबाईंनी एका ओळीतच वर्णिले आहे-

'जनार्दनीं एकनाथ । खांब दिला भागवत ॥'

बहिणाबाईंचे हे उद्गार निर्विवादपणे सार्थच आहेत.

❖❖❖

शीला निपुणगे
२ कस्तुरी सोसायटी, ३७१ ब, शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३० भ्रमणभाष : ९८९०३५४३६२

पौराणिक कादंबरी

अगस्त्य– डॉ. अनिल नागेश सहस्रबुद्धे

- अंजली पटवर्धन

[पुराणकथांना सार्वकालिक अर्थ असतो. पर्यावरणाचे संतुलन राखणारे ऋषि 'अगस्त्य' ही एक परंपरा आहे. दक्षिणापथाचे (दक्षिण भारताचे) असंतुलित पर्यावरण संतुलित करण्यासाठी अगस्त्य ऋषींचा जन्म झाला. योद्धा संघटक, अथर्वण, शल्यचिकित्सक, कुलगुरू, सिद्धयोगी अशा बहुविध रूपातील अगस्त्य मुनींचे दर्शन डॉ. सहस्रबुद्धेंच्या क्षेत्रीय अभ्यासातून प्रकट झाले आहे. –संपादक]

डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांची अनुक्रमे दहावी आणि विषयाच्या दृष्टीने पहिली पौराणिक कादंबरी 'अगस्त्य' प्रकाशित झाली आहे.

डॉ. सहस्रबुद्धे यांचे जन्मस्थळ अकोले असून, त्यांच्या जीवनातील बराचसा काळ तिथे व्यतीत झाला आहे. अकोल्यात अगस्त्यांचं मंदिर आहे आणि आजही चैतन्यरूपात त्यांचा वास तिथे आहे अशी भाविकांची श्रद्धा आहे, त्यामुळे अगस्त्यांचं चरित्र लिहिण्याची प्रेरणा डॉ. सहस्रबुद्धेंना मिळाली.

मौखिक परंपरा ग्रथित करून तिचे संवर्धन, जतन करणे, क्षेत्रीय अभ्यासातून संशोधनात भर घालून ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविणे हे लोकसाहित्याचे प्रयोजन असते; तर वेद, श्रुती, स्मृती, पुराणे यांचे (यातही मौखिक परंपरा आहेच.) संवर्धन करणे, हे पौराणिक साहित्याचे प्रयोजन असते. लोकगीतांमध्ये, लोककथांमध्ये पौराणिक कथांचे संदर्भही काही वेळा येतात. लोकसाहित्य आणि पौराणिक साहित्यात 'कथन' महत्त्वाचे आहे. लोकसाहित्य हा समूहमनाचा आविष्कार असतो. पौराणिक साहित्यातही 'समूहाला' महत्त्व आहे. परंतु पौराणिक साहित्यातील समूह हे देव, दानव, यक्ष, किन्नर यांचे असतात. त्यामुळे काही बाबतीत लोकसाहित्य आणि पौराणिक साहित्य यात साम्य दिसून येते. किंबहुना लोकसाहित्य या अभिजात स्रोतातून पौराणिक साहित्याला वेगळं काढणं कदाचित् कठीण झालं असतं; परंतु ते वेगळं काढलं गेलं, त्याला दोन कारणं असावीत असं वाटतं. एक म्हणजे लोकसाहित्य हे लोककथा, लोकगीते, क्षेत्रीय संशोधन इ. अशा 'फॉर्म'मध्ये सिद्ध झालेलं असतं. 'कादंबरी' हा फॉर्म लोकसाहित्याच्या कक्षेत येत नाही.

महत्त्वाचं कारण म्हणजे लोकसाहित्याची भाषा ही 'लोकभाषा' असते. त्यामध्ये सुगमता, प्रादेशिकता अपेक्षित असते. पौराणिक साहित्याची भाषा मात्र संस्कृतप्रचुर, प्रौढ असते. त्यामुळे भाषिकदृष्ट्या पौराणिक साहित्याचं वेगळेपण लक्षात घ्यावं लागतं. तेव्हा लोकसाहित्य आणि पौराणिक साहित्यातील साम्य-भेदांच्या सम्यक आकलनातून डॉ. सहस्रबुद्धे यांनी 'अगस्त्य' ही कादंबरी लिहिली आहे, असं म्हणायला हरकत नसावी.

प्रश्नोत्तरांच्या पारंपरिक स्वरूपातून अनेक कथांमधून अगस्त्यांचं बहुआयामी व्यक्तिमत्त्व उलगडत जातं. कधी नारदमुनी आणि शिव-पार्वती यांच्या संवादातून, कधी कुलगुरू अगस्त्य आणि राम-सीता-लक्ष्मण यांच्या संवादातून. कधी पांडव आणि कुलगुरू अगस्त्य यांच्या संवादातून अशा अनेक संवादरूपी साखळीतून अगस्त्यांचं समग्र दर्शन घडतं. अर्थातच अगस्त्यांची जन्मकथाही अशा संवादातूनच सांगितली गेली आहे.

कृतयुगात देव-दानव संघर्ष सतत सुरू होता. त्यात वृत्रासुर नावाचा दानव खूप उन्मत्त झाला होता. सत्त्वयुक्त, निरागस, तपस्वी आणि त्यागपूर्ण ऋषीच्या हाडांच्या वज्रानेच फक्त वृत्रासुराचा मृत्यू होऊ शकेल, अन्यथा तो अमर होईल, असा वर त्याने शिवशक्तीकडून प्राप्त करून घेतला होता. एकदा त्याने देवलोकावर स्वारी केली. त्याच्या टोळ्यांचे युद्धकौशल्य आणि अगाध शस्त्रज्ञान यापुढे इंद्र आणि देवगण हतबल झाले. त्यांनी ब्रह्मदेवांकडे धाव घेतली. मग ब्रह्मदेवांसह ते सगळे शिवाकडे गेले. शिवशंकरांच्या सांगण्यावरून ते भगवान विष्णूंकडे गेले, विष्णूंसह सगळे दधिची ऋषींकडे गेले आणि त्यांना वृत्रासुराची हकिकत कथन करून त्यांच्या अस्थींची मागणी केली. दधिचींनी तत्काळ देहत्याग केला. मग त्वष्ट्याने त्यांच्या अस्थींपासून वज्र तयार केले. त्या वज्राच्या साह्याने इंद्राने वृत्रासुराचा वध केला. या युद्धात असंख्य दानवांचा

संहार झाला. जे पराभूत दानव होते, ते घाबरून समुद्राच्या तळाशी लपून बसले. या दानवांचा निःपात करण्याची आज्ञा इंद्राने अग्नी आणि वायू यांना दिली; परंतु अग्नी आणि वायू यांचे म्हणणे असे होते, की समुद्राच्या तळाशी असणाऱ्या दानवांचा संहार करताना समुद्रातील निरपराधी जीवजंतूही मारले जातील. अग्नी आणि वायूचा हा युक्तिवाद इंद्रदेवांना पटला नाही; आणि त्यांनी या दोघांना 'पृथ्वीवर जाऊन जन्म घ्या' असा शाप दिला. या काळजीने दोघांची रूपे परिवर्तित होऊन अग्नी मित्ररूपात आणि वायू वरूणरूपात वावरू लागले. ऋषींच्या यज्ञकर्मात अग्नी आहुती स्वीकरण्यासाठी मुख म्हणून काम करी आणि वायू अग्नीला साह्य करी. त्यामुळे ऋषींना या दोघांची गरज होती; आणि देवांना वाटत होतं की, इंद्राचा शाप खरा झाला पाहिजे आणि त्या दोघांचा शुद्ध हेतूही राखला गेला पाहिजे. म्हणून त्या दोघांना ऋषीरूपात पृथ्वीवर पाठवण्याचे देवांनी ठरवले. त्यासाठी त्यांनी उर्वशीला आमंत्रित केले. वासितवर सोमयागसत्राच्या प्रसंगी मित्रवरूणांना उर्वशीने आकर्षित करून कामलोलुप केले. तिच्या आकर्षणामुळे त्यांचे वीर्यपतन झाले. ते पुष्कर कमलाप्रमाणे सुशोभित कलशात दोघांनीही विसर्जित केले, त्या कुंभाच्या मध्यभागातून मानमान्य किंवा मान्यार्य अगस्त्यांचा जन्म झाला. आणि अवशिष्ट कुंभातून वसिष्ठांचा जन्म झाला. अशी अगस्त्य जन्माची कथा आहे.

नंदीच्या जन्माची कथाही निवेदनाच्या ओघात सांगितली आहे. नंदी आणि त्याची पत्नी सुयशा यांना पृथ्वीवरील लोकांना कृषिकर्मात मदत करण्यासाठी भगवान शिवांनी पाठवावे, अशी अगस्त्यांची इच्छा होती. म्हणून त्यांनी शिवांना तशी विनंती केली; आणि अगस्त्यांची लोककल्याणाची तळमळ पाहून शिवांनी ती मान्य केली. हा कथाभाग सविस्तर कथन केलेला आहे.

खेलराजाचे पुरोहितपद आणि आचार्यपद अगस्त्यांनी स्वीकारल्यावर खेलराजाच्या राज्याची भरभराट झाली. ती सहन न होऊन शत्रूंनी राज्यावर आक्रमण केलं. खेलराजाची राणी विश्पलाही त्याच्या समवेत लढण्यासाठी युद्धभूमीवर उतरली. तिच्या पराक्रमाने शत्रू आणि स्वतः खेलराजाही स्तंभित झाला. परंतु शत्रूने विश्पलेचा एक पाय तोडला; आणि तो नष्ट केला. त्यावेळी अगस्त्यांनी अश्विनुकुमारांना प्रार्थनापूर्वक पाचारण करून त्यांच्या साह्याने विश्पलेच्या तुटलेल्या पायाच्या जागी नवीन पाय विरोपित केला. विश्पला परत युद्धाला सज्ज झाली. ते युद्ध खेलराजाने जिंकले. ही कथाही यात समाविष्ट आहे.

पूर्वजांना सद्‌गती लाभण्यासाठी भगीरथाने गंगेला पृथ्वीवर पाचारण केले, त्यात अगस्त्यांचे त्याला सहाय्य झाले, हा कथाभाग येतो.

वृत्रासुराच्या वधानंतर सागराच्या तळाशी दडून बसलेल्या दानवांचा संहार करण्यासाठी अगस्त्यांनी समुद्रप्राशन केले; आणि तो समुद्र मूळ स्वरूपात परत प्रकटही केला, हा अगस्त्यांच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण प्रसंग विस्ताराने वर्णिला आहे.

काशिक्षेत्री शिवांच्या आज्ञेवरून अगस्त्यांनी आश्रम उभारला, जंबुद्धीपात गुरूकुलांची स्थापना करून स्वतःबरोबरच कुलगुरू म्हणून स्वगोत्रज शिष्यांची त्यांनी तेथे नेमणूक केली.

अनेक कुलांकडून अगस्त्य गोत्राचा स्वीकार झाला. स्वगोत्राच्या पितरांना सद्‌गती लाभावी म्हणून अथर्वणाच्या आणि तपश्चर्येच्या साह्याने त्यांनी अतिसुंदर अशी कन्या निर्माण केली. तिचं नाव लोपामुद्रा. लोपामुद्रेला त्यांनी विदर्भाधिपती राजा मानी पुत्रश्री याच्या स्वाधीन केलं. ती वयात येताच तिच्याशी विवाह केला; आणि मग अगस्त्य-लोपामुद्रा यांच्या मीलनातून इध्मवाहाचा जन्म झाला, हा कथाभाग अर्थातच सविस्तरपणे विदित केला आहे.

इध्मवाहाच्या जन्मानंतर नारदमुनींच्या सांगण्यावरून अगस्त्यांनी दक्षिणेकडे प्रयाण केले. कारण शूरपद्माने घोर तपश्चर्या करून पावसाला अर्थात् इंद्राला रोखून धरण्याची शक्ती प्राप्त करून घेतल्यामुळे दक्षिणेत भीषण दुष्काळ निर्माण झाला होता. दक्षिणेची ही वाताहत थांबविणे केवळ अगस्त्यांनाच शक्य होते. त्यामुळे अगस्त्य घोर तपश्चर्येला निघाले. वाटेत त्यांनी कावेरा ऋषींची भेट घेतली, कावेरा ऋषींशी त्यांची दक्षिणेत जलौघ निर्माण करण्याबाबत चर्चा चालू असताना, कावेरांची चिमुरडी कन्या कावेरी तिथे आली; आणि या लोककल्याणाच्या कार्यात अगस्त्यांना मदत करण्याची इच्छा तिने प्रदर्शित केली. गोदावरीसारखंच नदीचं रूप प्राप्त व्हावं, अशी तिची इच्छा होती. अगस्त्यांना तिचं कौतुक वाटलं आणि त्यांनी तिला 'तथास्तु' म्हणून आशीर्वाद दिला. त्यानंतर अगस्त्यांनी घोर तपश्चर्या केल्यानंतर थोड्या प्रमाणात का होईना पर्जन्याची

कृपादृष्टी झाली. तसेच कृषीवलांसह त्यांनी पृथ्वीवर समतल चर खोदले. अथर्वणाचे प्रयोगही चालू केले. त्यामुळे पाऊस बरसू लागला; पण शूरपद्माने अगस्त्यांच्या अथर्वणाला आव्हान दिलं. शेवटचा उपाय म्हणून अगस्त्यांनी शिवआराधनेला सुरुवात केली; आणि उग्ररूप धारण केले. शूरपद्माची मायाच प्राशन करण्यास त्यांनी सुरुवात केली. शूरपद्माला भस्म करायचे त्यांनी ठरवले, तेव्हा मात्र तो त्यांना शरण आला. तोपर्यंत कावेरी उपवर झाली होती. अगस्त्यांशी विवाह करण्याची तिची मनीषा होती. म्हणून लोपामुद्रेच्या संमतीने अगस्त्यांनी तिच्याशी विवाह केला आणि नंतर कावेरीला नदीरूप प्राप्त झाले, ते कसे प्राप्त झाले हा सगळा कथाभाग यात वर्णन केला आहे.

अगस्त्यांना शल्यचकित्सा, रसचिकित्सा, भूतविद्या कशी प्राप्त झाली हे कथानकही संवादाच्या ओघात येतं. तसंच सर्व विद्या आणि युद्धकला प्राप्तीविषयीचं कथानकही कथित केलं आहे. तसंच द्विजगणांनी त्यांचा उपयोग लोककल्याणासाठी व्हावा, अशी विनंती अगस्त्यांना केली आणि त्यासाठी अगस्त्यांनी अगस्त्यकुंड निर्माण केलं, ही कथाही थोडक्यात आली आहे.

विंध्य गर्वहरणाची कथा विस्ताराने वर्णिली आहे. शुकमुनी आणि वज्रद्रष्टच्या संदर्भातील अगस्त्यांची कथाही यात समाविष्ट आहे. सुकेतू, तारका आणि मारिच यांच्याही कथा यात आहेत. हनुमंत कथा, परशुरामाचा पश्चात्ताप, रावणकथा, वाल्मिकीकथा, नहुषाची कथा, ताम्रपर्णी वनस्पतीची कथा, ताम्रपर्णी नदीची कथा, अगस्त्यांची संजीवन समाधी घेतली तो प्रसंग, हयग्रीव स्वरूपात अगस्त्य-लोपामुद्रा यांना नारायणाचे दर्शन, प्रापंचिकांच्या उद्धारासाठी हयग्रीवांनी केलेला उपदेश (पृष्ठ क्र. २७३, २७४), इंद्राचे गर्वहरण, समुद्रमंथनाची कथा, ललितादेवीची कथा, मोहिनीरूपातील विष्णूंचे पराक्रम, ललिता देवीची आराधना कशा प्रकारे करावी आणि त्यामुळे होणारे लाभ, इ. कथाभाग आणि माहितीपूर्ण निवेदन संवादातून उलगडत जाते. पृष्ठ क्र. २९६ ते पृष्ठ क्र. ३०९ या अवकाशात अगस्त्यांचं व्यक्तिमत्त्व, त्यांचं कार्य आणि या अनुषंगाने प्रकट झालेलं तत्त्वज्ञान यांचा परामर्श घेण्यात आला आहे. समाधी घेतल्यानंतरही अगस्त्यांनी विठ्ठलपंत (संत ज्ञानेश्वरांचे वडील), शिवाजी महाराज आणि अहिल्याबाई होळकर यांना दिलेला दृष्टान्त याचाही उल्लेख येतो.

या कथांमध्ये आलेल्या विविध प्रसंगांतून, घटनांतून पर्यावरण, जल, कृषी आणि आरोग्य क्षेत्रातील संशोधक, व्यवस्थापक तसेच लोकप्रिय शांतिदूत, सुकृतपालक, कुशल संघटक, श्रेष्ठ योद्धा, शल्यचिकित्सक, अथर्वण संगीत तज्ज्ञ, कुलगुरू, देव, सिद्धयोगी, ऋषी, मुनी स्वरूपातील अगस्त्यांचे दर्शन घडते.

पर्यावरणाचा वाढता ऱ्हास, वाढतं प्रदूषण, पंचतत्त्वांचा मानवाला पडलेला विसर, त्यामुळे एकूणच ढळलेलं निसर्गाचं संतुलन या पार्श्वभूमीवर ही कादंबरी दिशादर्शक ठरावी. निसर्गाच्या या संतुलनासाठी अगस्त्यांनी वेळोवेळी केलेले यज्ञ, शूरपद्माच्या उन्मत्तपणामुळे पृथ्वीचा ढळलेला तोल सावरण्यासाठी त्यांनी दक्षिणेत केलेले कार्य हे त्या दृष्टीने अभ्यासण्यासारखे आहे. तसेच या कादंबरीची अर्पणपत्रिकाही त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. खेलराजाची पत्नी विश्पलेवर अगस्त्यांनी अश्विनीकुमारांच्या साह्याने केलेली शस्त्रक्रिया; त्यांच्यातील कुशल शल्य चिकित्सकाची ओळख तर करून देतेच; परंतु त्याही काळात शल्यचिकित्सा हे शास्त्र अवगत होतं, नुसतं अवगतच नव्हे; तर प्रगत होतं, यावरही प्रकाश पडतो. या प्रसंगी अगस्त्यांनी अश्विनीकुमारांचं जे स्तवन केलं आहे, त्यावरून असं लक्षात येतं की, शल्यचिकित्सेच्या शास्त्राला अगस्त्यांनी विनम्रतेची, श्रद्धेची, भक्तीची जोड दिली होती. त्यामुळे विश्पलेच्या तोडलेल्या पायाच्या जागी ते नवीन पायाचं रोपण करू शकले. एकूणच अगस्त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला जे बहुआयामित्व प्राप्त झालं होतं ते सहजासहजी प्राप्त झालं नव्हतं. त्यामागे त्यांची घोर तपश्चर्या, साधना,

अपमुद्रितांची दुरुस्ती :

१) अंक क्र. ३३२ - पृष्ठ - १२, ओळ क्रमांक ५, १० आणि १२ यावर इ.स. १९९८ ऐवजी १८९८ वाचावे.

२) अंक क्र. ३३३ - पृष्ठ क्र. १८ वर तळबाजूला श्रद्धांजली खाली शेवटी क्रमांक ६ वर निर्मला मोने यांचा गैरसमजाने झालेल्या उल्लेखाबद्दल दिलगीर आहे. (संपादक, म.सा. पत्रिका)

अनुक्रमणिका

अथक परिश्रम, कार्यमग्नता, भक्तिपरायणता होती. मित्रावारुणींचा अयोनीसंभव पुत्र, शिव-पार्वतींचं तेज त्यांच्यात सामावलेलं असल्यामुळे त्यांचेही पुत्र असलेल्या अगस्त्यांचं अलौकिकत्व जन्मजातच होतं; पण त्या अलौकिकत्वाला कठोर परिश्रमांची जोड देऊन, अहंकाराला दूर ठेवून त्यांनी आपलं सगळं जीवन लोककल्याणासाठी व्यतीत केलं आणि संपूर्ण भारतवर्षात आश्रम स्थापन करून तेथे कुलगुरू अगस्त्यांची नेमणूक करून आपल्या कार्याचा आणि ज्ञानाचा प्रसार तर त्यांनी केलाच; पण या आश्रमांमुळे त्यांच्या कार्याचा आणि ज्ञानाचा वसा निरंतर चालत राहावा, याचीही सोय त्यांनी केली. त्यांचं द्रष्टेपण यातून जाणवतं. एकूण यातील कथांतून आणि तत्त्वज्ञानातून प्रकट होणारं अगस्त्य हे व्यक्तिमत्त्व पुराणकालीन असलं तरी ते आजच्या काळातही प्रेरणादायी ठरावं, अशा पद्धतीने ते चितारलं गेलं आहे.

या कादंबरीची भाषाही पौराणिक कादंबरीला साजेशी आणि लेखकाच्या मराठी आणि संस्कृतवरील प्रभुत्वाचा प्रत्यय देणारी आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत भाषेचा डौल कुठेही कमी होत नाही. संस्कृतप्रचुर भाषा असली तरी एकात एक गुंफलेल्या कथानकांमुळे कुठेही रटाळपणा येत नाही. जिथे जिथे तत्त्वज्ञान प्रकट झालं आहे, तिथे ती क्लिष्ट वाटली तरी तिथे ती तशीच असणं गरजेचं आहे, हे लक्षात घ्यावं लागतं. फक्त पिच्छा पुरवणे, पोवाडे गाणे हे वाक्प्रचार खटकतात. येवढा किरकोळ दोष वगळला तर भाषेच्या दृष्टीनेही ही कादंबरी सरस उतरली आहे, असं म्हणायला हरकत नाही. ❖❖❖

'अगस्त्य', पद्मगंधा प्रकाशन, पुणे
लेखक - डॉ. अनिल सहस्रबुद्धे,
पृष्ठ संख्या ३२७, मूल्य २५० रु.

अंजली पटवर्धन
४५, पद्मादर्शन सोसायटी, सातारा रोड,
पुणे ४११००९. भ्रमणध्वनी : ९७६७८३९१५४

नवे आजीव सभासद

४६) सरदेशमुख उज्वल कमलाकर, अक्कलकोट
४७) गुरव-पाटील प्रभाकर कल्याणराव, अक्कलकोट
४८) शेख महिबूब अ. लतिफ, अक्कलकोट
४९) सुभेदार शिरीष गोविंद, अक्कलकोट
५०) बुदले विनायक शिवशरण, अक्कलकोट
५१) टोणे शक्ती अशोक, अक्कलकोट
५२) गायकवाड विजय आत्माराम, अक्कलकोट
५३) गायकवाड विराग विजय, अक्कलकोट
५४) परिचारक दयानंद नारायण, अक्कलकोट
५५) पाटील अप्पाराव विठ्ठलराव, अक्कलकोट
५६) सुभेदार शर्वरी शिरीष, अक्कलकोट
५७) सुभेदार शुभांगी शिरीष, अक्कलकोट
५८) मणूकर अतुल चंद्रकांत, अक्कलकोट
५९) मणूकर अनुपमा अतुल, अक्कलकोट
६०) बाडगंडी राधिका रमेश, अक्कलकोट
६१) बाडगंडी रमेश प्रल्हाद, अक्कलकोट
६२) पत्की मुकुंद नारायण, अक्कलकोट
६३) कुलकर्णी विजय नारायण, अक्कलकोट
६४) कुलकर्णी दत्तात्रय लक्ष्मण, अक्कलकोट
६५) हज्जु शब्वीर अल्लाऊद्दीन, अक्कलकोट
६६) ग्रामोपाध्ये सुखदा संतोष, अक्कलकोट
६७) तडकलकर विजय वसंत, अक्कलकोट
६८) बिरासदार शैलेश अरुण, अक्कलकोट
६९) घटे सिद्धराम शिवराय, अक्कलकोट
७०) महिंद्रकर देविदास लक्ष्मणराव, अक्कलकोट
७१) घोडके जालींदर रामचंद्र, बारामती
७२) जोशी अंकुर हेरंब, पुणे
७३) जोशी हेरंब बाळकृष्ण, पुणे
७४) पडवळ बबन खंडू, पुणे
७५) पडवळ मेघना खंडू, पुणे
७६) गोराड मीनल निवृत्ती, पुणे
७७) दातीर मदन नामदेव, पुणे
७८) पुजारी ज्योती मोहन, हडपसर
७९) पानसे श्यामल दिलीप, पुणे
८०) मोहोळ सुकुमार विश्वनाथ, सोलापूर
८१) बुधराय रेणुका पुरुषोत्तम, सोलापूर
८२) रसाळ पुंडलीक विठ्ठल, पिंपळगाव
८३) फुंदे संजय रामराव, पाथर्डी
८४) खत्ताडे संजय शेषराव, निपाणी
८५) बडे बाळासाहेब केशवराव, पाथर्डी
८६) गर्जे भागवत बन्सी, पाथर्डी
८७) विसपुते शिवाजी सावराम, लालसगाव
८८) जाधव सुरेश विनायक, कुंभारी
८९) जाधव सुनीता माणिकराव, कुंभारी
९०) खैरे सुभाष रामचंद्र, बाहेगाव, साळ
९१) दंडवते वसंतराव, लासलगाव
९२) शिंदे विश्वनाथ रघुनाथ, नासिक
९३) ओक शशांक दत्तात्रय, पुणे
९४) तोडमल वर्षा सतीश, पुणे
९५) सांगळे संदीप विठ्ठलराव, पुणे
९६) भणगे ज्ञानदेव वसंत, पुणे
९७) सारूक सुनंदा श्रीधर, पाथर्डी
९८) मरकड संजय मोहन, मढी पाथर्डी
९९) खेडकर दत्तात्रय त्रिंबक, पाथर्डी
१००) बडे संतोष महादेव, पाथर्डी
१०१) तिखे नीलिमा नारायण, पुणे
१०२) हावळे विजयकुमार मारूती, इचलकरंजी
१०३) मोरे जवाहर लक्ष्मण, सोलापूर
१०४) शास्त्री सुभाष वर्धमान, सोलापूर
१०५) स्वामी ईरेश सदाशिव, सोलापूर
१०६) मोहोरकर राजकुमार जटींग, सोलापूर
१०७) पाटील उज्वला रावसाहेब, सांगली
१०८) साळुंखे कुमुदिनी सूर्याजी, धुळे
१०९) जाधव संपत गणपत, पुणे
११०) पोटे देविदास शंकर, ठाणे
१११) किरवले समाधान आश्रुबा, सिरसाळ
११२) दिवेगावकर कौस्तुभ चंद्रप्रकाश, लातूर
११३) वैद्य सुनंदा माधवराव, धुळे
११४) शिंदे अरुण, मंगळवेढा
११५) गायकवाड लीलाधर बंडू, पाचोरा
११६) चव्हाण मोरसिंग गरदल, पाचोरा
११७) तडवी श्रावण बाबूलाल, पाचोरा
११८) सूर्यवंशी माया बाबूराव, पाचोरा
११९) पाटील देसले दिलीप गोबाजी, पाचोरा
१२०) डोंगरे प्रविण माधवराव, पाचोरा

अनुक्रमणिका

पुस्तक परिचय

दत्ता हलसगीकरांच्या कवितेचे यथामूल संपादन 'प्रतिबिंब' – लीला दीक्षित

- सीमा होमूरकर

'प्रतिबिंब' हा दत्ता हलसगीकर यांच्या निवडक कवितांचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला असून, त्यात त्यांच्या 'आषाढघन', 'उन्हातल्या चांदण्यात', 'चाहूल वसंताची', 'सहवास', 'करुणाघन', 'शब्दरूप मी', 'कोशातून बाहेर' या काव्यसंग्रहातील कवितांबरोबरच काही अप्रकाशित कविताही समाविष्ट केल्या आहेत. हलसगीकरांच्या कवितेचे नेटके संपादन होणे आवश्यक होते. ही उणीव या संग्रहामुळे भरून निघत आहे. संपादनाचे काम लीला दीक्षित यांनी अत्यंत चिकित्सकपणे करून 'लीलया' पार पाडले आहे. त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !



लीला दीक्षित यांनी काव्यसंग्रहाच्या सुरुवातीस ह्या कवितेविषयी म्हटले आहे की, सद्‌भावना, सद्‌विचार आणि सद्‌आचार या तीन दिव्यांच्या प्रकाशात अखंड वाटचाल करणाऱ्या कविवर्य दत्ता हलसगीकरांना सप्रेम सादर. लीला दीक्षित यांची कवी आणि कविता याविषयीची सहृदय, काव्यात्मभावना प्रारंभीच व्यक्त होते. पुढे दीर्घ आणि सखोल अशा प्रस्तावनेत त्या म्हणतात, "दत्ता हलगसीकरांनी शेकडोंनी कविता लिहिल्या. सर्व कवितांना व्यापून राहणारा 'प्रसाद' हा महत्त्वाचा गुण त्यांच्या भाषेत आहे. 'ईश्वरीय प्रसाद' या धारणेतून ते कवितेकडे पाहतात. अत्यंत नितळ, आरस्पानी पाझरणारी त्यांची शब्दकला आहे." साऱ्या विश्वात भरून राहिलेले गाणे त्यांच्या उरात सतत नादत असते.

"समुद्रगाजात, पाऊसधारात
माझ्या उरात गातोय कोण ?

(अनुभव-करुणाघन)

कवी दत्ता हलसगीकर हे गेली पन्नास वर्षे सातत्याने कविता लेखन करीत असून त्यांनी अनेक जातींची कविता लिहिली. कधी सामाजिक कविता तर कधी प्रेमकविता, कधी सोज्वळ ओवी, अभंगरचना तर मुक्तरचना. ह्या सगळ्या कविता प्रकारांचा समावेश संग्रहात आहेच. पण त्यांच्यातला कवी दिसतो तो तत्त्वचिंतनात्मक कवितेतून. कवीमन अत्यंत संवेदनशील असल्याने वैयक्तिक वा सामाजिक जीवनात ज्या ज्या वेळी मनाला अस्वस्थ करणाऱ्या किंवा प्रसन्न करणाऱ्या घटनांचा अनुभव त्यांना आला त्या त्या वेळी त्यांनी आपल्या मनातील विचारांना भावनांना काव्यरुप दिले, हे काव्यरुप अनुभवातून आल्याने त्यात एक प्रकारचा उत्कटपणा, प्रामाणिकपणाही आढळतो. त्या विषयीचीच भावना व्यक्त होणारी ही कविता,

शब्द मनाचे आरसे- शब्द ईश्वराचे दूत
माझ्या कवितांमधून मीच होतसे प्रसूत

(शब्दरूप मी, चाहूल वसंताची)

ह्या ओळी वाचताना 'माझीया मीच त्यालो' या संत तुकारामांच्या जाणीवेची आठवण तर होतेच. त्याचबरोबर कवितेचे 'संतकुळ' लक्षात येते.

अनेक रसिक वाचकांना भावणारी आणि शुभेच्छापत्रावर, फलकावर विराजमान असलेली 'उंची' ही कविता लक्ष वेधून घेते. साध्या, निरलंकृत शब्दातून सद्सद्विवेकाने समाजातील सत्प्रवृत्तींना केलेले हे आवाहन आहे काही कविता कवींसाठी भाग्यकारक ठरतात. काही कवितांचे भाग्य कवींहून मोठे असते. या दोन्ही अर्थांनी 'उंची' ही कविता एक अमोल देणं आहे.

ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुले द्यावीत.
ज्यांचे सूर जुळून आले
त्यांनी दोन गाणी गावीत.

(उन्हातल्या चांदण्यात)

संग्रहातल्या अनेक कवितातून कवीने करुणदृश्य अत्यंत समर्थपणे शब्दबद्ध केल्यामुळे त्यांची कविता रसिकांच्या अंतःकरणाला भिडते. त्याचबरोबर ती करुणा प्रामाणिक आणि मानवतावादी असल्याचा अनुभवही

अनुक्रमणिका

कवितेमधून येतो. समाजातल्या वेगवेगळ्या घटकांचा, घटितांचा जीवनविषयक पट मांडताना 'दुःखाचेही स्वागत करावे' असा सूरही अनेक कवितांतून उमटतो. दुःखाला मित्र, पाहुणा मानले म्हणजे दुःखाचे दुःख कमी होते. त्याबरोबरच दुःखामुळेच सुखाची किंमतही कळते. ह्याचा प्रत्यय 'स्वागत' (आषाढघन) ह्या कवितेतून येतो. दुःखाला, वेदनेला सामोरे जाण्याचे बळही काही प्रमाणात वाचकाला मिळते.

मनाने चिरतरुण असणारे हलसगीकर नितांत सौंदर्याची उपासना करणारे आहेत. त्यामुळे त्यांची कविता सात्त्विक, आंतरिक तेजाने उजळून निघते. वास्तवाची जाणीव असूनही नजरेत एक स्वप्न जपल्यामुळे ते तरुण मनालाही जवळचे वाटतात. त्याच आशयाची ही कविता.

'तरुण शक्ती दिव्य ज्योत, तिची कधी मशाल होते,
कधी दीन दुबळ्यांसाठी ती मायेची शाल होते

(तरुणांबद्दल बोलायचे तर)

ह्या संग्रहातील कविता वाचताना असं लक्षात येतं की, हलसगीकरांची कविता अनुभवाशी प्रामाणिक, सश्रद्ध मनाची, सद्भावनेच्या गंधाची, विविध रसांची, दुःखितांना, निराश मनांना आश्वासक धीर देणारी, जे जे चांगले त्याचा आदर, गौरव करणारी आणि सधन आशयाची आहे.

कविता वृत्तबद्ध असो, की मुक्तछंदातील. तिच्या सुभग रचना सौष्ठवामुळे संग्रहातील कविता लक्षवेधी तर ठरतेच. त्याशिवाय त्यातील आशय हा सौहार्दाचा, समाधानाचा, माणूसपणाचा दर्शक वाटतो. कित्येक कवितांमधून जगण्यावर निष्ठा आणि जगणे सुंदर करण्याची भूमिका स्पष्ट होते. त्याचबरोबर कविता वाचनाना आपलाच अनुभव कवीने शब्दबद्ध केल्याचा भासही रसिकांना येतो. त्यामुळे हलसगीकरांची कविता दीर्घकाळ मनात दरवळत राहते.

एकूणच लीला दीक्षित यांनी कवितेविषयी 'रुची' आणि 'अभिरुची' असणाऱ्या रसिकांचा विचार करून हलसगीकरांच्या कवितेचा धांडोळा सखोलपणे या काव्यसंग्रहात 'प्रतिबिंबित' केला आहे.

'समुद्रकाठची रात्र' - बा. भ. बोरकरांच्या कथा

२०१० हे साल बा. भ. बोरकरांच्या जन्मशताब्दीचे वर्ष. त्यानिमित्ताने सोलापूरच्या सुविद्या प्रकाशनने बोरकरांचा 'समुद्रकाठची रात्र' हा कथा-संग्रह पुनः प्रकाशित केला; आणि वाचकांना त्या कथांच्या पुनर्भेटीचा सुखद आनंद दिला; त्याबद्दल त्यांना धन्यवाद !



बोरकरांची लावण्यमयी कविता चांदणवेलीसारखी मन गुंतवून टाकते, तसंच त्यांच्या कथाही वाचकाला एका वेगळ्या विश्वात घेऊन जातात. त्यांच्या कथांतून लक्षात राहतात ती घराण्याचा विलक्षण अभिमान असणारी माणसे, परंपरांना जपणारी, त्याचबरोबर जिद्दी व मानी! त्यांच्या निष्ठा, त्यांची ध्येये ह्या सर्वांचे प्रत्ययकारी चित्रण या कथासंग्रहात दिसते.

'समुद्रकाठची रात्र' ही पहिलीच कथा भोगविलासाच्या प्रवाहाचे प्रतिनिधित्व करणारी आहे. आयुष्यभर ज्यानं भीतीनं, नीती-अनीतीच्या कल्पनांनी मन मारलं, त्या सुरेश शिरोडकराच्या जीवनाची ही कहाणी एका वेगळ्याच जगात घेऊन जाते. ही गोमंतकीय जीवनातील भोगविलासाचे स्थान रंगवणारी कथा असली तरी ती लक्ष्मणराव सरदेसाई, व्यं. अ. पै, रायकर इ. लेखकांच्या जशा कथांपेक्षा अगदी वेगळी आहे. ती केवळ भोगविलासाच्या तिथेच थांबत नाहीत. समुद्रकाठावर भरलेल्या जत्रेतील रंगीवेरंगी वातावरणाचे चित्रण अखेर एका अतींद्रिय जगात घेऊन जाते; हे तिचे वैशिष्ट्य. एका विषप्रयोगाने मेलेली तरुणी, त्या ओसाड बंगल्याच्या बाजूनं गेलेल्या तरुणाच्या प्रेयसीचं रुप घेऊन आपल्या अपुऱ्या वासना पुरवून घेते; याचं वास्तवता आणि भास या सीमारेषेवरचं चित्र बोरकरांनी कौशल्यानं या कथेत केलं आहे.

शाम पै व धर्मा पै यांचं घर फुटू नये म्हणून पदराला खार लावून ते वाचविणारे आणि त्याची वाच्यतासुद्धा न करणारे पुरुषोत्तमबाबा 'लामणदिवा' ह्या कथेत भेटतात. पुरुषोत्तमबाबांचं धन-व्याजासहित फेड करू पाहणारे पै-बंधूही जगावेगळेच ! त्या पै-बंधूंना समजावताना पुरुषोत्तमबाबा म्हणतात, 'गोव्यात परंपरेची आपली जी चार घराणी राहिली आहेत. ती दीनदुबळ्यांना सावरण्यासाठीच आहेत. कोसळणाऱ्या घराला आधार

मिळावा यासाठी आपली संपत्ती आहे. डोळ्यांत तेल घालून अखंड तेवणारे आणि सतत आश्वासक आणि उजेड देणारे समाजचे जागते लामणदिवे आहेत.' (पृ. ११९) ह्या त्यांच्या उदगारावरून त्यांच्यामध्ये असलेली माणुसकी, त्याग आणि परोपकारीवृत्ती यांचे दर्शन घडते.

'पांघरूण' या कथेतील अंतुभटजींची पत्नी व्यभिचारी आहे. पण ते पाहूनही त्यांची शांती ढळत नाही. उलट ते तिच्या प्रियकरावर आपल्या अंगावरची शाल काढून घालतात. ती शाल पाहून त्यांची पत्नी लक्ष्मी पश्चातापाच्या आगीत सतत जळत राहते. कथेच्या अखेरीस उभी राहते ती अंतुभटजींच्या निधनाने माणसात आलेली लक्ष्मी. तिच्या आक्रोशाचा जेव्हा इतर स्त्रिया तिरस्कार करतात तेव्हा ती म्हणते, "त्यांच्यावर प्रेम होतं म्हणून, माझं कुंकू गेलं म्हणून किंवा मुलांचा बाप गेला म्हणून रडत नाही मी, पण दुसऱ्याच्या अब्रूवर पांघरुण घालणारा गावातला एकुलता एक सज्जन गेला, म्हणून रडते मी.' (पृ. ८३) माणसाचे वागणे तसे विलक्षण असते. त्याच्या कृतीउक्तीतील शोध घेण्याचे काम लेखकाने या कथेतून केले आहे.

'सोनकेळ' ह्या कथेत कुलागाराचे वर्णन हे नुसते वर्णन नाही. तर तेथे लेखकाने कथेची नायिका शांतागौरी आणि कुलागार या द्रोहोंची मानसिक एकरुपता दाखविली आहे. या कथेत बोरकरांची कवितेतील शब्दकळा अधूनमधून जिवंत होते. त्यामुळे मंगेशबाबा आणि शांतागौरी यांच्या संवादातील 'नाट्य' प्रकर्षाने वाचकांच्या मनाला भिडते.

'सुताराची सून' मध्ये एका लंपट पोर्तुगीज पोराला एक सुताराची सून प्रायश्चित देते आणि तो भूत होऊन साऱ्यांना झपाटू लागतो हे एका नवोढेच्या निवेदनातून नाजूकपणे व्यक्त होते.

या संग्रहातील 'प्रियदर्शनी' व 'निरक्षराचा प्रश्न' या दोन कथा काहीशा वेगळ्या आहेत. गोमंतकीयांच्या एका विलोभनीय पैलूवर पहिली प्रकाश टाकते. गोवेकर पोटासाठी भटकत कितीही दूर गेला तरी जन्मभूमीची आठवण विसरत नाही; आणि आपल्या देहाची माती अखेर तिथेच पडावी यासाठी तो कसा आसुसतो हे चार नंबरच्या केबिनमधल्या म्हाताऱ्याच्या कहाणीतून उत्कटपणे व्यक्त होते. गोव्याची भूमी एकदा पहावी, ही त्याची अपेक्षा पुरी न होताच त्याचे प्राणोत्क्रमण होते आणि बोटीच्या नियमाप्रमाणे समुद्रदफन त्याच्या वाट्याला येते. पण भगीरथ प्रयत्न करून गोव्याच्या गव्हर्नराच्या संमतीने प्रेत गोमंतकाच्या भूमीवर उतरविण्याची परवानगी बोटीवरच्या गोवेकरांना मिळते. आपल्या मायभूमीवर उतरविण्याचा पहिला मान ते त्या शवाला देतात कारण, "जिवंतापेक्षा त्या शवाचे स्वागत करायला आपल्या प्रियदर्शिनी मायभूमीला अधिक आनंद होईल, यात कुणालाच शंका नव्हती. (पृ. १३०) बोरकरांची ही कथा गोवेकरांच्या मनाच्या नाजूक धाग्यांना हात घालते.

'निरक्षराचा प्रश्न' मध्येही एका सामान्य पाववाल्याने मोठा अर्थपूर्ण प्रश्न विचारला आहे. त्याचे उत्तर लिसेवातल्या प्राध्यापकालाही देणे जड जाते. इथेही जुन्या निष्ठाच आहेत. सुखाचे दिवस येऊनही पूर्वायुष्य विसरणे अंतोन या पाववाल्याला पाप वाटते. पण हुशार गिल्येर्मला शिक्षणाचा गर्व चढल्यावर आपल्या निरक्षर बापाची लाज वाटू लागते; आणि त्याचा खोटेपणा कळल्यावर, "जी विद्या लबाड्या करायला, आईवडिलांच्या परंपरांची शरम वाटायला लावते ती विद्या नाही; तर साक्षात अवदसा." (पृ. ६२) म्हणून तो गिल्येर्मचे शिक्षणच बंद करून टाकतो. त्या निरक्षर पण निर्मळ हृदयाच्या अंतोनच्या प्रश्नाचे उत्तर देणे लेखकाबरोबर वाचकांनाही अशक्य वाटते.

कथासंग्रहातल्या अनेक कथांमधून माडांच्या सावल्या, उगवती मावळतीची रंगसंगती, समुद्राच्या लाटा, संपन्न कुळागरे, मनस्वी माणसे, देव-देवस्की, श्रद्धा जपणाऱ्या व्यक्ती, फिरंग्यांच्या कडू-गोड आठवणी इत्यादींचे जे विलोभनीय दर्शन घडते. त्याचबरोबर वास्तववादी व्यक्तिचित्रे, अद्भुत गंधाची कथानके काव्यात्म निवेदनशैलीमुळे वाचनीय झालेली आहेत. बा. भ. बोरकरांची कथा वाचकांना गुंगवून टाकते. ❖❖❖

सीमा होसूरकर
'आगम', फ्लॅट नं. ९, 'बी' विंग, आयडियल कॉलनी,
पौड रोड, कोथरूड, पुणे ३८.
भ्रमणभाष : ९४२३०६७९६९, ९७६६०२७७८३

१) प्रतिबिंब - लीला दीक्षित (दत्ता हलसगीकर यांच्या निवडक कविता) सुविद्या प्रकाशन, सोलापूर, मूल्य रु. १२०/-

२) 'समुद्रकाठची रात्र' बा. भ बोरकर, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, मूल्य रु. १५०/-


अनुक्रमणिका

पुस्तक परिचय

बोली : समाज, साहित्य आणि संस्कृती– डॉ. कैलास सार्वेकर

- डॉ. मनोहर जाधव

अलिकडे बोलीच्या अभ्यासाची निकड अनेक अभ्यासकांना जाणवू लागली आहे. यामध्ये विशेष करून भाषावैज्ञानिकांचा समावेश आहे. तसा तो भाषा आणि साहित्यक्षेत्रात अध्यापन करणाऱ्या अध्यापकांचाही समावेश दिसतो आहे. अशा प्रकारच्या अभ्यासाची जिज्ञासा निर्माण होणे ही निश्चितच आनंददायक गोष्ट आहे. नव्या पिढीतील अभ्यासकांची संख्या या संदर्भात उमेद वाढविणारी आहे. स्वातंत्र्यानंतरच्या साठ वर्षात शिक्षणाचे क्षेत्र विस्तारत गेले. ग्रामीण भागात महाविद्यालयांची संख्या लक्षणीय वाढत गेली. याचे बरेवाईट परिणाम झाले. बरे परिणाम असे की, ज्यांना शिक्षणाची परंपरा नव्हती अशा समाजघटकांना शिक्षण उपलब्ध झाले. यातील काही मंडळी अध्यापनक्षेत्रात दाखल झाली; आणि नव्याने आपल्या जीवनानुभवाचा, परंपरेचा, भाषेचा अन्वयार्थ लावू लागली. त्यातून बोलींच्या व्यापक अभ्यासक्षेत्राचा परिचय वाढत गेला. अनेक मंडळी बोलीविषयक संशोधनात्मक कार्याकडे वळली. महाराष्ट्रातील अनेक प्रदेशात या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या नावांपैकी डॉ. कैलास सार्वेकर हे एक नाव आहे. अध्यापनक्षेत्रात पाव शतकापासून ते कार्यरत आहेत. खानदेश जन्मभूमी आणि कर्मभूमी असल्यामुळे खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीन जिल्ह्यातील परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलीसंबंधी डॉ. सार्वेकरांनी आपल्या अनेक लेखांतून चिकित्सा केलेली आहे. प्रदेश परिसर अथवा तालुकानिहाय बोलींची पाहणी आणि वरील तीन जिल्ह्यांत जे वैशिष्ट्यपूर्ण समाजसमूह आहेत, त्यांच्या बोलींचा अभ्यास अशा विविध प्रकारचे हे लेख वेळोवेळी वेगवेगळ्या नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहेत. या सर्व लेखांचे संकलन करून डॉ. सार्वेकर यांनी "बोली : समाज, साहित्य आणि संस्कृती" हे पुस्तक सिद्ध केले आहे. समाज, साहित्य आणि संस्कृतीमध्ये बोलींचे अनन्यसाधारण स्थान असते; आणि बोलीतील भाषाव्यवहार हा अटळ भाग असतो. आता बदलत्या काळानुसार या बोलींच्या सामर्थ्याचा नव्याने अभ्यास झाला तरच प्रमाणभाषेला बळ प्राप्त होईल आणि ती समृद्ध होईल, हे सूत्र या लेखनामागे आहे आणि ते बरोबरदेखील आहे.



एकूण १४ लेखांचा, आणि तीन टिपणे आणि तीन प्रात्यक्षिके अशा परिशिष्टांचा समावेश या पुस्तकात डॉ. सार्वेकरांनी केला आहे. खानदेशातील बोली आणि बहिणाबाई चौधरींची काव्यभाषा, भारतीय भाषाभगिनी गुजराती नि अहिराणी, आदिवासी विद्यार्थ्यांमधील भाषिक न्यूनगंड : वास्तव आणि उपाय, खानदेशातील पावरा बोली, खानदेशाची कोकणी बोली, जामनेरी बोली, आदिवासी बोलीतील म्हणी : आकृतीबंध व भावसौंदर्य, आदिवासींची संस्कृतीगीतं, सीमा प्रदेशातील अमराठी भाषकांची मराठी उच्चारप्रक्रिया ही काही लेखांची शीर्षकं आहेत. या शीर्षकावरून पुस्तकातील आशयवैविध्याची कल्पना येऊ शकेल. बोलींचा अभ्यास हा केवळ वाङ्मयीन किंवा सामाजिक अंगाने होऊ शकत नाही तर त्या अभ्यासाला अनेक प्रकारच्या मिती आणि कक्षा आहेत. त्या समजून घेतल्याशिवाय हा अभ्यास पुढे जाऊ शकत नाही. संस्कृतीचे आणि सामाजिक जीवनाचे उभे आडवे

छेद निरखून आणि त्यांच्या अंतर्गत विविध घटकांची आपसूक झालेली गुंतागुंत लक्षात घेऊन हा अभ्यास होऊ शकतो. म्हणजे एका अर्थाने अभ्यासकाची ही कसोटीच आहे. या कसोटीला उतरणारा अभ्यासक या अभ्यासाची मांडणी करू शकतो. डॉ. सार्वेकर यांनी ही कसोटी चांगल्या प्रकारे पार पाडली आहे. आपल्याच परिसरातील बोलींचा अभ्यास करताना एक धोका असतो. तो असा की, अभ्यासकाच्या लेखनातून आणि भूमिकेतून अभिनिवेश, उदात्तीकरण, सुप्त अथवा प्रकट आवेश डोकावण्याची शक्यता असते (आणि या गोष्टींचे हिरीरीने समर्थनही केले जाऊ शकते, केले जाण्याची शक्यता असते.) परंतु डॉ. सार्वेकरांनी हा समतोल सांभाळलेला आहे. उदाहरणार्थ 'खानदेशातील बोली आणि बहिणाबाई चौधरींची काव्यभाषा' तसेच 'खानदेशातील बोली आणि बहिणाबाई चौधरींची काव्यभाषा' मराठीतील अनेक नामवंत समीक्षकांनी बहिणाबाई चौधरींच्या कवितेची बोलीभाषा ही अहिराणी बोली आहे, असा अभिप्राय दिला आहे. हा अभिप्राय कसा अप्रस्तुत आहे; याचे साधार विवेचन करून हा संभ्रम का निर्माण झाला असावा याचे तर्कशुद्ध विवरणही डॉ. सार्वेकरांनी केले आहे. अहिराणी आणि खानदेशी (लेवा बोली की जी बहिणाबाईंच्या कवितेची बोलीभाषा आहे.) यातील साम्यभेदही उच्चारप्रक्रिया आणि व्याकरणाच्या अंगाने उलगडून दाखविले आहेत. 'माझी माय सरसोती' ही बहिणाबाईंची लेवा बोलीतील मूळ कविता अहिराणी बोलीत रूपांतरीत करून दाखवली आहे. या रूपांतरामुळे दोन्ही बोलीतील फरक चटकन लक्षात येतो. या सर्व विवेचनात वस्तुनिष्ठता राखल्यामुळे अभिनिवेशाला लेखात थारा मिळालेला नाही.

'आदिवासी विद्यार्थ्यांमधील भाषिक न्यूनगंड : वास्तव आणि उपाय' हा लेख भाषाविषयाचे अध्यापन करणाऱ्या नव्या-जुन्या अध्यापकांनी वाचण्यासारखा आहे. शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांशी कशा प्रकारे संवाद साधायला हवा; आणि त्यातून अध्यापनाचा आनंद मिळवताना, विद्यार्थ्यांमध्ये कसा आत्मविश्वास निर्माण करावा हे या लेखातून वाचायला मिळते. शिक्षकाने कायम लवचिक, विद्यार्थीसन्मुख आणि प्रयोगशील असायला हवे, शिक्षकाला आणि विद्यार्थ्यांनाही भाषिक सृजनाचा आनंद घेता येऊ शकतो आणि तो आनंद अनमोल असतो, हे या लेखातून प्रत्ययाला येते. खानदेशातील पावरा, कोकणी आणि जामनेरी बोलींचे वैशिष्ट्य आणि वेगळेपण डॉ. सार्वेकरांनी सोदाहरण उलगडून दाखविले आहे. त्या-त्या बोलीच्या अनुषंगाने संस्कृतीचा विचार कसा करता येतो, याचे विवेचन मूळातून वाचण्यासारखे आहे. या बोली बोलणाऱ्या स्थानिक विद्यार्थ्यांना अथवा अभ्यासकांना एक भाषिक भान उपलब्ध होऊ शकेल आणि त्यांच्या विचारांच्या दिशा स्पष्ट होऊ शकतील असे विवरण या लेखांमध्ये वाचायला मिळते. लोकवाङ्मय आणि ग्रामीण कवितांतील परस्परानुबंध तपासताना बहिणाबाई चौधरी, ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव या कवींच्या कवितेचा संबंध लोकजीवनाशी आणि लोकवाङ्मयाशी कशा प्रकारे जुळून आलेला आहे, त्याचे विश्लेषण अभ्यासकाने केले आहे. लोकवाङ्मय आणि ग्रामीण कविता यांचे सहोदर उलगडून दाखवताना अभ्यासकाने वस्तुनिष्ठ आणि डोळस प्रतिपादन केलेले दिसते. या लेखाच्या मांडणीमुळे या पुस्तकाला संशोधनमूल्य प्राप्त झालेले आहे.

बोलीच्या अभ्यासातून भाषिक विकासाच्या कक्षा कशा रूंदावल्या जाऊ शकतात आणि संशोधकांना एक नवीन ऐवज आणि दृष्टिकोन प्राप्त होऊ शकतो, हे वास्तव या ग्रंथाने समोर ठेवले आहे. नव्या पिढीतील विद्यार्थ्यांना आणि अभ्यासकांना नव्या दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त करणारा हा ग्रंथ आहे. भाषेच्या अभ्यासाजवळ निर्लेप चिंतन, प्रयोगशीलता, बांधिलकी, कृतीसातत्य असेल तर त्याचा अभ्यास त्याच्याशी संबंधित सर्वच घटकांना प्रेरणादायी ठरतो, हे या ग्रंथाने सिद्ध केले आहे. या अभ्यासक्षेत्रात डॉ. कैलास सार्वेकरांनी सतत क्रियाशील राहून नवीन संशोधकांना मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करावीशी वाटते.

❖❖❖

बोली : समाज, साहित्य आणि संस्कृती (मार्च २०१०)
- डॉ. कैलास सार्वेकर, प्रतिभास प्रकाशन, परभणी. मूल्य रु. १६०/-

डॉ. मनोहर जाधव
मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ. पुणे - ७.


अनुक्रमणिका

पुस्तक परिचय

भावनांच्या आंदोलनांचा प्रवास 'मंज़िल–ए–मक्सूद पाकिस्तान'

दीपाली कात्रे

'अष्टचक्री रोरोयण', 'भ्रमंती देशविदेशांची' 'गाथा गुणी जनांची', 'हवडा ब्रिजवरून' या पुस्तकांचे, नव्हे प्रवास वर्णन लिहिणारे लेखक प्रवीण कारखानीस यांच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'मंज़िल-ए-मक्सूद पाकिस्तान' या पुस्तकाच्या आत दडलेल्या बेदरकार कलंदर, एकला चला रे या मानवी गुणांचा परिचय आपल्याला होतो.



बँकेत काम करत असताना मिळणाऱ्या प्रत्येक संधीचा फायदा घेत आयुष्याला एक वेगळे वळण देण्याचा विनधास्तपणा प्रवीण यांनी केला. प्रवास करणं तेही यात्रा कंपन्यांचा टेकू न घेता; कधी सायकल कधी मोटार सायकल या वाहनांवर आरूढ होत, प्रत्येकाशी सौहार्द नातं जोडत जे डोळ्यांनी टिपून अंतरंगात नेत त्यात भिजवत ठेवत मगच वाचकांसमोर उलगडून ठेवणं- हा प्रत्यय त्यांच्या सर्वच पुस्तकांतून येतो.

'ना तो कारवाँ की तलाश है, ना हमसफर की तलाश है' याच भूमिकेने भटकंती केली या लेखकाने ! मग या भटकंतीला 'प्रवासवर्णन' या साहित्याच्या आकृतीबंधात मापून बसवणं म्हणजे ही मर्यादाच भाषेची !

'अभयं मित्रात्, अभयं अमित्रात्' ही प्रार्थना आळवत आळवत या साहसी प्रवासी लेखकानं पाकिस्तान सारख्या भयानक आणि भयावह वाटणाऱ्या 'अ-मित्र' राष्ट्रातून मुशाफिरी करून येण्याची आपली हौस भागवून घेतली तीही वयाची साठ वर्ष पूर्ण होत असताना. निमित्त कोणते तर भारत-पाक क्रिकेट सामन्यांचे.

खरं तर परदेश प्रवास हा कारखानीसांच्या आत मुरलेला गुण. आफ्रिका देशातील टांझानिया, झांबिया युगांडा अशा अनेक ठिकाणी जात. फ्रांसमध्ये एका कुटुंबात राहून, (लेमाँ येथे शिक्षकाच्या घरी) श्रीलंका, मालदिव, भूतान, ब्रह्मदेश, रोम या ठिकाणचा पाहुणचार घेत असताना पाकिस्तानात जायला मिळत नाही याची खंत न बाळगता त्याची इच्छा धरत अखेर मार्च २००४ मध्ये त्यांनी पाकिस्तानात पाऊल टाकलं. मुंबई ते रोम आणि रोम ते मुंबई असा मोटरसायकलने प्रवास करणारे कारखानीस सगळे सव्यापसव्य करीत दिल्ली-लाहोर बसने, ना कुणाची साथ ना सोबत असं करीत पोहोचले सुद्धा. पाकिस्तानातला प्रवासही तिथल्या स्थानिक साध्यासुध्या बसनंच करायचा असं ठाम ठरवल्यामुळे प्रवासातील बारीकसारीक नोंदी टिपता आल्या. विविध वास्तू आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व असो किंवा काही जणांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी असोत, या अनुषंगाने ज्या भावना लेखक दमदारपणे मांडतो; त्याला तोड नाही. या एकाच कारणाने या पुस्तकाची रसिकांत चर्चा होत आहे. प्रवास सर्वचजण करतात. पण लेखक मात्र एखाद्या गोष्टीचे चित्रण करताना नकळत दुसऱ्या अनुभवाकडे घेऊन जातो; ही अनुभव घेण्याची व लेखनाची ताकद होय. यापूर्वी केलेल्या प्रवासवर्णनाची रोमांचकारी माहिती वाचकांना असली तरी या पुस्तकात ओघवत्या अनुभवांची वळेसर वाचक अलगदपणे हातात घेऊन हुंगून परत हळूच खाली ठेवतो हेच या पुस्तकाचे यश.

लेखक अनेकांच्या मेहमान नवाजीनं हरखून गेला, सामान्य माणूस साधाभोळा, सरळ मनाचा असतो, राजकीय वैरभावानं तो सहसा वागत नाही, याचा प्रत्यय लेखकाला पाकिस्तानात आला आहे.

अनुभवाला आवश्यक असे उर्दू भाषेचे संदर्भ देत

भाषाच माणसाला जवळ आणते; असे अनेक प्रसंग ते देतात. उदा. कराची सारख्या महानगरीत मध्यरात्री रहायचं कोठे ? या प्रश्नाला फळविक्रेत्यानं कसं उत्तर दिलं, रावळीपिंडीतला टॅक्सीवाला भाडं नाकारीत काय म्हणाला ? पेशावरच्या बाजारात टोपी घेतानाचा प्रसंग, काळजी वहाणारा साधा रिक्षावाला, राणा एहसान सारखी व्यक्तिमत्त्व हे सर्व वाचताना आपण प्रवासवर्णन वाचत नाही तर भावनांची आंदोलनं अनुभवत असतो.

रावी नदीच्या काठावर असलेल्या नूरजहानच्या जीर्णशीर्ण कबरीवर लिहिलेल्या पंक्ती वाचून लेखकाचं संवेदनशील मन द्रवलं. परंतू त्या कबरीवर कोरलेल्या फारसी भाषेतल्या पंक्तिंचा अर्थही लेखकानं समजावून घेतला. पुस्तकात त्याचा आशय असा आहे की कबरीवरती फुले, दीप, पक्ष्यांचे गाणे नको, तर एकच सांगणे आहे मला कायमचे विसरून जा.

कवी इक्बाल यांच्या नावाचा एअर-पोर्ट बघता क्षणी लेखकाला मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग तो प्रसंग आठवतो. भौगोलिक माहिती देताना कोठेही रसहानी झालेली नाही. हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. दुर्मिळ क्षणांची नोंद सुद्धा अगदी ओघवती आहे. उदा. कराची विद्यापीठ, विद्यापीठाला उर्दू भाषेत दानिशगाह म्हणतात. दानिश म्हणजे ज्ञान, दानिशवर म्हणजे १ ज्ञानी व्यक्ती-ज्ञानेश्वर.

पेशावर येथे असताना त्यांना भारतरत्न, सरहद्द गांधी खान अब्दुल गफारखान यांची आठवण होते. लेखक इथे लोकमान्य टिळक, आगरकर-चिपळूणकर यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल लिहितो आणि 'उतमन झाई', 'तुरंग-झाई' येथील गफारखान यांचं शैक्षणिक कार्यही सांगतो. पुश्तू किंवा पख्तू नियतकालिकाची आठवण करून देतो.

लेखकाच्या आयुष्यात अनेक मोठ्या व्यक्तींचा सहवास आला आहे. सी. व्ही. रामन, मिहीर सेन, व्हायोलीन वादक जोग, जनरल अरूण वैद्य अशी कितीतरी नावं सांगता येतील. पाकिस्तानातसुद्धा सिंध मधले महान तत्त्वचिंतक, ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असलेले सत्पुरुष साधू वास्वानी यांना आठवत लेखक आपल्याला पुण्यात आणतो. १९४८ साली साधू वास्वानी पुण्यात स्थायिक झाले. महर्षी कर्वे यांच्या प्रेरणेने पुण्यात इंग्रजी माध्यमाची मुलींची शाळा सुरू केली. तेव्हाच लेखकाला १९६२ ते ६६ काळात शिकत असताना साधू वास्वानी यांची प्रवचनं ऐकायला मिळाली होती. लेखकानं ह्या अत्तर कुप्या अशा जपून ठेवल्या आहेत.

पुस्तकांत अशी अनेक ठिकाणं आहेत, जी आपल्याला डोळ्यांसमोर आणावी लागतात. याच एका कारणामुळे ह्या पुस्तकाबद्दल आपण काही लिहावं असं वाटू लागलं. जे. आर. डी. टाटा, ॲस्पीइंजिनिअर यांची आठवण देता देता मराठी उद्योजकांची ओळख देत, अंबरनाथमधे रहाणाऱ्या पुरुषोत्तम हरी लागू यांची आठवण करून देतात. प्रसंग आहे फाळणी संदर्भातला व कराचीत रहाण्याचा. उल्हासनगर, ती उल्हासनदी, सैन्याचे बरॅक्स आणि त्यात सिंध प्रांतातून आलेले रहिवासी कसे राहू लागले. इतिहास जिवंत झाला तरी वाचकांना अंतर्मुख नक्कीच केले आहे.

झुल्फिकार भूत्तो, महंमद अली जीना यांच्या संदर्भात आलेली माहिती केवळ माहिती नाही तो संवाद आहे. रत्ती-जीना यांची कन्या व नसली वाडिया यांबद्दल जीवनकहाणी उजेडात आणली आहे. विविध लेखकांचे संदर्भ देत प्रत्येक प्रकरण (ज्याला शीर्षक नाही) असं वाचनीय केलं आहे.

लेखक गेले ते क्रिकेटचं निमित्त साधून. त्या मैदानावरचे टिपलेले प्रसंग. पार्लेटिळक ते फर्गसन मधे शिकलेला लेखक भाषाशैलीत, नीटनेटकेपणाच्या मापनदंडात कोठेच कमी नाही. उदा. हेमू कलाणी यांच्या संदर्भातील कथन असो; वा जयप्रकाश नारायण असो.

रंगीत छायाचित्र, मलपृष्ठावर द्वारकानाथ संझगिरी यांचं मनोगत, प्राचार्य राम शेवाळकर यांनी त्यांच्या निधनापूर्वी काही दिवसच आधी प्रस्तुत पुस्तकासाठी विस्तृत प्रस्तावना लिहिलेली, प्रा. दवणे यांचे दोन शब्द पुस्तक चोहोबाजूंनी आटोपशीर केलेलं.

म्हणून हे प्रवासवर्णन सरधोपट पद्धतीचं नाही तर ही भावनांची आंदोलनं आहेत. हे पुस्तक वाचकाचे बोट धरून पाकिस्तानचा, लेखकाच्या अंतर्यामीचा प्रवास घडवून आणते यात शंका नाही. असं छान ओघवत. लक्षवेधी पुस्तक सर्वांनी हातात घ्यावं. ❖❖❖

प्रकाशक : नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, पृष्ठसंख्या फक्त १६८, मूल्य १८० रु.

दीपाली दत्तात्रय कात्रे
१६/ब/ न्यू बॉम्बे हाऊस, वडवली, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०२.
भ्रमणध्वनी : ९३२३३४०५२४. E-mail : dkkata.katre@gmail.com

अनुक्रमणिका

भव्यतेचं परिमाण लाभलेल्या प्रदीर्घ प्रेमकहाणीचा प्रभावी अनुवाद : 'गॉन विथ द विंड'

- माधव कर्वे

[जागतिक ख्यातीच्या 'गॉन विथ द विंड' ह्या कादंबरीचा अनुवाद वर्षा गजेंद्रगडकर यांनी पद्मगंधा प्रकाशन (पुणे) मार्फत मराठी भाषेत आणला. त्या निमित्ताने माधव कर्वे यांनी ह्या कादंबरीचा परिचय करून दिला आहे. मूळ कादंबरीचा अनुवाद करताना येणाऱ्या अनेक घटकांची चर्चा करण्याआधी मूळ कादंबरीचाच विविधांगांनी करून दिलेला हा उद्‌बोधक परिचय नवख्या वाचकाला मार्गदर्शक ठरेल. – संपादक]

गेल्या सात दशकांहून जास्त काळ जगभरातल्या वाचकांना झपाटून टाकणाऱ्या 'गॉन विथ द विंड' या प्रदीर्घ प्रेमकहाणीचं वर्णन सर्वार्थानं ऐतिहासिक म्हणून करता येईल. ज्या अनेक घटकांमुळे या महाकादंबरीला भव्यतेचं परिमाण लाभलं आहे, त्यातला एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे अमेरिकेतल्या कृष्णवर्णीयांच्या गुलामगिरीच्या शृंखला नाहीशा करणारा अमेरिकेचा एक क्रांतिकारी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन होय. १८६० च्या अमेरिकन राष्ट्राध्यक्ष निवडणुकीच्या प्रचारात दक्षिणेकडच्या राज्यांपलीकडे गुलामगिरी पसरू न देण्याचा मुद्दा लिंकननं ठासून मांडला होता. त्याची प्रतिक्रिया म्हणून कृष्णवर्णियांची गुलामगिरी असलेलली दक्षिणेकडची राज्यं फुटून निघाली; आणि त्यातून यादवी युद्ध पेटलं. दक्षिणेकडचं जनजीवन ढवळून काढणाऱ्या १८६५ पर्यंतच्या प्रत्यक्ष युद्धात दक्षिणेकडच्या राज्यांची हार झाली आणि पुढची पाचएक वर्षे युद्धोत्तर परिणामांना दक्षिणेकडचा भूभाग अनेक सामाजिक समस्यांना तोंड देत राहिला. अमेरिकन इतिहासाची काहीच पानं या काळात फडफडली; पण त्यात सहा लाखांहून अधिक माणसं मृत्युमुखी पडली. अनेक पारंपरिक समाजसंकेत भिरकावले गेले. एक नवी समाजव्यवस्था उभी रहात गेली.अनेक लक्षणीय साहित्यकृती या अशा राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक उलथापालथींच्या परिघात राहून माणसांच्या जगाबद्दल काहीतरी सांगू पाहतात. समीकरणं मांडू पाहतात आणि त्यामुळेच त्यांना भव्यतेचं परिमाण लाभतं. 'गॉन विथ द विंड'मधल्या प्रेमकहाणीला असे संदर्भ असल्यामुळेच ती निव्वळ प्रेमकहाणीच्या सीमारेषा ओलांडून बरेच स्तर व्यापत जाते. एक मोठं अवकाश असलेले असंख्य माणसांचं जग आपल्यासमोर उभं राहतं.

'गॉन विथ द विंड' ला अशी युद्धाची-राजकीय समीकरणाची पार्श्वभूमी असल्यामुळेच रशियन कादंबरीकार लिओ टॉलस्टॉयच्या 'वॉर अँड पीस' या अशाच एका मोठं अवकाश असलेल्या कादंबरीशी तिची तुलना केली जाते. विशेष म्हणजे 'गॉन विथ द विंड'ची पार्श्वभूमी असलेलं, अमेरिकन यादवी युद्ध पेटलेलं असतानाच, त्या आसपास टॉलस्टॉयची 'वॉर अँड पीस' ही महाकादंबरी रशियन वाचकांना युद्ध, मनुष्यसंहार, त्यातून होणाऱ्या उलथापालथींमधून समाजव्यवस्थेवर होणारे परिणाम आणि त्यामुळेच वाटणारी शांतीची अपरिहार्यता अशा मुद्यांवर अंतर्मुख करीत हाअती. नेपोलियननं रशियावर केलेल्या आक्रमणाची पार्श्वभूमी 'वॉर अँड पीस'ला आहे. म्हणजेच अब्राहम लिंकनच्या गुलामगिरीबाबतच्या भूमिकेचा संदर्भ जसा 'गॉन विथ द विंड'ला आहे; तसाच नेपोलियनच्या आक्रमकतेचा संदर्भ 'वॉर अॅण्ड पीस' ला आहे. अर्थात् 'गॉन विथ द विंड'ची लेखिका मागरिट मिचेलनं अशी तुलना योग्य नाही असं सांगत टॉलस्टॉयसमोर स्वतःकडे नम्र भूमिकाच घेतली. 'गॉन विथ द विंड' ही कादंबरी बहुतांशी नायिकाप्रधान आहे म्हणून किंवा एखाद्या तत्त्वज्ञाच्या भूमिकेतून स्कार्लेट ओहारा या मनस्वी नायिकेची कथा आपण मांडलेली नाही, अशा दृष्टीकोनामुळेही मागरिट मिचेलनं 'गॉन विथ द विंड'चा विचार स्वतंत्र झालेलाच बरा असं सुचवलं. कसंही असलं तरी इतिहासातल्या एका विशिष्ट कालखंडातल्या राजकीय-सामाजिक प्रवाहाच्या रेट्यामुळे ढवळून निघणाऱ्या एका समाजव्यवस्थेच्या परिघातलीच संघर्षाला थेट भिडणारी नायिका आणि तिच्याभोवतीचं ठेचकाळत, चाचपडत पुन्हा उभं राहू पाहणारं जग, 'गॉन विथ द विंड' मध्ये मागरिट मिचेलनं प्रभावीपणे दाखवलं

आहे. हेच या महाकादंबरीचं मोठं वैशिष्ट्य आहे.

मार्गारेट मिचेलची 'गॉन विथ द विंड' ही कादंबरी आणखीही काही कारणांमुळे ऐतिहासिक ठरते. मिचेलची ही पहिलीच कादंबरी १९३६ मध्ये प्रकाशित झाली आणि वाचक-समीक्षकांचा या कादंबरीला सारखाच उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १९३७ मध्ये मार्गारेट मिचेलला मानाचा पुलित्झर पुरस्कार मिळाला तर १९३९ मध्ये या कादंबरीवरून निघालेला चित्रपट सर्वदूर गाजला; आणि त्यामुळेही या कादंबरीची पाळंमुळं पसरत गेली. एका दिवसात पन्नास हजार प्रती हातोहात खपण्याची विक्रमी अद्भुतरम्य घटना या कादंबरीच्या वाट्याला आली तर पहिल्याच वर्षात पंधरा लाख प्रतींची अचाट विक्री याच कादंबरीनं नोंदवली. जगातल्या तीस भाषांमध्ये भाषांतरित झालेली ही कादंबरी प्रकाशनाच्या वर्षी बायबलच्या खालोखाल प्रचंड खप असलेली कादंबरी म्हणून ओळखली गेली. अगदी अंधांसाठी ब्रेल लिपीतसुद्धा ही कादंबरी नेण्यात आली आहे.

मार्गारेट मिचेलचं वास्तव्य बहुतांशी ॲटलांटामध्येच होतं. लहानपणापासून लेखनाकडे कल असलेल्या मिचेलचा जन्म १९०० मधला. अमेरिकन यादवी युद्धाच्या कथा घरातल्या वडिलधाऱ्यांकडून ऐकत ती लहानाची मोठी झाली. त्याचाच प्रभाव 'गॉन विथ द विंड'वर दिसून येतो. महाविद्यालयीन शिक्षणानंतर आईच्या निधनामुळे घराची जबाबदारी तिनं कर्तेपणानं सांभाळली आणि पत्रकारितेत स्त्रिया नसण्याच्या काळात तिनं पत्रकार म्हणून काम केले. 'गॉन विथ द विंड'चं लेखनही तिनं ऐतिहासिक तपशिलांबाबत खूपच जागरुकता बाळगून संशोधनपूर्वक केलं.

'गॉन विथ द विंड'च्या लोकप्रियतेचं विश्लेषण करण्याचे प्रयत्न झाले तसे या कादंबरीला नाकं मुरडणारेही निर्माण झाले. लोकप्रियतेच्या बाबतीत असं म्हटलं गेलं; की अमेरिकेतल्या विसाव्या शतकाच्या तिशीच्या दशकातल्या महामंदीच्या काळात ही कादंबरी प्रकाशित झाली. मंदीनं ग्रासलेल्या त्या वेळच्या अमेरिकन समाजातल्या एका वर्गाला इतकी वर्ष उपभोगलेला सुखवस्तूपणा सांभाळणं अवघड जात होतं. मूल्यव्यवस्था बदलत चालली होती आणि हा वर्ग भूतकाळाच्या रम्य स्मृती चाळवत सुस्कारे टाकतच वाटचाल करत होता. या वर्गाला यादवी युद्धाचे हादरे बसून दक्षिणेतल्या होरपळलेल्या समाजाचं भूतकाळातल्या निवांत, सुखाच्या जीवनशैलीच्या स्मृतीरंजनात हरवून जाणं, वर्तमानाच्या धक्काबुक्कीला सामोरं जाणं कुठेतरी जवळचं वाटलं आणि त्यामुळे एक मोठा वाचकवर्ग या कादंबरीत स्वतःला पहात-शोधत राहिला. 'गॉन विथ द विंड' च्या टीकाकारांच्या दृष्टीनं एक आश्चर्यकारक मुद्दा म्हणजे विसाव्या शतकातल्या तिशीच्या दशकात साहित्यात-कलाक्षेत्रात प्रयोगशीलतेला नवे धुमारे फुटत असताना मार्गारेट मिचेलनं तशी फारच मेलोड्रॅमॅटिक, पारंपारिक वळणाची कादंबरी लिहिली. आणखी काही मुद्दे म्हणजे कृष्णवर्णियांबाबतची तिची कादंबरीतली भूमिका ही संदिग्ध वाटते, प्रत्यक्ष यादवी युद्धाची जी वर्णनं किंवा निवेदनं कादंबरीत येतात, ती मूळ कथानकाशी फटकून राहतात वगैरे वगैरे. कसंही असलं तरी गेल्या सात दशकांहून जास्त काळ मार्गारेट मिचेलच्या या महाकादंबरीचे अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न होत राहिले आहेत आणि होतीलही; कारण या कादंबरीची गुणवैशिष्ट्यं आणि त्यामुळे तिला लाभलेलं लोकप्रियतेचं वलयही तसंच आहे.

'गॉन विथ द विंड'ची नायिका स्कार्लेट आहोरा ही खरं तर न-नायिका म्हणून ओळखली जाते. याचं कारण म्हणजे मार्गारेट मिचेलनं ज्या काळात स्कॉर्लेटची प्रेमकहाणी शब्दबद्ध केली; त्याकाळातील प्रेमकहाण्यांमधल्या नायिका या विशिष्ट मुशीतल्या, विशिष्ट पारंपारिक संकेत असलेल्या आणि उदात्तीकरणाकडे झुकणाऱ्या असायच्या. मिचेलनं आपल्या अस्तित्वाचं भान सतत सांभाळत आपल्या आयुष्याची सूत्रं सतत स्वतःकडेच ठेवण्याचा हट्ट बाळगणाऱ्या बंडखोर स्कार्लेटचं व्यक्तिचित्रण करताना स्वतःही आपल्या नायिकेला एकाच एका उदात्त रंगाने न रंगवता तिला पूर्णतः वास्तव पातळीवर ठेवत एक प्रकारे बंडखोरीच केली. स्कार्लेट ओहारा आपल्या वाटचालीत पारंपारिक सामाजिक संकेत धुडकावून लावत तेव्हाच्या स्त्रीत्वाच्या मर्यादा कसलाही अभिनिवेश न आणता सहजप्रवृत्ती असल्यासारखी ओलांडते आणि त्यामुळेच ती लक्षणीय, अविस्मरणीय होते. समीक्षकांच्या दृष्टीनं 'गॉन विथ द विंड' कादंबरी ही मूलतः माणसाच्या अस्तित्वाच्या झगड्याची धडपड, संघर्ष करण्याची सहजप्रवृत्ती असल्यासारखी ओलांडते; आणि त्यामुळेच ती लक्षणीय,

अविस्मरणीय होते. समीक्षकांच्या दृष्टीनं 'गॉन विथ द विंड' कादंबरी ही मूलतः माणसाच्या अस्तित्वाच्या झगड्याची धडपड, संघर्ष करण्याची सहजप्रवृत्ती अधोरेखित करणारी साहित्यकृती आहे आणि स्कार्लेट नेमकं तेच करते. युद्धाच्या ज्वाळांमुळे अस्तित्वाचेच प्रश्न निर्माण होतात. ते स्कार्लेट त्या त्या वेळी अस्तित्वं टिकवताना सहजप्रवृत्ती जशी प्रेरणा देईल तसे आणि नैतिकतेचा, संकेतांचा बाऊ न करता सोडवते. स्कार्लेट, संकटच उभं रहातं, तेव्हा शत्रूला दयामाया न दाखवता मृत्यूही देते, वेळ येते तेव्हा विधवा स्त्रीशी संबंधित असलेल्या प्रथाही बाजूला सारते आणि निखळ व्यावहारिक कारणांमुळे विवाहबद्धही होते.

स्कार्लेट ओहाराच्या असफल, अपूर्ण अशा प्रेमकहाणीचं एक टोक आहे, ॲश्ले विल्किस आणि दुसरं टोक आहे ऱ्हेट बटलर. काळाच्या दृष्टीनं जवळपास एका दशकातल्या युद्धपूर्व, युद्धकालीन आणि युद्धोत्तर अशा तीन टप्प्यांमधून ही प्रेमकहाणी पुढे सरकते. या काळात या प्रेमकहाणीचे आधीचे स्वास्थ्य, शांतता, समृद्धी, नात्यांची उबदार बंधनं, आरोग्य, हिरवागार कृपाळू निसर्ग, अधिकार, समाजातलं नेमकं स्थान, सुरक्षितता असे संदर्भ एकाएकी कोसळत जातात आणि त्याऐवजी युद्ध, रक्तपात, असुरक्षितता, भूक, अभाव, अविश्वास, संशय, सूडबुद्धी, अराजक, अनारोग्य, निसर्गावरचे अत्याचार असे संदर्भ या प्रेमकहाणीला चिकटत जातात. सतरा वर्षांच्या अल्लड, लाडावलेल्या, स्वतःच्याच प्रतिबिंबावर प्रेम करणाऱ्या स्कार्लेटच्या प्रेमभावनेचा प्रवास एक विवाहित तरुणी, अचानक कर्तेपणा खांद्यावर पडलेली एक विधवा, नंतर पुन्हा दोन विवाह, एक व्यवहारनिष्ठ-धूर्त व्यावसायिक, अशी वळणं घेत घेत होतो. प्रेमभावनेच्या भ्रमापासून प्रेमभावनेतल्या सत्याच्या, शाश्वताच्या साक्षात्कारापर्यंतचा हा प्रवास अनेक छटा, कंगोरे असलेला असा आहे आणि वाचकाला तो अनेक अंगांनी समृद्ध करणाराही आहे.

अशा या कादंबरीचा अनुवाद इतका काळ मराठी वाचकांपासून दूर राहिला होता, तो अनुवादक वर्षा गजेंद्रगडकर आणि 'पद्मगंधा प्रकाशना'चे अरुण जाखडे यांनी योग्य वेळी सादर करून मराठीतल्या महत्त्वाच्या अनुवादांमध्ये मोलाची भर घातलेली आहे. अनुवाद करताना तसंही मूळ साहित्यकृती एका भाषेतून आपल्या भाषेत आणण्यापलीकडेही बऱ्याचदा कसरती कराव्या लागतात. त्यात संपादनाचाही भाग असतो. संस्करणाचाही भाग असतो तसंच बऱ्याचदा संशोधनाचाही भाग असतो. मूळ कथानकाची संस्कृती, भूभाग, काळ अशा बऱ्याच आघाड्यांपासून अगदी माणसांच्या-स्थळांच्या नावांच्या उच्चारांपर्यंत असंख्य संदर्भ असतात आणि ते नेमकेपणानं आणण्यात अनुवादकाचं यश दडलेलं असतं. याशिवाय, मुख्य व्यक्तिरेखांइतक्याच इतरही असंख्य व्यक्तिरेखांची वैशिष्ट्यं-बारकावे टिपावे लागतात. वर्षा गजेंद्रगडकरांनी हा नेमकेपणा सांभाळल्यामुळे 'गॉन विथ द विंड'चा आत्मा परिपूर्णरित्या अनुवादातही उतरतो, तसंच भाषिक डौलामुळेही वाचनाचा असा निखळ आनंदही या अनुवादात गवसतो. मराठीतल्या काही संस्मरणीय अनुवादांमध्ये 'गॉन विथ द विंड'च्या अनुवादाचा समावेशही निश्चितपणे करावा लागेल.

❖❖❖

'गॉन विथ द विंड', मूळ लेखिका - मार्गारेट मिचेल,
अनुवाद - वर्षा गजेंद्रगडकर, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

माधव कर्वे
९, मनमोहन सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२.
मोबा. : ९८६०८७३६६७

देणगीदार – १ जून ते ५ सप्टेंबर २०१०

क्र.	दिनांक	नाव	रक्कम	
१)	११-६-२०१०	दि महाराष्ट्र एक्झिक्युटर्स अँड ट्रस्ट कं. प्रा. लि.	१४००/-	का. र. मित्र व्याख्यानमालेसाठी देणगी
२)	१६-६-२०१०	नंदा पैठणकर	१०,०००/-	जी. ए. कुलकर्णी स्मृतिदिनासाठी देणगी
३)	२३-६-२०१०	डी. ए. काटे	१,५००/-	योगक्षेमार्थ देणगी
५)	१०-७-२०१०	डॉ. कल्याणी नामजोशी	५००/-	योगक्षेमार्थ देणगी
६)	१५-७-२०१०	सुविचार प्रकाशन मंडळ	१,००,०००/-	पुष्पा पुसाळकर स्मृतिदिनासाठी देणगी
७)	३०-७-२०१०	चाणक्य मंडळ परीवार	२७९४/-	ग्रंथालयासाठी देणगी
८)	५-९-२०१०	डॉ. सु. प्र. कुलकर्णी	२५०/-	योगक्षेमार्थ देणगी

❖❖❖

एका ग्रंथाची जन्मकथा

- प्रा. अरुण व्र. मैड

[शीलाहारकालीन भूमिज शैलीतील शिवमंदिरावरील अनेक अभ्यासकांच्या मदतीने संपादित केलेल्या ग्रंथाची ही जन्मकथा अनुकरणीय आहे. म.सा. शाखा, अंबरनाथचा हा उपक्रम. –संपादक]

महराष्ट्र साहित्य परिषदेच्या अंबरनाथ शाखेला आर्थिकदृष्ट्या सक्षम कसे करता येईल असा विचार मनात ठेऊन कार्यकारिणीची बैठक बोलावली. सर्व उपाय निरुपयोगी ठरल्यानंतर माझा ग्रंथ निर्मितीचा प्रस्ताव मंजूर झाला. या काळात कार्यकारिणी फक्त चार सदस्यांची उरली होती; इतर सर्व परदेशात नोकरीनिमित्त गेले होते. त्यामुळे हा निर्णय म्हणजे जवळ जवळ एक खांबी तंबूच होता. २००३ च्या अखेरीस इतिहास संशोधकाशी पत्रव्यवहार सुरू केला प्रत्येकाकडून नकार आला तर काहीजणांनी सावधपणे 'या काळावर माझा अभ्यास नाही असे सुचविले. गुरुवर्य देगलूरकरांशी बोलणे होत नव्हते, पत्र पाठविले त्याला उत्तर नाही कारण ते परदेशात गेले होते. दरम्यान मी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे- कार्यकारिणीवर निवडून आलो व गुरुवर्य देगलूरकर सरांचे अभिनंदनाचे पत्र आले. त्या पत्रातच घरी यायचे निमंत्रणही होते. लगेचच पुण्याला त्यांच्या घरी गेलो. ग्रंथाची सविस्तर चर्चा झाली व दिशा ठरली. 'कला कौस्तुभ शिवमंदिर अंबरनाथ' हा पहिला भाग कोणी लिहावा व लेखक कोण असावेत, हे ठरले.

लोकसत्ताचे प्रशांत मोरे यांनी सविस्तर मोठी बातमी त्याच आठवड्यात तयार केली आणि ती बातमी वाचून डॉ. जामखेडकरांचा दूरध्वनी आला त्यांनी आणखी काही संशोधकांची नावे सुचविली. त्यातून 'मंदिर उभारणारे ठाण्याचे शिलाहार' हा विभाग तयार झाला. ग्रंथाचा आवाका वाढत होता पण हात राखून काम करायचे नव्हते 'सुगंधित ते आदरावे बकुल वा प्राजक्त' या न्यायाने वाचकांना, ग्रंथप्रेमींना आणि विशेषतः ज्या शहरात हे मंदिर अनेक वर्ष उभे आहे त्या अंबरनाथकरांना या मंदिरासंबंधी एक संदर्भमूल्य असलेला ग्रंथ देण्याचा माझा संकल्प होता व त्याच बरोबर या ग्रंथाच्या विक्रीतून मिळणारा पैसा साहित्य परिषदेच्या अंबरनाथ शाखेला मिळावा हा हेतू होता. वरील दोन्हीही हेतू सफल झाले, सुफळ संपूर्ण झाले. वास्तविक हाच ग्रंथ मी माझ्याहाठी केला असता तर मी सुद्धा लक्षाधिश होऊ शकलो असतो. पण मी ज्या अंबरनाथ शाखेचा संस्थापक आहे तिचे पितृत्व- माझ्याकडे असताना मी असा स्वार्थी विचार करणे ही गैर ठरले असते. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमेरिका, ब्रिटन मधून ग्रंथाची प्रसिद्धीपूर्व नोंदणी झाली. लोकांनी निःशंकपणे धनादेश पाठविले. देणगीदारांनी यथाशक्ती मदत केली. 'अंबरनाथ भूषण' दिलीपकुमार वझे यांनी आपल्या मित्रपरिवारासाठी एकरकमी ६१ हजार रुपये देऊन ६१ ग्रंथ खरेदी केले. श्री. सुरेश पानसे व सौ. परिणिता देशपांडे यांचे उत्तम सहकार्य लाभले.

जसजशी नोंदणी होऊ लागली तसतसे- मनावरचे दडपण प्रचंड वाढले. साधारण दोन वर्षांत सर्व लेखकांचे लेख, संदर्भसूची, परिचय- लेखकाचे छायाचित्र इ. सर्व मजकूर जमा झाला. संपादकीय काम सुरू झाले. साधारण ५ वेळा सर्व लेख माझी पत्नी प्रा. सौ. रेखा व मी मिळून वाचले. प्राथमिक स्तरावर शुद्धलेखन तपासले. माझा मुलगा पुष्कर याच्या 'वैखरी ग्राफिक्स' या संस्थेने संपूर्ण ग्रंथाचे टंकलेखन (डी.टी.पी.) करून दिले. महाराष्ट्राचे प्रसिद्ध शुद्धलेखन तज्ज्ञ अरुण फडके व त्यांच्या पत्नी सौ. वृषाली फडके यांनी शुद्धलेखन तपासून मुद्रणप्रत सिद्ध केली. दरम्यान म. टा. व लोकसत्ताचे छायाचित्रकार मनोज मेहता यांनी व त्यांच्या सहाय्यकांनी मिळून सकाळी ७ ते रात्री ७ असे १२ तास खपून संपूर्ण मंदिराचे चित्रीकरण पूर्ण केले. अरुण फडके व मी स्वतः आम्ही सातत्याने दोन महिने (३३० तास) एकत्र बसून मुद्रण प्रत तयार केली. याच दरम्यान चित्रकार विकास फडके यांनी आतील सजावट ग्रंथाचे मुखपृष्ठ इ. गोष्टी पूर्ण केल्या. अनेक मुद्रकांशी सल्लामसलत करून ठाणे शहरातील राजन फडके (नाटककार श्याम फडके यांचे चिरंजीव) यांच्या राजमुद्रा प्रिंटिंग प्रेस मध्ये ग्रंथ छपाईस गेला. ग्रंथ दोन प्रकारे तयार करावा असे ठरले होते. श्रेयस प्रत (मूल्य १२५० रु.) सवलत मूल्य १०००/- रु.

प्रेयस् (जनता प्रत मूल्य ३५० रु.) सवलत मूल्य २५०/- रु. दरम्यान काही तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष होऊन एक मध्यम प्रत काढावी लागली व तिचे मूल्य (६०० रु.) व सवलत मूल्य ५००/- रु. ठेवण्यात आले. अशा प्रकारे पहिली आवृत्ती सर्व मिळून १७०० प्रती छापण्यात आल्या. ग्रंथाचा आकार रुंद आयताकार दैनंदिनी सारखा ८ १/४'' ह १० १/२'' असा ठेवण्यात आला. त्याबरोबरच शिवमंदिराचे ३' ह २'' आकाराचे चार रंगी छायाचित्र श्रेयस (डिलक्स) प्रतीबरोबर भेट देण्यात आले. ५ जून २०१० रोजी अंबरनाथ येथे भव्य प्रकाशन समारंभ झाला. प्रकाशनापूर्वीच श्रेयस प्रतींची नोंदणी ३०० ग्रंथ प्रेमींनी केली होती. प्रकाशनाच्या दिवशी २०० प्रतींची विक्री झाली. सर्व खर्च वजा जाता अंबरनाथ शाखेच्या खात्यात निव्वळ नफा १ लाख ५० हजार शिल्लक राहिला. अद्याप ३ लाख रुपये मूल्य असलेले ग्रंथ शिल्लक आहेत आणि दररोज त्यांची विक्री चालू आहे.

ग्रंथाची मुद्रणप्रत तयार करताना माझे मित्र अरुण फडके यांचे खूप सहाय्य लाभले. अनेक नव्या कल्पना पुढे आल्या. पाश्चात्य ग्रंथ रचनेच्या व्याख्या आम्ही तपासल्या त्यातले जे उत्तम वाटले, ते या ग्रंथात आणले. त्या पैकी (हाफ टायटल) अर्थ शीर्षक, (फ्रॉन्टीस पिस) संपूर्ण ग्रंथाची मध्यवर्ती कल्पना देणारे चित्र, उल्लेख सूची, संदर्भ सूची, रंगीत पृष्ठ (शिल्प) सूची कृष्णधवल छायाचित्र सूची विविध आराखडे, नकाशे मिळून २७२ पृष्ठांचा ऐवज तयार झाला.

भारतात १८६८ मध्ये सर्व्हे ऑफ इंडियाची स्थापना करून अंबरनाथ शिवमंदिराला भेट देणारा लॉर्ड कनिंगहॅम, जे. डब्ल्यू. टेरी (J. W. Terry) जेम्स बर्जेस, पद्मभूषण स्टेला कॅमरिश, इटॅलियन विदुषी डॉ. सिमोना (फेरोरा) चौधरी, तसेच भारतीय अभ्यासक प्रा. आळतेकर, डॉ. भांडारकर, डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. सांखलिया, डॉ. वा. वि. मिराशी यांचीही छायाचित्रे मिळवून ती संबंधित लेखामध्ये अभ्यासकांसाठी उपलब्ध करून दिली आहेत. शिलाहारांच्या कोरीव लेखातून आढळणारी तत्कालीन गावे व ती आजही विद्यमान आहेत, तसेच कोरीव लेखात आहेत पण आज अदृश्य झाली आहेत अशा ग्रामनामांची एक दीर्घ यादी एका लेखात दिली आहे.

स्टेला कॅमरिश यांनी भारतातील परिपूर्ण मंदिरांवर सूत्रधार आढळतो, असे म्हटले आहे. त्याची ओळख म्हणजे 'देवांच्या रांगेत आढळणारा एकमेव पुरुष हा सूत्रधार असतो हीच कल्पना पुढे डॉ. कुमुद कानिटकर यांनी अंबरनाथ मंदिराबद्दल मांडली त्यामुळे 'फ्रॉंटिस पीस' साठी या मंदिरावरील सूत्रधाराचे रंगीत छायाचित्र योजले. सूत्रधाराच्या हातात एक मापदंड आहे. (Measuring rod) त्यावर विशिष्ट खुणा आहेत. त्यामुळे तत्कालीन ११व्या शतकातील भूमिती शास्त्राचे अंदाजही बांधता येतात.

हे मंदिर भारतातले पहिले 'भूमीज शैली मंदिर' आहे. त्यामुळे भूमीज शैली म्हणजे काय ? याचा परिचय करून देणारा डॉ. श्रीकांत घारपुरे यांच्या लेखाचा समावेश केला आहे.

थोडक्यात वाचकांना भरभरून देण्याचा प्रयत्न या ग्रंथात केला आहे. १५० कृष्णधवल छायाचित्रे ४० चाररंगी छायाचित्रे यांनी हा ग्रंथ श्रीमंत झाला आहे. प्रकाशन समारंभात डॉ. गो. बं. देगलूकर म्हणाले, 'एखाद्या मंदिराचा इतका सांगोपांग माहिती देणारा ग्रंथ हा एकमेव असावा, माझ्या पाहण्यात तरी या सारखा अन्य ग्रंथ नाही.' तर डॉ. अरुणचंद्र पाठक म्हणाले, 'शिलाहारांच्या राजवटीवर व अंबरनाथ शिवमंदिरावर हा एक उत्तम संदर्भ ग्रंथ तयार झाला आहे.' ऋषीतुल्य अभ्यासकांच्या या उद्गारातच या ग्रंथाचे यश सामावले आहे असे मला वाटते, हीच माझी कृतार्थता आहे.

❖❖❖

प्रा. अरुण ब. मैड
'गणेश' ४७२, साई-विभाग,
अंबरनाथ, जि. ठाणे-४२१ ५०१
दूरध्वनी : ०२५१/२६०३९१३, भ्रमणध्वनी : ९०२२८५१२१२

कलाकौस्तुभ शिवमंदिर अंबरनाथ, संपादक - प्रा. अरुण ब. मैड
प्रकाशन - महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा अंबरनाथ
श्रेयस प्रत (डिलक्स) - १०००/- रु. मूल्य
मध्यमप्रत - ५००/- रु. मूल्य
प्रेयस प्रत (जनता प्रत) - २५०/- रु. मूल्य.

धनादेश - कला कौस्तुभ शिवमंदिर अंबरनाथ या नावाने काढावा. ग्रंथ स्वखर्चाने पाठवू. स्वतः येणारास मंदिराचे छायाचित्र (३' ह २') भेट मिळेल. (पोस्टाने नाही.)

स्त्रियांची शतपत्रे (इ. स. १८५० ते १९५०) डॉ. स्वाती कर्वे

अनिल बळेल

[सुमारे साठ वर्षांपूर्वीच्या शतकातील स्त्रियांचे मनेगत प्रकट करणारा हा प्रकल्प म्हणजे तत्कालीन स्त्रीच्या मनातील विविध स्पंदनांचा आणि त्याचबरोबर सामाजिक–सांस्कृतिक कालपटाचा 'दस्तऐवज' आहे. – संपादक]

आता २०१० साल चालू आहे. आपण एकविसाव्या शतकाचे पहिले दशकसुद्धा संपवित आलो आहोत. डॉ. स्वाती कर्वे ह्यांनी निवडलेली आणि त्यांवर मार्मिक टिप्पणी केलेली स्त्रियांची ही शतपत्रे इ.स. १८५० ते इ.स. १९५० ह्या कालखंडातील आहेत. म्हणजे डॉ. कर्वे ह्यांनी निवडलेल्या काळखंडाच्याही साठ वर्षे आपण पुढे आलो आहोत. म्हणजेच साठ वर्षांपूर्वीची ही शंभर वर्षे म्हणजे फार काही जुना काळ नव्हे; परंतु स्त्रियांच्या दृष्टीने तो 'काळ'च होता.

आजच्या पुरुषांनाच काय, आजच्या स्त्रियांनाही कल्पनाही येणार नाही की आपली आजी-पणजी-खापरपणजी वगैरे कोणत्या 'काळा'तून गेल्या आहेत आजची स्त्री गगनाला गवसणी घालायला निघाली आहे; पण त्याच स्त्रीला 'त्या'काळी घराबाहेरच काय, माजघराबाहेरही पडायला मज्जाव होता. आजची स्त्री कोणत्या 'ड्रेस'मध्ये दिसेल. काही सांगता येत नाही पण ह्याच स्त्रीला नऊवारीपासून 'गोल' साडीतही यायला घडवावे लागले आहे. आजची स्त्री टिकली तर टिकली लावते; किंवा लावतही नाही. ह्याच स्त्रीच्या कुंकवाची नको तितकी उठाठेव झाली आहे. एवढेच काय, तिच्या दोन वेण्याही वृत्तपत्रांचे दोन दोन 'कॉलम' अडवून गेल्या आहेत. आजची स्त्री हे सारे ओलांडून कितीतरी पुढे गेली आहे. हे होण्यात वृत्तपत्रांचा फार मोठा वाटा आहे. इतर 'माध्यमांचा' तेव्हा प्रश्नच नव्हता. १६० वर्षांपूर्वीचा तो काळ म्हणजे ब्रिटीशांचा, म्हणजे कंपनी सरकारचा, तो काळ होता. त्या राज्यकर्त्यांना वृत्तपत्रे काय चमत्कार घडवू शकतात ह्याची पूर्ण कल्पना होती; म्हणून ती नवलाई इकडे घडणारच नाही, ह्याची ते काळजी घेत होतेच. तरीही ती पावले इकडे उमटलीच. जी उमटण्यात विल्यम बोल्टस्, जेम्स ऑगस्ट हिकी यांनीही पाऊल उचललेले आहेच.

मराठीत १८३२ साली बाळशास्त्री जांभेकर ह्यांच्या 'दर्पण'ने हे पहिले पाऊल टाकलेले आहे. या 'दर्पण' पासूनच वृत्तपत्रातील पत्रांना- अगदी स्त्रीप्रश्नांच्या पत्रांनाही महत्त्व आलेले आहे. स्वतः बाळशास्त्री 'माता' या टोपण नावाने पत्र लिहीत असत. सुरुवातीस इतरही मूळ नावापेक्षा टोपणनाव वापरणेच पसंत करत; पण त्यात 'पुनर्विवाह' सारख्या विषयांवरही मतप्रदर्शन होत असे.

"सोलापूरचे मंडईतील विधवा, सधवा होऊ इच्छिणारी'ने १८५६ मध्येच 'ज्ञानप्रकाश'कारांकडे पत्र पाठविले आहे. पत्रलेखिका पाच वर्षांची असताना ८० वर्षांच्या वृद्धांस केवळ पंधरा रुपयांसाठी तिच्या आईवडिलांनी तिला विकले. लग्न झाल्यानंतर १५ दिवसांतच तो वृद्ध वारला. जीवन काहीच माहीत नसताना हे सारे घडले. तिचे आई-वडील तर 'केशवपन' करायला निघाले होते. (आता हे केशवपन इतिहासजमाच झाले आहे.) तेव्हाच समाजात विधवाविवाहचळवळ सुरू होत होती. तिच्या भावाने आपल्या आई-वडिलांस तो विचार पटवून दिला न् मग खुद्द मुलीनेच 'ज्ञानप्रकाश'कडे पत्र पाठविले. स्वतःबद्दल लिहिताना ती "ऋतु प्राप्त होऊन सुमारे ६ महिने झाले- वय सुमारे १६ वर्षांचे आहे. गोरीगोमटी व अंगाचा बांधा मध्यम आहे. कोकणस्थ ब्राह्मणीन आहे. माझ्या नवऱ्यास माझ्याशिवाय दुसरे कोणी वारस नसल्यामुळे त्याची सुमारे ४-५ हजारांची जिगनी माझ्याकडे आहे. तर माझ्याजोगता वर जिनगी मिळून, त्याची माझी जोडी मिळाल्यास आपले नाव जन्मापर्यंत आठवीन" असे वास्तवही लिहून गेली आहे.

ह्यावेळी स्त्री नुक्तीच कोठे शिकू लागली होती. अगदी मोजता येतील इतक्याच मुली शिकत होत्या. त्यातील एखाद-दुसरीच पत्र पाठविण्याचे धाडस करत होती.

अशीच एखादी 'नासीककरीण' शिक्षणाचे महत्त्व असेही पटवून देत होती, 'नवऱ्यास सुख किंवा दुःख होणे हे स्त्रियांच्या गुणावर आहे. ती सुशिक्षित असली तर घरात नेहमी समाधान व आनंद असतो. परंतु ती अशिक्षित व द्वाड असली तर तीजपासून सर्वांना त्रास होतो.'

'दर्पण' नंतरच्या 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश' इत्यादि साऱ्याच वृत्तपत्रांनी वाचकांना लिहिते केले आहे, आणि त्यात स्त्रियांच्या पत्रांची, स्त्रीसमस्यांची विशेष दखल घेतलेली आहे. 'मनोरंजन'कार का. र. मित्र ह्यांनी स्त्रियांसाठी वेगळेच नियतकालिक चालवण्याचाही प्रयत्न केला होता. त्यांनी विशिष्ट विषय देऊन वाचक-वाचिकांना लिहिण्यास उद्युक्तही केलेले आहे. म्हजे खूप पुढे 'स्त्री'सारख्यांनी 'प्रापंचिक कामाचा मोबदला पत्नीला मिळाला का ?' असा प्रश्न वाचकांपुढे ठेवण्याची ही प्रथा आधीचीच आहे. (त्यावेळी 'स्त्री'च्या प्रश्नावर इंदिराबाई मायदेव ह्यांनी ठणकावले होते, 'कष्टाचे मोल करता येत नाही; म्हणून हा प्रश्नच बाजूला सारणे योग्य नव्हे !')

'आर्यभगिनी', 'गृहिणी रत्नमाला' सारख्या नियतकालिकातून स्त्रीपत्रे येणारच पण समाजकारणापेक्षा राजकारण महत्त्वाचे मानणाऱ्या लो. टिळकांनीही 'केसरी'त वाचकांच्या पत्रांना अव्हेरले नव्हते आणि 'केसरी'तील पहिले पत्र स्त्रीसंबंधी आहे, हे विशेष. मात्र 'केसरी'तील स्त्रीपत्रे व्यक्तिगत जीवनाभोवतीच न घोंगावला त्यावेळच्या राजकीय-सामाजिक जागृतीचे मान ठेवणारीच जास्त आहेत. अगदी लोकमान्यांनी वेळोवेळी केलेल्या आव्हानांचा प्रतिसादही त्यातून व्यक्त होतो. याउलट 'सकाळ'मधील स्त्रपत्रांनी आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या वाचकांसमोर ठेवलेल्या आहेत. 'सकाळ'कारांनी आपल्या रविवारच्या पुरवणीतील एक पानच स्त्रियांसाठी राखून ठेवले होते. त्यात संपादकच काही वेळा 'सुधामावशीची पत्रे' म्हणून स्त्रियांच्या पत्रांना पत्रोत्तरही देत असत. ह्याच 'सुधामावशी' पुढे 'उषावहिनी' म्हणून सल्लाही देऊ लागल्या होत्या, जो अनेकांना उपयुक्तही ठरत होता. 'संदेश'मधील 'वत्सलावहिनींची पत्रे', 'समानस्वास्थ'मधील 'शारदेची पत्रे' ही त्या त्या वेळी वाचणाऱ्यांनी वाचून सोडून न देता ती विचारातही घेतली होती. वाचक आणि माध्यम ह्यांची ही एक वेगळीच गुंफण होती. हे नाते असे जमत गेले की, पुस्तककर्तीचा कालखंड जेथे संपतो त्या १९५० साली जेथे 'लाईट' नव्हते-पाण्याचे नळ नसल्यामुळे कोस-कोस लांब जाऊन स्त्रियांना विहिरीत खोल गेलेले पाणी शेंदून आणावे लागायचे. अशा खानदेशातील 'पाटोळे' ह्या छोट्याश्या गावीही १८६७ साली मुलींना शाळेत प्रवेश देणे सुरू झाले होते. त्याबद्दल 'स्त्रीशिक्षण सुरू झाल्याचे पाहून आनंद पावलेल्या'ने 'इंदुप्रकाश'ला पत्रही पाठविले होते. त्याच सुमारास भंडारा येथेही तहसिलदारांनी मुलींची शाळा सुरू केली होती; पण शाळेत मुलींची संख्या कमी परंतु शाळेत जाणाऱ्या मुलींना बघणाऱ्यांचीच संख्या जास्त; अशी स्थिती 'ज्ञानप्रकाश'कारांनी लक्षात आणून दिली होती. तरीही मुलींना शिकवणाऱ्यांनी आणि मुलींनीही जिद्द सोडली नाही; म्हणून तर देश जसा स्वातंत्र्याकडे पावले टाकत होता, तशाच मुली आणि पर्यायाने समाजही प्रगतीकडे निघाला होता.

हे सारे 'पत्रां'तील घडविले असे नाही पण पत्रांनी विचारांना चालना तर दिली म्हणून तर लोकहितवादींनी वृत्तपत्रसृष्टींच्या प्रारंभीच्या पर्वातच आपले विचार समाजासमोर मांडण्यासाठी 'पत्रां'चाच आधार घेतला होता. त्यातूनच त्यांची 'शतपत्रे' निर्माण झाली होती. लोकहितवादींनी वृत्तपत्रांचे वर्णन 'बृहत्तर जिव्हा' असे केलेले आहे. वृत्तपत्रातील 'बृहत्तर जिव्हा' म्हणजे वाचकांची पत्रेच, ह्याच जिव्हा समाज घडविण्यास 'बोलक्या' होत असतात, अशा विचारानेच प्रेरित होऊन डॉ. स्वाती कर्वे ह्यांनी हा प्रकल्प हाती घेतला.

अजूनही स्त्रियांचे सारेच्या सारे प्रश्न सुटलेले आहेत असे नाही. तसे ते पुरुषांचेही सुटलेले नाहीत. परंतु केवळ आपल्या प्रश्नांत गुंतून न पडता पुरुषांनीच स्त्रीप्रश्नांत अधिक लक्ष घातलेले आहे. ह्याच्याच जाणिवेने डॉ. कर्वे ह्यांनी आपले मनोगत प्रगट करताना म्हटले आहे, '१९व्या शतकात सुधारकांच्या प्रयत्नांतून स्त्रियांना शिक्षणाची संधी मिळाली आणि त्या योगे स्त्रियांच्या स्थितीशीलतेला जाग येऊन स्त्रियांच्या मनोरचनेत बदल होण्यास सुरुवात झाली. शिक्षणाने येणारी प्रगल्भता, उघडणारी सार्वजनिक जीवनाची दारे, समाजात सुरू झालेला वावर, व्यक्त होणारे विचार, वृत्तपत्रांतून होणारी चर्चा, या सर्वांच्या मेळातून स्त्रियांची संवेदनशीलता परिस्थितीनुरूप नवीन आकार घेत होती आणि या

संवेदनशीलता उद्गार स्त्रियांच्या पत्रांतून होत होता. स्त्रियांच्या लेखांप्रमाणे ही पत्रेही स्त्रियांच्या विकासाच्या पाऊलखुणाच होत्या. सामाजिक, सांस्कृतिकदृष्टीने ही पत्रे महत्त्वाची आहेत. सामाजिक 'दस्तऐवज' आहे.'

डॉ. कर्वे केवळ एवढे 'मनोगत' व्यक्त करून थांबलेल्या नाहीत तर त्यांनी 'शतपत्रांमागील कालपट' अशी तब्बल शंभर पानी प्रस्तावनाही लिहिलेली आहे. ही 'शतपत्रे' जितकी वाचनीय आहेत तितकीच हा कालपट उलगडविणारी ही प्रस्तावनाही वाचनीय आहे. ज्यांना हे काहीच माहिती नाही त्यांच्या दृष्टीने तर ती खूपच खूप महत्त्वपूर्ण आहे.

शंभर वर्षांच्या कालखंडाची १९५०-८०, १९८०-१९००, १९००-२०, १९२०-५० अशी जशी येथे विभागणी करण्यात आली आहे; तसेच व्यक्तिगत, सामाजिक, राजकीय, सार्वजनिक कार्याशी संबंधित पत्रे अशी पोट विभागणी करून बाईंनी 'स्त्रियांच्या पत्रव्यवहाराचे सामाजिक मूल्यमापन' देखील केले आहे. 'टोपणनावाची' 'विविध ग्रंथातील' 'निवडक इंग्रजी' अशी पत्रांची परिशिष्टेही आहेत. आवश्यक तेथे बाईंनी आवश्यक टिप्पणीसुद्धा केलेली आहे.

शालिनी पाणंदीकर ह्यांनी १९२७ साली गुलाबखान बशिरुद्दीनखान ह्यांच्याशी विवाह केला, १९४२ साली प्रसिद्ध कादंबरीकार ना. सी. फडके आपली पत्नी व मुलेही असताना आपल्यापेक्षा वयाचे खूपच लहान असलेल्या आपल्या विद्यार्थिनीशीच पुन्हा विवाह केला त्या त्यावेळी जे 'पत्रवादळ' उठले, तेही ह्या ग्रंथात आले आहे. सुप्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर व त्यांच्या पत्नी यशोदाबाई, कवी अनिल आणि त्यांच्या पत्नी कुसुमावती ह्यांच्यातीलही काही पत्रव्यवहार येथे देण्यात आला आहे. रमाबाई, ताराबाई मोडक, अशा काही महत्त्वाच्या व्यक्ती पत्ररुपात येथे भेटतातच.

'टाळी द्या'ला पल्लवी जोशीने हल्ली एक वेगळेच परिमाण प्राप्त करून दिले आहे. तोच सूर पकडून डॉ. स्वाती कर्वे ह्यांच्या ह्या पुस्तकाला 'टाळी द्याच' म्हणाले असेच त्यांचे हे 'संग्रहणीय' काम आहे.

हे वेगळेपण आणि त्याचे महत्त्व लक्षात येऊन 'प्रतिमा' प्रकाशनाने हे पुस्तक तितक्याच नजाकतीने प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांनाही टाळी द्यायलाच हवी.

हेमंत सरदेसाई ह्यांची मुखपृष्ठकामगिरीही अशीच लक्षणीय आहे.

पुस्तकाची एकूण पृष्ठसंख्या पाचशे पानांच्यावर आहे आणि पुस्तक किंमत रु. ५००/- च आहे.

❖❖❖

अनिल बळेल
प्रियदर्शनी, गणेशमळा, पुणे ४११ ०३०.फोन : २४३३००५३


नवे आजीव सभासद

१२०) डोंगरे प्रविण माधवराव, पाचोरा
१२१) कुमावत ज्ञानेश्वर धोंडीराम, पाचोरा
१२२) साळुंखे विश्वासराव साहेबराव, पाचोरा
१२३) तांबोळी अनघा, बंगलोर
१२४) बोंद्रे शोभा विजय, पुणे
१२५) घाटे अपर्णा अतुल, पुणे
१२६) काळे अभिजित चांगदेव, ठाणे
१२७) मगाई सतीश रेणवसिद्ध, सोलापूर
१२८) जोशी अभिजित शेणी, सोलापूर
१२९) यजुर्वेद व्यंकटेश श्रीनिवास, सोलापूर
१३०) लावणीस शशिकांत रामचंद्र, सोलापूर
१३१) पालकर दीपलक्ष्मी शिवराम, पुणे
१३२) घोडके जालिंदर रामचंद्र, सोलापूर
१३३) पाटील नागनाथ सिद्रामप्पा, सोलापूर
१३४) हिंगोणकर संजय बाबूराव, जळगाव
१३५) लमाणे चंद्रमणी पी., जळगाव
१३६) गोखले चारुदत्त श्रीधर, जळगाव
१३७) पाटील विद्या रत्नाकर, जळगाव
१३८) इंगळे देवेंद्र समाधान, जळगाव
१३९) महाजन जयश्री, जळगाव
१४०) भलवतकर भाग्यश्री श्रीधर, जळगाव
१४१) कोठारी प्रकाश मांगीलाल, जळगाव
१४२) सैदाणे यशवंत अमृतराव, जळगाव
१४३) नवलगुंदकर दत्तात्रय शंकर, पुणे
१४४) जाधव समीर दत्तात्रय, पुणे
१४५) कुलकर्णी ज्ञानेश्वर महादेव, कोल्हापूर
१४६) कुलकर्णी एस. एस. दिल्ली
१४७) आननामे गणेश अशोक, डोंबिवली
१४८) बोरुडे संजय, अहमदनगर
१४९) गायकवाड प्रतिक्षा सतीश, अहमदनगर
१५०) शेळके संगीता काकासाहेब, अहमदनगर
१५१) हातावळे उज्ज्वला अनिल, पुणे
१५२) कांबळे भालचंद्र ओणामा, कालकुंद्री
१५३) गुजराथी उन्मेष प्रभाकर, कर्जत
१५४) गुजराथी सृष्टी उन्मेष, कर्जत
१५५) मोरे मृणाल मुरलीधर, देहुगाव
१५६) भेलकर रत्नाकर देवरावजी, नागपूर
१५७) कुलकर्णी प्रांजली दत्तात्रय, पुणे
१५८) पटवर्धन अजित भास्कर, मिरज
१५९) नांदेडकर प्रदीप माणिकराव, पुणे
१६०) वाकचौरे लता कारभारी, पुणे
१६१) राजापुरे विजय कृष्ण, इचलकरंजी
१६२) तेलसिंग पद्माकर शंकर, इचलकरंजी
१६३) कुलकर्णी स्वानंद मुकुंद, इचलकरंजी
१६४) बावणे रुक्मगंद राजाराम, इचलकरंजी
१६५) शाळगावकर जयप्रकाश नारायण, इचलकरंजी
१६६) केसरकर अशोक महादेव, इचलकरंजी
१६७) कुलकर्णी प्रशांत सुभाष, अंबरनाथ
१६८) जुवेकर अनुराधा घनःश्याम, अंबरनाथ
१६९) केळूसकर गणेश कृष्णाजी, अंबरनाथ
१७०) पेंढारकर श्रीराम नारायण, अंबरनाथ
१७१) पेंढारकर सुप्रिया श्रीराम, अंबरनाथ
१७२) नवगिरे संदीपान श्रीमंत, अंबरनाथ
१७३) निचिते संजय तुकाराम, अंबरनाथ

अनुक्रमणिका

निवडक नवे...


परिषदेकडे आलेल्या ग्रंथांपैकी
विशेष उल्लेखनीय ग्रंथांचा
परिचय करून देणारे सदर



'गुनि-गुरू' :

अष्टपैली गायक पंडित जगन्नाथबुवा पुरोहित आणि त्यांचे शिष्य पंडित द. वि. काणेबुवा या प्रतिभासंपन्न गुरूशिष्यांचे डॉ. सौ. मंगला आपटे यांनी लिहिलेले हे संयुक्त चरित्र आहे. लेखिका स्वतः काणेबुवांच्या शिष्या. त्यामुळे त्यांच्याकडे गायन शिकता शिकता जाणवलेले बुवांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यांनी या पुस्तकातून मांडले आहेत. पंडित जगन्नाथबुवा पुरोहित उर्फ 'गुनिदास' यांची विद्वत्ता, संभाषणचातुर्य, बहुश्रुतता या स्वभाववैशिष्ट्यांबरोबरच त्यांचे स्वनिर्मित राग, जुन्या रागांमध्ये त्यांनी बांधलेल्या नव्या बंदिशी अशा त्यांच्या अजोड सांगीतिक कामगिरीवरही प्रकाशझोत टाकला आहे. त्यांनी जपलेले राग संगीताचे सनातनत्व, सौंदर्यतत्त्व, स्वराकारात लपलेले भावतत्त्व, शिष्यांच्या प्रतिभेला त्यांनी दिलेले स्वातंत्र्य आणि वळण हे बुवांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण अत्यंत प्रासादिक शैलीत लेखिकेने टिपले आहे. त्याचप्रमाणे ग्वाल्हेर, आग्रा आणि गंधर्व गायकीचा काणेबुवांनी केलेला सखोल अभ्यास, त्यांचा विनय याविषयी लिहितानाच या गुरू-शिष्य जोडीचा गुरू, शिष्य, कलाकार आणि व्यक्ती अशा विविध रूपातून फुललेला परिचय नवीन पिढीला करून देण्याचा लेखिकेचा प्रयत्न म्हणूनच स्तुत्य, वाचनीय आहे. (गुनि-गुरू : डॉ. मंगला आपटे : अनुबंध प्रकाशन, पृष्ठे : १००, मूल्य : १५० रु.)


'भटकंती' :



ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्र. ल. गावडे यांची आवड, व्यासंग आणि ज्ञान या साऱ्यामधून शब्दबद्ध झालेली ही भटकंती आहे. या भटकंतीमध्ये त्यांनी पाहिलेल्या, मनाला भावलेल्या रमणीय निसर्गस्थळांचे दर्शन आहे. तसेच भेटलेल्या महान व्यक्तिमत्त्वांचे स्मरणही आहे. पण याखेरीज ती विविध ज्ञानप्रदेशांमधून केलेली भटकंती आहे. त्यात आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रांबरोबरच कलेच्या, पत्रकारितेच्या, उद्योजकतेच्या क्षेत्रात जे जे वेगळेपणाने जाणवले, टिपले ते सर्व मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्रीलंका, अमेरिकेतील निसर्ग, डिस्नेलँडचा भूलभुलैय्या त्याचबरोबर अंदमानचा हिरवाकंच निसर्ग न्याहाळताना अपरिहार्यपणे येणारी स्वातंत्र्यवीर सावरकरांची आठवण, बाबा आमटेंची भेट घेताना मनात दाटून आलेला आदरयुक्त प्रेमभाव याचा अत्यंत भावपूर्ण आलेख यामध्ये आहे. आळंदी, देहू, नेवासे, पंढरपूर अशा महत्त्वाच्या तीर्थक्षेत्री फिरताना अनुभवलेले आध्यात्मिक आनंदाचे क्षण आणि त्याचबरोबर सगरोळी, हराळी, वडगाव-फत्तेपूर, चंदगड, ढोलगरवाडी अशा मागासलेल्या भागातले शिक्षणयोग्यांचे योगदान पाहताना अनुभवलेले समाधानाचे क्षण या साऱ्याचे वेधक प्रतिबिंब यामध्ये आहे. त्यामुळेच ही 'भटकंती' वाचकालाही ज्ञान आणि अनुभवसंपन्न करणारी आहे. (भटकंती : डॉ. प्र. ल. गावडे : उत्कर्ष प्रकाशन, पृष्ठे १३८, मूल्य : १५० रु.)


'वाहत्या जखमांचा प्रदेश' :

साठोत्तरी कालखंडाच्या आद्यपर्वातील विद्रोही जाणिवांचा आपल्या साहित्यातून प्रभावीपणे वेध घेणाऱ्या कवी प्रा. वामन निंबाळकर यांचा 'गावकुसाबाहेरील कविता' आणि 'महायुद्ध' या दोन कवितासंग्रहांनंतरचा हा तिसरा संग्रह.




आजुबाजूला दिसणारी, हजारो वर्षांपूर्वीपासून चालत आलेली सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि सर्वच स्तरातील विषमता, त्यातून होणारे शोषण, नागरी समस्या आणि त्यातून वाट्याला येणारे दारिद्र्यापासूनचे असंख्य प्रश्न आणि वास्तव वदलणे शक्य नसल्याने येणारी हतवलता या साऱ्याचे विदारक चित्रण त्यांच्या कवितांमध्ये आहे. किंवहुना आजच्या समाजाचा तो एक ठसठशीत हुंकार आहे. 'मनात असावा करुणेचा झरा, तोच कवी कवितेसाठी खरा', ही कवीने कवी, कविता यासंबंधी व्यक्त केलेली भूमिका आहे. ती निश्चितच परिवर्तनवादी, मानवतावादी आणि सर्जनशील भूमिकेची ग्वाही देणारी आहे. या संग्रहातील सर्वच कविता या भूमिकेची विविध रूपे उत्कटपणे व्यक्त करणाऱ्या आहेत. आणि तितक्याच सूचक आहेत. कवितांसोवत रेखाटलेली रेखाचित्रांमुळे कवितेचा आशय अधिक प्रगल्भतेने मनाला भिडतो. (वाहत्या जखमांचा प्रदेश : प्रा. वामन निंबाळकर : प्रबोधन प्रकाशन, नागपूर, पृष्ठे ९०, मूल्य - १५० रु.)

'शांतांजली' :




जुन्नर-ओतूर परिसरात वास्तव्य केलेल्या, सामान्यत्वातून स्वतःचे असामान्यत्व सिद्ध केलेल्या शांताबाई मोडक यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या सुहृदांनी लेख आणि पत्रांच्या माध्यमातून वाहिलेली आदरांजली म्हणजे हे छोटेखानी पुस्तक आहे. शांताबाई मोडक उर्फ माई यांचे प्रेमळ, लोभस व्यक्तिमत्त्व, वाचनाचे वेड, वेधक कथनशैली, पत्ते-बुद्धिबळ खेळण्यातील प्राविण्य, भरतकाम, विणकाम, रांगोळ्या काढण्यातील कौशल्य अशा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचे दर्शन या पुस्तकामधून घडते. (शांतांजली : संपादक : सदा डुंबरे, स्नेहवर्धक प्रकाशन, पृष्ठे १२४, मूल्य : ८० रु.)



'भलरी' आणि 'आतमधे कीर्तन' :

लोकसाहित्याच्या ठेव्याचे संकलन करताना त्यातून निर्माण झालेले हे अभ्यासपूर्ण लेखन आहे. पाथर्डी तालुक्याचा क्षेत्रिय अभ्यास करीत असताना लेखक डॉ. सुभाष शेकडे यांनी लोकगीतांचेही मोठ्या प्रमाणात संकलन केले. त्यामधील भलरी गीतांचे संकलन आणि त्याविषयीचे अभ्यासक दृष्टीने केलेले लेखन यांचा 'भलरी' या पुस्तकात समावेश आहे. 'भलरी' या शब्दाच्या उत्पत्तीपासून त्याचे स्वरूप, संकल्पना, लोकविद्या, लोकगीते, त्यांचे स्वरूप, वैशिष्ट्ये, लोकगीतांचे वर्गीकरण अशा अनेक गोष्टींचा सविस्तर उहापोह त्यांनी या पुस्तकाद्वारे केला आहे. त्याचप्रमाणे लोकसाहित्यातील कूटप्रश्न, उखाणे, बोहाणे, म्हणी, वाक्प्रचार, प्रहेलिका अर्थात् कोडी यांच्याविषयीचा अभ्यास 'आतमध्ये कीर्तन' या पुस्तकाद्वारे मांडला आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासक्षेत्रामध्ये मौखिक परंपरेच्या संदर्भातला हा ग्रंथ म्हणजे एक महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल. लोककला, लोककथा, लोकनृत्य, लोकनाट्य यांचा प्रवाह आणि आजच्या वैज्ञानिक प्रगतीच्या काळात या लोकाविष्कारांचे स्थान, कोड्यांची परंपरा, कोडे ही संकल्पना, स्वरूप, प्रकार आणि लोकजीवनाशी असलेला त्यांचा अनुबंध; या साऱ्याचा समग्र विचार या पुस्तकामध्ये केलेला आहे. सोबत दिलेल्या कोड्यांच्या खजिन्यामुळे पुस्तक अधिक रंजक बनले आहे. (भलरी : डॉ. सुभाष शेकडे, प्रकाशक : दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पृष्ठे ८२, मूल्य १०० रु, आतमध्ये कीर्तन, पृष्ठे १२२, मूल्य : १०० रु.)





'कैलास-मानस' :

कैलास-मानस सरोवराची यात्रा करणे हे बहुतेक भारतीयांच्या मनातले अनेक वर्षे जपलेले स्वप्न असते. पण हा खडतर प्रवास करणे प्रत्येकालाच शक्य होते असे नाही. जळगावच्या डॉ. भागवत ल. महाजन यांनी लहानपणापासून मनाला असलेला ध्यास, या यात्रेद्वारे यशस्वीरित्या पूर्ण केला; आणि त्याचे इत्यंभूत वर्णन बारकाव्यांनिशी या पुस्तकाद्वारे रेखाटले आहे. या यात्रेसाठी करावी लागणारी शारीरिक-मानसिक तयारी, प्रवासाच्या दृष्टीने गरजेची तांत्रिक तयारी, प्रादेशिक भिन्नता, विलोभनीय निसर्ग, भेटलेली माणसं, घेतलेले अनुभव, खडतर यात्रा करतानाच अनुभवाला येणारे विलक्षण आत्मिक समाधान या साऱ्याचे अत्यंत रंजक आणि यथार्थ वर्णन यामध्ये आढळते. अत्यंत साधी, सोपी, ओघवती आणि रसाळ शैली आणि त्याला मिळालेल्या सकारात्मक दृष्टीची जोड यामुळे हे पुस्तक वाचकाला प्रत्यक्ष प्रवासाची अनुभूती दिल्याशिवाय राहात नाही. (कैलास-मानस : डॉ. भागवत ल. महाजन, पृष्ठे : ९३, मूल्य : १२० रु.)

'मुलांसाठी शेक्सपिअर' :

जागतिक साहित्य-नाट्यक्षेत्राचा अनभिषिक्त सम्राट असलेल्या विल्यम शेक्सपिअरची नाटके वाचणे हा आत्यंतिक आनंदाचा ठेवा अनेकांना वाटत आला आहे. लोकांचे मनोरंजन करतानाच नीतिमत्तेची शिकवण देणारी शेक्सपिअरची नाटके वर्षानुवर्ष रसिकांना सन्मार्गाची वाट दाखवित आली आहेत. अशा नाटकांची ओळख विद्यार्थीदशेपासून, बालवयापासून मुलांना व्हावी, यासाठी स्नेहल प्रकाशनाने ती 'मुलांसाठी शेक्सपिअर' या मालिकेद्वारे बाजारात आणली आहेत. शेक्सपिअरच्या ३७ पैकी सात नाटकांचे रूपांतर डॉ. हेमंत जुन्नरकर यांनी अत्यंत सोप्या भाषेत गोष्टीरूपाने केले आहे. मॅक्‌बेथ, ज्युलिअस सीझर, हॅम्लेट, दि कॉमेडी ऑफ एरर्स, टेमिंग ऑफ श्रू, दि मर्चंट ऑफ व्हेनिस, दि टेंपेस्ट या नाटकांवर आधारित कथांची पुस्तके या मालिकेमध्ये आहेत. याखेरीज शेक्सपिअरची जीवनकथा सांगणारे 'रंगभूमीचा जादूगार' हे आठवे पुस्तकही त्यामध्ये आहे. याशिवाय या नाटकातील घटना ज्या ज्या भूप्रदेशात घडल्या, त्याची नेमकी माहिती आणि ओळख करून देणारा नकाशाही यामध्ये वापरण्यात आला आहे. अनिल उपळेकर यांच्या वेधक रेखाचित्रांनी पुस्तकांचे देखणेपण वाढवले आहे. अत्यंत लहान वयात शेक्सपिअरच्या नाटकांचा मुलांना परिचय करून देण्याचा हा प्रयत्न; त्याच मुलांना मोठेपणी ही नाटके मुळातून वाचून काढण्याची प्रेरणा देईल, याची खात्री वाटते. (मुलांसाठी शेक्सपिअर : स्नेहल प्रकाशन, डॉ. हेमंत जुन्नरकर, मूल्य आठ पुस्तकांचा संच : ३४० रु.)




पुण्याचे शिल्पकार :

पुणे शहराचा चालता बोलता इतिहास म्हणू ज्यांचा उल्लेख केला जातो अशा म. श्री. दीक्षितांचे 'पुण्याचे शिल्पकार' हे पुस्तक स्नेहवर्धन प्रकाशनाने प्रकाशित केलेले आहे. ज्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या माध्यमातून पुणे शहराचा नावलौकिक वाढवला अशा १०८ स्त्री पुरुषांचा परिचय 'म. श्रीं.'नी या पुस्तकात करून दिला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, प्रतापी बाजीराव पेशवे यांच्यापासून ते जयंत नारळीकरांपर्यंत विविध क्षेत्रातील व्यक्तींचे परिचय या ग्रंथात आहेत. राजकारण, समाजकारण, साहित्य, कला, क्रीडा, उद्योग, संशोधन, शिक्षण, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रातील व्यक्तींचा यात समावेश आहे. मर्यादित शब्दसंख्येत या व्यक्तिमत्त्वांविषयी 'म. श्रीं.'नी लिहिले असले; तरी त्यामुळे या ग्रंथाचे महत्त्व कमी होत नाही. अभ्यासकांना उपयुक्त पडेल असे हे पुस्तक आहे. (पुण्याचे शिल्पकार, लेखक म. श्री. दीक्षित, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृष्ठे ११६, किंमत १०० रु.)

नातूंचा वाडा :

नातूंचा वाडा (माहेरच्या आठवणी) हे सौ. सुषमा गरूड यांचे पुस्तक माहेरच्या आठवणी सांगणारे आहे. या




आठवणीतून कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावहारिक परिस्थितीचे चित्रण झालेले आहे. नातू वाडा म्हणजे नाना फडणवीसांचे 'विलास गृह' होते. ते लेखिकेच्या पूर्वजांनी विकत घेतले. त्यामुळे या वाड्यात वास्तव्याला असताना त्यांच्या मनात एक वेगळीच भावना होती. नातेवाईकांचा गोतावळा, अग्निपरीक्षा द्यायची या वाड्याच्या वास्तूवर आलेली वेळ, उसवत गेलेली नात्यांची वीण या साऱ्याचे प्रत्यकारी दर्शन या लेखनात आहे. नातू वाड्याविषयी सर्व काही जाणून घेण्यासाठी आणि लेखिकेच्या माहेरच्या आठवणींचे अनेक पदर जाणून घेण्यासाठी हे पुस्तक वाचायला हवे (नातूंचा वाडा (माहेरच्या आठवणी) लेखिका सौ. सुषमा गरूड, प्रकाशक - रावसाहेब गरूड, पृष्ठे ७३, किंमत ८० रु.)

धागा :



ज्येष्ठ कवयित्री आणि लेखिका सिसिलिया कार्व्हालो यांचा ''धागा'' हा लेखसंग्रह हर्ष प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. 'मुंबई सकाळ' या वृत्तपत्रातील 'ठाणे टुडे' या पुरवणीत त्यांनी लिहिलेल्या लेखांचे हे संकलन आहे. तसेच दै. सकाळच्या 'सप्तरंग' पुरवणीत 'क्षितिज' या सदरात त्यांनी जे केले त्याचे लेखही या पुस्तकात समाविष्ट केलेले आहेत. वास्तवातील घडामोडी, पाहिलेल्या व अनुभवलेल्या प्रसंगांच्या आधारे लिहिलेले हे लेख आहेत. भाषेपासून माणसांपर्यंत, स्वरयोगापासून हृदयसंवादापर्यंत, रकितल्या चेहऱ्यापासून आरोग्यमातेच्या मंदिरापर्यंत अनेक विषय लेखिकेने हाताळले आहेत. सूक्ष्म निरीक्षणे आणि लेखिकेची विचारशक्ती त्यामुळे या लेखांना वेगळी उंची लाभली आहे. सभोवतीचे जगणे या लेखात आल्यामुळे हे लेख भावतात. (धागा, लेखिका सिसिलिया कार्व्हालो, हर्ष प्रकाशन, पृष्ठे ९१, किंमत ७५/-)



चंदेरी दुनियेतील आत्मचरित्रे :

चंदेरी दुनियेतील आत्मचरित्रे हे डॉ. रवींद्र कडू यांचे पुस्तक सुविद्या प्रकाशनाने प्रकाशित केलेले आहे. मराठी साहित्यातील आत्मचरित्राला शतकाची परंपरा आहे. दुसऱ्यांच्या जगण्याविषयी असलेले औत्सुक्य आणि आत्मचरित्रे वाचत असताना स्वतःचे आयुष्य तपासून घेणे यामुळे या आत्मचरित्र प्रकाराला वाचकांची चांगली पसंती लाभते. डॉ. रवींद्र कडू यांनी चंदेरी दुनियेतील आत्मचरित्रे या पुस्तकात मराठी नाट्य सिने कलावंतांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचा वाङ्मयीन दृष्टीने परामर्श घेतला आहे. हा एक वेगळा प्रयत्न आहे. या आत्मचरित्रांची स्वरूप वैशिष्ट्ये या संदर्भात डॉ. कडूंनी मार्मिक भाष्य केले आहे. वाचकांना आवडेल असाच हा विषय आहे. (चंदेरी दुनियेतील आत्मचरित्रे, लेखक डॉ. रवींद्र कडू. सुविदाया प्रकाशन, पृष्ठे २४०, किंमत २४०)



महाराष्ट्रातील चर्मकार समाजाचे राजकारण :

डॉ. कैलास सोनवणे यांनी 'महाराष्ट्रातील चर्मकार समाजाचे राजकारण' या महत्त्वपूर्ण पुस्तकात चर्मकार समाजाचे अर्थकारण, विसाव्या शतकात या समाजाच्या जोपासल्या गेलेल्या महत्त्वाकांक्षा, त्यांचे नेतृत्व यांचा चिकित्सक वेध घेतला आहे. चर्मकार जातीची उत्पत्ती आणि स्वरूप, चर्मकार समाजाची सामाजिक व आर्थिक स्थिती, भारतातील दलित चळवळ व चर्मकार समाज, चर्मकार समाजाच्या संघटना व नेतृत्व, महाराष्ट्रातील राजकारण


व चर्मकार समाज अशा महत्त्वपूर्ण पाच प्रकरणातून लेखकाने या विषयाची अभ्यासपूर्ण आणि संशोधनावर आधारित मांडणी केली आहे. डॉ. नरेंद्र जाधव यांची विवेचक प्रस्तावना या पुस्तकाला लाभली आहे. अभ्यासकांसाठी हा उपयुक्त ग्रंथ आहे. (महाराष्ट्रातील चर्मकार समाजाचे राजकारण, लेखक डॉ. कैलास सोनवणे, नवीन उद्योग प्रकाशन, पुणे, पृष्ठे १५७, किंमत १२५ रु.)




महाप्रभू :

'महाप्रभू' हे डॉ. प्र. न. जोशी यांनी लिहिलेले चरित्र पुण्याच्या स्नेहवर्धन प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. श्रीगौरांग महाप्रभू श्री चैतन्य महाप्रभू या नावाने प्रसिद्ध होते. सोळाव्या शतकातले त्यांचे कार्य सर्वांना उजळून टाकणारे आहे. बंगालमधील वैष्णवपंथाचे व नामसंकीर्तनाचे एक थोर संस्थापक म्हणून श्री चैतन्य महाप्रभू सर्वांना परिचित आहेत. ते नंतर वैष्णव पंथाचे प्रमुख झाले. संन्यास घेतल्यानंतर त्यांनी तीर्थयात्रा केल्या. स्वतःस राधा समजून ते उपासना करीत. ते मधुराभक्तीचे मूर्तिमंत अवतार होते. त्यांच्या कार्याचा रसाळ आणि मनोवेधक शैलीत लेखकाने या पुस्तकात परिचय करून दिला आहे. (महाप्रभू, लेखक डॉ. प्र. न. जोशी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, पृष्ठे १४१, किंमत १४० रु.)

अस्तित्वाच्या पाऊलखुणा :



अस्तित्वाच्या पाऊलखुणा हा. रा. मु. पगार यांचा कवितासंग्रह खूप वेगळा आहे. आपल्या सशक्त कवितेतून लेखकाने अस्तित्वाची शोधयात्रा या कवितासंग्रहातून मांडली आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात ग्राहक आणि विक्रेता एवढेच नाते मानणाऱ्या मतलबी जगाची ओळख कवीने प्रभावीपणे करून दिली आहे. गाव, कविता-भविष्य आणि भूतकाल, आता विषयच उरले नाहीत. लिहिण्यासाठी, अभंगाचा भंग, ब्रॅण्डेड कवी, आई मुलामधील चार शब्द, युनीट टेस्ट, मुळांचा शोध घेताना, शाश्वताची पायरी आणि अस्तित्वाच्या पाऊलखुणा या कविता विशेष लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. नेमकी अभिव्यक्ती, विषयांचा तळ गाठणारा आशय यामुळे या कविता मनाला भिडतात. जागतिकीकरणानंतर बेभान होऊन पळत सुटलेल्या जगाचा चेहरा या कवितेने नेमकेपणाने पकडला आहे. वाशिमच्या कवीचीही कविता पुण्यामुंबईतल्या कवींना अंतर्मुख करणारी आहे. (अस्तित्वाच्या पाऊलखुणा, कवी रा. मु. पगार, काव्याग्रह प्रकाशन, पृष्ठे ७२, किंमत १०० रु.)



औषधांविषयी बोलू काही :

विविध विषयांची माहिती देणाऱ्या पुस्तकांची सध्या मागणी वाढते आहे. जिज्ञासेपोटी अनेक विषयांची माहिती करून घ्यावी अशीच वाचकांची भूमिका असते. औषधे हा तर लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय. सामान्य वाचकांला औषधांविषयी सर्व प्रकारची उपयुक्त माहिती देणारे पुस्तक म्हणून डॉ. के. आर. महाडीक यांच्या ''औषधांविषयी बोलू काही'' या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल. औषधांच्या निर्मितीपासून, औषधांची मात्रा, औषधांचे प्रकार, घेण्याच्या पद्धती, दुष्परिणाम, या विषयाशी निगडीत कायदे यांची सविस्तर माहिती या पुस्तकात आहे. रूक्ष परिभाषा न वापरता सामान्य लोकांना समजेल अशा भाषेत हा महत्त्वाचा विषय डॉ. महाडिकांनी मांडला आहे. (औषधांविषयी बोलू काही, ले. डॉ. के. आर. महाडिक, संस्कृती प्रकाशन.)

❖❖❖

स्वाती महाळंक, प्रा. मिलिंद जोशी. पुणे

म. सा. परिषद
परीक्षा विभागाचा मार्गदर्शन मेळावा
(कार्यवृत्त)

- डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी
कार्यवाह, परीक्षा विभाग
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ३०

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मराठीच्या परीक्षा हा एक जिव्हाळ्याचा विषय आहे, पन्नास वर्षांहून अधिक काळ मराठीच्या परीक्षा दरवर्षी परिषदेमार्फत घेण्यात येतात. साधारणतः जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात शनिवार-रविवारला जोडून या परीक्षा पुण्याखेरीज पंधरा ते वीस परीक्षा केंद्रामध्ये एकाच वेळी घेण्याची सोय केलेली असते, आणि मराठी भाषक मराठी प्रेमी आणि मराठीमध्ये लेखक-कवी होऊन नाव कमावण्याची इच्छा बाळगणारे रसिक यांचा प्रतिसाद परीक्षांना मिळतो. शालेय विद्यार्थ्यांबरोबरच या परीक्षा देणाऱ्यांमध्ये शिक्षक, पत्रकार, लेखक, प्रवचनकार यांचा समावेश असतो; आणि वयाचा विचार करायचा तर बारा वर्षांपासून ते ब्याऐंशी वर्षांपर्यंतचे 'विद्यार्थी' ही परीक्षा देतात. गेल्या वर्षी २००९ मध्ये दत्तात्रय कारभारी पाटील हे ७५ वर्षांचे गृहस्थ विशारद परीक्षा उत्तीर्ण झाले.

म. सा. प. च्या परीक्षा विभागाचाच एक उपक्रम म्हणून दरवर्षी एक मार्गदर्शन मेळावाही आयोजित करण्यात येतो. ह्या मेळाव्याचे आयोजन करण्यामागे केवळ म.सा.प.च्या परीक्षांना बसणारे विद्यार्थी आणि त्यांना शिकवणारे शिक्षक यांना मराठी भाषेच्या तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन करावे एवढाच माफक हेतू नसतो; तर एकूण माध्यमिक शाळांमध्ये मराठी शिकवणारे शिक्षक, मराठी भाषेचे अभ्यासक व साहित्यप्रेमी यांना एकत्रित आणून मराठी भाषेचे अधिक ज्ञान व्हावे, मराठीचे व्याकरण समजावून द्यावे व मराठीतील काही वाङ्मयप्रकारांच्या वैशिष्ट्यांची चर्चा करावी असा उद्देश असतो. पुण्यातील व पुण्याबाहेरील माध्यमिक शाळा, वृत्तपत्रे यांना निवेदने पाठवून या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी अभ्यासकांना आवाहन करण्यात येते.

यावर्षी शनिवार, दि. ७ ऑगस्ट २०१० ला परीक्षा विभागाचा हा मार्गदर्शन मेळावा शिक्षक, प्राध्यापक व मराठी अभ्यासकांच्या उपस्थितीत म.सा.प.च्या माधवराव पटवर्धन सभागृहात पार पडला, या मेळाव्याच्या अध्यक्षपदी पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातील प्राध्यापिका डॉ. विद्यागौरी टिळक होत्या. दुपारी १२.३० ते ४.३० या चार तासांत सहा व्याख्यात्यांनी मराठी भाषेचे व्याकरण, बातमीलेखन, नाटक, ललितगद्य हे वाङ्मयप्रकार, उपयोजित मराठी, श्यामची आई पुस्तकाचे अध्यापन मराठीतील म्हणी व वाक्प्रचारांचे महत्त्व अशा विविध विषयांवर व्याख्यानातून चर्चा केली. तसेच प्रत्येक व्याख्यानानंतर श्रोत्यांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन केले.

मेळाव्याचे औपचारिक उद्घाटन करताना डॉ. वि. भा. देशपांडे म्हणाले, 'महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मराठीच्या परीक्षा एके काळी खूप महत्त्वाच्या व मानाच्या समजल्या जात. मीही साहित्य प्राज्ञ व साहित्य विशारद या परीक्षा दिल्या आहेत. जागतिकीकरणामुळे इंग्रजीचे महत्त्व वाढले. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुले जातात. त्यामुळे मराठीच्या परीक्षा बसणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले. पण या परीक्षा शिक्षक, पत्रकार, लेखक यांनी जरूर द्याव्यात, मराठी भाषेत इतर भाषांची सरमिसळ करून तरुणपिढी संभाषण लेखन करते ते टाळले पाहिजे.'

'श्यामच्या आईचे अध्यापन' या विषयाने प्रत्यक्ष चर्चेस प्रारंभ झाला. मॉडर्न हायस्कूल, पुणे येथे अध्यापन करणाऱ्या नीता घोरपडे यांनी 'श्यामची आई' हे पुस्तक वाचताना श्यामच्या जीवनातील विविध प्रसंगाशी विद्यार्थी समरस होतात; असा स्वानुभव सांगून शिक्षकांनी स्वतः त्या पुस्तकातील महत्त्वाच्या घटना निवडून विद्यार्थ्यांना त्या त्यांच्या शब्दांत लिहिण्यास किंवा ऐकण्यास सांगाव्यात. म्हणजे विद्यार्थ्यांच्या मनावर मूल्यसंस्कार प्रभावीपणे होतील असे प्रतिपादन केले.

प्रा. अरुणा महाळंक यांनी मराठी भाषेचे सौंदर्य म्हणी व वाक्प्रचारांमुळे वाढले आहे असे सांगून मराठीतील विविध अलंकारांप्रमाणे म्हणी, वाक्प्रचार हे भाषेचे अलंकारच आहेत, शिक्षकांनी वेळीच वाक्प्रचार म्हणींचे अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगावेत, अन्यथा मुलांना

अनुक्रमणिका

म्हणी, वाक्प्रचार यांचा भाषेत वापर अचूकपणे करता येत नाही; असे स्पष्ट केले. वाक्प्रचारातील शब्दयोजना आणि अर्थ यात फरक असतो. जसाच्या-तसा अर्थ घेतल्यास घोटाळा होतो; हे विद्यार्थ्यांना समजले पाहिजे हे स्पष्ट करताना 'जमदग्नी' म्हणजे केवळ ऋषींचे नाव नव्हे; तर कोपिष्ट माणूस. हे विद्यार्थ्याला समजायला हवे व त्यासाठी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ समजावून दिला पाहिजे असे म्हटले. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी म्हणी, वाक्प्रचार यांचा अर्थ स्पष्ट करताना, शिक्षकांनी उदाहरणांवर भर द्यावा व अर्थ स्पष्ट करताना शब्दाशी संलग्न अशी एखादी गोष्ट, माहिती, सांगितल्यास विद्यार्थ्यांना ते अचूक समजेल; हे स्वानुभवावरून सांगितले.

प्रा. सुजाता शेणई यांनी 'उपयोजित मराठी' वर बोलताना म्हटले की, अर्ज लिहिणे, पत्रलेखन या गोष्टीही हल्ली विद्यार्थ्यांना जमत नाहीत; कारण संगणकामुळे त्यांना फॉमॅट मिळतो व त्याच पद्धतीने अर्ज केला जातो. त्यात स्वतःची ओळख स्पष्ट होत नाही. पत्रलेखनाची तर सध्याच्या पिढीला गरजच वाटत नाही; कारण दूरभाष, भ्रमणभाष व 'इ-मेल' यामुळे प्रत्यक्ष लेखनाची आवश्यकता राहिलेली नाही. म्हणूनच काळानुसार उपयोजित मराठी शिकवताना अध्यापकाने नव्या शिक्षणपद्धतींचा वापर केला पाहिजे. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश देतानाच स्वतःचा इमेल आयडी असणे बंधनकारक केले पाहिजे.

प्रा. सुजाता शेणई यांच्या व्याख्यानानंतर डॉ. वि. भा. देशपांडे यांनी विचारले, "खेड्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना 'इमेल आयडी' करणे, संगणक हाताळणे जमते का ?" त्यावर शिक्षकांनीही या चर्चेत उत्साहाने भाग घेतला. संगणक म.न.पा.च्या शाळा, खेड्यांमधील शाळा या सर्वच ठिकाणी शिकविला जात असल्याने आजच्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांला संगणक सहज हाताळता येतो, यावर सर्वांचे एकमत झाले. संगणक हा सध्याच्या शिक्षणातील एक अविभाज्य घटक आहे; असा निष्कर्ष काढण्यात आला.

फर्ग्युसन महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. रेखा देशपांडे यांनी नभोवाणी, चित्रवाणी व प्रसारमाध्यमातील बातमीलेखन व वृत्तपत्रांसाठीचे बातमीलेखन यातील भेद स्पष्ट करून बातमीलेखनासाठी अभ्यासापेक्षा सराव आणि अनुभव अधिक महत्त्वाचा असतो असे प्रतिपादन केले. प्रसारमाध्यमे अनेकदा एकच बातमी पुन्हा पुन्हा वेगवेगळ्या पद्धतीने देतात. कारण त्यांना श्रोत्यांची 'नस' सापडलेली असते. बातमीचे महत्त्व, बातमी दृश्य असल्यास, तिचा परिणाम अधिक होतो. म्हणून दूरदर्शनवर बातम्या पाहणाऱ्यांची संख्या अधिक आहे असे त्यांनी म्हटले. प्रा. देशपांडे यांच्या व्याख्यानानंतर म.सा.प.च्या कार्यवाह स्वाती महाळंक यांनी हा विषय श्रोत्यांना अधिक स्पष्ट व्हावा, आकलनसुलभ व्हावा यासाठी स्वतःचे वृत्तनिवेदक म्हणून आकाशवाणीवरील तसेच बातमीलेखक म्हणून वृत्तपत्रांमधील अनुभव सांगताना म्हटले की unusual event म्हणजे न्यूज. जेव्हा नेहमीपेक्षा वेगळे काही घडते, तेव्हा त्याची बातमी होते. ही बातमी वाचकांचे लक्ष वेधून घेईल अशाच पद्धतीने सांगणे आवश्यक असते, म्हणून वृत्तपत्रांमधील बातमीच्या पहिल्या तीनचार ओळी ठळक टाईपात असतात व नंतर त्याखाली ती बातमी विस्ताराने दिलेली असते. माध्यम कोणतेही असो, बातमी लेखनाची किंवा सांगण्याची पद्धत श्रोत्यांचे किंवा वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी आकर्षक असलीच पाहिजे. नेमक्या शब्दात बातमीचा आशय व्यक्त करणे कौशल्याचे काम आहे व नभोवाणी व दूरदर्शनवर वेळेचे बंधन खूपच काटेकोरपणे सांभाळावे लागते. त्यामुळे नेमकी बातमी काय आहे व ती कशी सांगितल्यास प्रभावी होईल, हे वृत्तनिवेदकाला आधीच ठरवावे लागते. हे कौशल्याचे काम आहे, असे मत व्यक्त केले.

यानंतर डॉ. मधुरा कोरान्ने या नाटक-एक वाङ्मय प्रकार यावर बोलताना म्हणाल्या की नाटक हा दृश्य व श्राव्य असा संमिश्र वाङ्मय प्रकार आहे. नाट्यलेखकाला या दोन्ही माध्यमांचा विचार करावा लागतो, नाटक जुने असो की नवे, ऐतिहासिक असो, की सामाजिक. मानवी मनाचा शोध हाच हेतू नाट्यलेखनामागे असतो. माणसाचे मन महत्त्वाचे असते. ते बदलत नाही. माणसाच्या ठिकाणी असलेल्या मूलभूत भावना कुठेही गेलात तरी त्याच असतात, राग, लोभ, असूया इत्यादी भावना कोणत्याही काळात मानवी मनात अस्तित्वात असतातच. हे मनच माणसाकडून हवी ती कृती करून घेते व नाटकात माणसाच्या मनाला महत्त्वपूर्ण स्थान असते कारण

भावभावनांच्या खेळातूनच नाट्याचा जन्म होतो.

डॉ. मधुरा कोरान्ते यांच्यानंतर डॉ. उज्ज्वला गोखले यांनी 'ललिगद्य एक वाङ्मय प्रकार यावर बोलताना 'ललितगद्य' लेखनात काळानुरूप होत गेलेला बदल स्पष्ट करून चिपळूणकरांच्या काळातील वैचारिक निबंधाची जनजागृतीची उद्दिष्टे, ना. सी. फडके, खांडेकर यांच्या काळात वैचारिक निबंधाला आलेले लघुनिबंधाचे रूप इत्यादींचा मागोवा घेऊन मराठीतील दुर्गा भागवत, म. ना. अदवत, काकासाहेब कालेलकर, इत्यादीचे लघुनिबंध व आजचे याच लघुनिबंधांचे 'ललितगद्य' हे स्वरूप यातील फरक विस्ताराने विशद केला. विषय आशय यामध्ये तर बदल झाला आहेच पण ललितगद्याची विषयांची व्याप्ती, शब्दसंख्या यामध्येही बदल झाल्याने आज ललितगद्य भारदस्त नसून एक हलकाफुलका वाङ्मयप्रकार झाला आहे; व हे फारसे सुखावह नाही असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. विद्यागौरी टिळक यांनी मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी म.सा.प.तर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या उपक्रमाचे महत्त्व विशद करून या परीक्षांचे स्वरूप बदलावे, पाठ्यपुस्तके काळाचा विचार करून नेमली जावीत. असा विचार व्यक्त केला.

'श्यामची आई' या पुस्तकावर श्रोतृवर्गात जी चर्चा झाली होती, ती लक्षात घेऊन डॉ. टिळक म्हणाल्या की, मूल्यांचा विचार महत्त्वाचा आहे. साहित्याचा परिणाम कोवळ्या मनावर अधिक होतो म्हणून वाचनाची आवड मुलांमध्ये जोपासण्याचे प्रयत्न शिक्षक व पालक दोहोंनीही करायला हवेत. नाट्यलेखन व नाटकातील भूमिका वटवणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. कायिक हालचाली, शब्दफेक यांना नाटकात खूप महत्त्व असते पण नाटक वाचून समजून घेताना फक्त वाङ्मयप्रकार म्हणूनच त्याचा विचार व्हावा.

मराठी भाषा शिकण्याकडे आजच्या विद्यार्थीवर्गाचा कल नाही. नोकरीच्या संधीचा विचार करून हुशार मुले कलाशाखेकडे वळत नाहीत. याविषयी श्रोते व व्याख्याते यामध्ये बरीच चर्चा झाली. काही पर्याय सुचवण्यात आले. नवनवीन क्षेत्रे उपलब्ध असून दूरदर्शनवरील मराठी शुद्ध असायला हवी, ती का असत नाही यावरही सुधा कांबळे, अपर्णा आंबेडकर, डॉ. चिंगरे इत्यादींनी आपली मते व्यक्त केली.

एकूण 'मराठी' हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय असल्याने चार तासांचा अवधीही मेळाव्यास अपुरा वाटला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी केले.

दीपक करंदीकर यांनी आभार प्रदर्शन केले. ❖❖❖

डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी
कार्यवाह , म.सा.प., पुणे

नवे आजीव सभासद

१७४) देसाई जगताप रुपा, अंबरनाथ
१७५) पाटील दिगंबर दगडू, जामनेर
१७६) शिंदे जयवंत रामचंद्र, मोशी
१७७) सोनजे कमल उत्तमराव, चिंचवड
१७८) गुंजोटे नंदकिशोर रघुनाथराव, चिंचवड
१७९) गावडे गणेश सखाराम, तळवड
१८०) तापकीर राजेंद्र अण्णा, दिघी
१८१) वेसणेकर विनोद, आकुर्डी
१८२) सोनवणे महेश श्यामसुंदर, निगडी
१८३) औसरे शंकर देवराम, चिंचवड
१८४) वाठारकर सांबाजी रामचंद्र, चिंचवड
१८५) कोले सरोज प्रकाश, चिंचवड
१८६) आपटे नूतन उदय, निगडी
१८७) बेल्हेकर चंद्रकांत रामचंद्र, देहुरोड
१८८) पालेकर विकास शिवाजी, रावेत
१८९) शिंदे संतोष तुकाराम, रावेत
१९०) वाबळे हनुमंत कृष्णा, चिंचवड
१९१) रोकडे नंदकिशोर कचेश्वर, चिंचवड
१९२) नाईक मानसिंगराव फत्तेसिंगराव, चिखली
१९३) नाईक अमरसिंग फत्तेसिंगराव, चिखली
१९४) पाटील एस. आर., चिखली
१९५) दुकळे पी. एम., चिखली
१९६) हिरेमठ एम. एम., चिखली
१९७) चिंदगे एस. पी., चिखली
१९८) जोखे एन. व्ही.,, चिखली
१९९) तडाखे डी. एच., मांगले
२००) पाटील डी. आर., चिखली
२०१) पाटील प्रविणसिंग वसंतराव, शिराळ
२०२) पाटील संजय आत्माराम, इस्लामपूर
२०३) पाटील आनंद चंदू, कोकरूड
२०४) परीट बाबासाहेब अण्णा, बिलशी
२०५) कुंभार अशोक मारूती, कातोळी
२०६) घोडे संजय चंद्रकांत, कोकरूड
२०७) ऊथळे सुजाता शामराव, शिराळ
२०८) गायकवाड दिलीप आकाराम, शिराळ
२०९) भालेकर संतोष, शिराळ
२१०) पाटील वसंत तुकाराम, शिराळ
२११) नलवडे सुभाष शंकर, शिराळ
२१२) पाटील इंदुताई भीमराव, शिराळ
२१३) जोशी ज्योती जगन्नाथ, शिराळ
२१४) शेटे आदिनाथ, सांगावी
२१५) गावडे आनंदा, चिखली
२१६) मोमीन दिलावर रसुल, शिराळ
२१७) मिरजकर महेश अरुण, रिळे
२१८) जाधव बाजीराव आनंदा, चिंचोळी
२१९) वाघ सुखदेव मारूती, इस्लामपूर
२२०) चरापले शिवाजी बापू, शिराळा
२२१) राठोड विनोद देवचंद, शिराळा
२२२) काटे अनिल काशिनाथ, शिराळा
२२३) बनसोडे राजेंद्र बापू, शिराळा
२२४) गावडे काशीलिंग रघुनाथ, शिराळा
२२५) मिरजकर शरद ज्ञानदेव, शिराळा
२२६) कुंभार अर्जुन लक्ष्मण, मांगले
२२७) पवळ शामराव परशुराम, शिराळा

अनुक्रमणिका

कार्यवृत्त (१ जून २०१० ते ३१ ऑगस्ट २०१०)

डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह

१२ जून २०१० : पु. ल. देशपांडे स्मृतिदिन :

महाराष्ट्र साहित्य परिषद आयोजित डॉ. मधुसूदन बोपर्डीकर आणि त्यांचे सहकारी यांनी 'माझे जीवन गाणे', 'पुलं आणि त्यांचे सांगीतिक जीवन' याविषयावर संगीतमय सादरीकरण झाले. कार्यवाह मिलिंद जोशी यांनी स्वागत प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. डॉ. माधवी वैद्य व ह. ल. निपुणगे यांच्या हस्ते ज्ञानेश्वरीची प्रत व फूल देऊन डॉ. मधुसूदन बोपर्डीकर आणि श्रीकांत जोशी (सूत्रसंचालक) पवन नाईक, हर्षद भावे, सानिका गोरेगांवकर या कलावंतांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

दि. २३ जून २०१० : कॉफीक्लब :

ज्येष्ठ पत्रकार, संपादक, लेखक श्री. अरुण खोरे यांच्याशी गप्पा झाल्या. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी कॉफीक्लब उपक्रमासंबंधी निवेदन केले. उपस्थित सभासदांनी खोरेंना अनेक प्रकारचे प्रश्न विचारले. खोरेंनी त्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली.

दि. ५ जुलै २०१० : श्रद्धांजली सभा :

थोर वक्ते, विचारवंत व परिषदेचे माजी उपाध्यक्ष, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांना श्रद्धांजली वाहिली. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी सभेचे प्रास्ताविक व संचालन केले. या सभेत अनेक वक्त्यांनी श्रद्धांजलीपर भाषणे केली. त्यात जयराम देसाई, असनीकर, दिगंबर देशपांडे, मधू नेने, ऊर्मिला आपटे, सागर देशपांडे, श्याम भुर्के, डॉ. प्र. ल. गावडे, उद्धव कानडे, डॉ. प्र. चिं. शेजवलकर, राजदत्त, डॉ. नीलिमा गुंडी, सुनिती- राजे पवार, सहस्रबुद्धे, योगेश पाटील, उल्हासदादा पवार, प्रा. मिलिंद जोशी, अध्यक्षीय समारोप प्रा. द. मा. मिरासदार यांनी केला. शेवटी प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी शोक प्रस्तावचे वाचन केले. उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

दि. ६ जुलै २०१० : म. सा. पत्रिका प्रकाशन म. सा. पत्रिका अंक ३३३ चे प्रकाशन :

पत्रिकेच्या ३३३ व्या 'संगीत नाटक विशेषांका'चे प्रकाशन प्रसिद्ध संगीत रंगभूमी कलावती कीर्ती शिलेदार यांच्या हस्ते झाले. प्रथम मृदुला अडावदकर यांनी गणेशस्तवन सादर केले. 'संगीत मानापमानच्या शताब्दीनिमित्त पत्रिकेचा हा संगीत नाटक विशेषांक खास तयार करण्यात आला आहे. पत्रिकेचे संपादक डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख कार्यवाह माधवी वैद्य यांनी कीर्ती शिलेदार यांना हृद्य परिचय करून दिला. डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या हस्ते कीर्ती व दीप्ती या भगिनींचा 'पुस्तक' भेट देऊन सत्कार-स्वागत केले. विशेषांकाचे प्रकाशन कीर्ती शिलेदार यांच्या हस्ते झाले. यानंतर कीर्ती शिलेदार यांनी आपले विचार प्रकट केले. याचप्रसंगी मसाप अंबरनाथ शाखेचे प्रा. अरुण मैड यांनी संपादित केलेला 'कलाकौस्तुभ' हा ग्रंथ परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांच्याकडे समारंभपूर्वक सुपूर्द करण्यात आला. शेवटी डॉ. देशपांडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यवाह स्वाती महाळंक यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. किसन पाटील यांनी आभार प्रदर्शन केले. शेवटी मृदुला अडावरकर यांनी पसायदान गायिले.

दि. ९ जुलै २०१० : कै. प्रा. सोनोपंत दांडेकर पुरस्कार वितरण सोहळा :

कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे यांनी प्रास्ताविक केले. माजी कार्याध्यक्ष डॉ. म. वि. गोखले यांनी मसापकडे भरीव रकमेची देणगी दिली आहे. त्यातूनच कै. मामा दांडेकर यांच्या नावे रु. १०,०००/- चा रोख पुरस्कार यंदाच्या वर्षीपासून 'तत्त्वज्ञान' विषयक ग्रंथास दिला आहे. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी निवेदन केले. पहिला पुरस्कार ज्येष्ठ समीक्षक प्रा. के. रं. शिरवाडकर यांच्या 'आपले विचार विश्व' या ग्रंथास डॉ. गो.बं. देगलूरकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ. म. वि. गोखले यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. शिरवाडकर यांनी पुरस्काराबद्दलचे मनोगत व्यक्त केले. यानंतर डॉ. कल्याणी नामजोशी यांनी विचार प्रकट केले. डॉ. देगलूरकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यवाह स्वाती महाळंक यांनी सूत्रसंचालन केले व डॉ. माधवी

अनुक्रमणिका

वैद्य यांनी आभार मानले.

दि. ११ जुलै २०१० : थोर लेखक कै. जी. ए. कुलकर्णी जयंती :

जी. ए. कुलकर्णी यांच्या भगिनी नंदा पैठणकर व कुलकर्णी यांचे कुटुंबिय यांनी दिलेल्या देणगीतून यंदाच्या वर्षीपासून हा कार्यक्रम सुरू झाला. प्रा. द. मा. मिरासदार अध्यक्षस्थानी होते. डॉ. विलास साळुंखे यांच्या 'जर्नी फॉर एव्हर' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. जी. एं.च्या १४ कथांचे इंग्रजीत भाषांतर केलेल्या ह्या पुस्तकाचे ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. 'जी. ए. कुलकर्णी आणि मी : एक संवाद चित्रकलेविषयी' या विषयावर रवी परांजपे ह्यांनी आपले विचार प्रकट केले. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे, प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य व कोषाध्यक्ष श्री. निपुणगे ह्यावेळी उपस्थित होते. नंदा सुर्वे यांनी सूत्र संचालन केले व आभार मानले.

दि. १७ जुलै २०१० : नवं कोरं :

परिषदेच्या ह्या अभिनव उपक्रमांतर्गत भारती पांडे अनुवादित 'द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स' ह्या पुस्तकावर चर्चा आयोजित करण्यात आली. भारती पांडे यांनी अनुवादामागची भूमिका सांगितली. चर्चेत मृणालिनी चितळे व प्रा. रंजना फडके यांनी भाग घेतला. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

दि. ३० जुलै २०१० : संत सावतामाळी स्मृतिदिन :

वैष्णवी भक्ती मंडळ, पुणे यांच्या वतीने 'नवविधा भक्ती' या विषयावर एक आगळावेगळा कार्यक्रम यंदा आयोजित करण्यात आला. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले व श्री. अनंत जोशी यांनी आभार मानले. या कार्यक्रमात परिषदेच्या ग्रंथालयातील शोभना कुलकर्णी आणि मीनाक्षी केळकर या दोन कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता.

दि. ७ ऑगस्ट २०१० : परीक्षा विभाग : मार्गदर्शन मेळावा :

मराठी विषयाच्या अध्यापनाच्या संदर्भात सहभागी झालेल्या शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींना, मराठी विषयातील तज्ज्ञ प्राध्यापक व शिक्षक, यांनी मार्गदर्शन केले. प्रपाठक, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ डॉ. विद्यागौरी टिळक या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी होत्या. उद्घाटक या नात्याने परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी विचार प्रकट केले. परिषदेच्या परीक्षा विभागप्रमुख डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी अध्यक्ष व उपस्थितांचे स्वागत व मेळाव्याचे प्रास्ताविक केले. त्यानंतर नीता घोरपडे यांना प्रथमा परीक्षेसाठी असलेल्या 'श्यामची आई' यानंतर प्रा. अरुणा महाळंक यांनी 'म्हणी, वाक्प्रचार' याविषयी 'उपयोजित मराठी' या विषयावर प्रा. सुजाता शेणई, डॉ. रेखा देशपांडे यांनी 'नभोवाणी, चित्रवाणी प्रसार माध्यमातील बातमी लेखन' या विषयावर आपापले विचार प्रकट केले. तसेच नाटक : एक वाङ्मय प्रकार या विषयावर डॉ. मधुरा कोरान्ने यांनी आपले विचार प्रकट केले. डॉ. वसुधा गोखले यांनी 'ललित गद्य : एक वाङ्मय प्रकार' या विषयावर आपले विचार प्रकट केले. अध्यक्षीय समारोप डॉ. विद्यागौरी टिळक यांनी केला. दीपक करंदीकर यांनी आभार मानले. प्रत्येक विषयावरील भाषणानंतर उपस्थितांनी आपल्या मनातील प्रश्न विचारून चर्चेत सहभागी झाले. मेळाव्याच्या प्रारंभी प्रा. स. ह. देशपांडे, सतीश वहादूर आणि मोहन तोंडवळकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दि. १४ ऑगस्ट २०१० : कै. डॉ. गं. ना. जोगळेकर व कै. रा. श्री. जोग स्मृती पुरस्कार वितरण समारंभ :

स्वागत व सूत्रसंचालन प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी केले. अध्यक्ष डॉ. प्र. ल. गावडे, डॉ. सुमन बेलवलकर व डॉ. कृ. श्री. अर्जुनवाडकर या तिघांचा हृद्य परिचय मधू नेने यांनी करून दिला. डॉ. गावडेंचा सत्कार कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे, डॉ. उज्ज्वला जोगळेकर यांचा सत्कार प्रा. मिलिंद जोशी व पराग जोगळेकर यांचे स्वागत डॉ. सतीश देसाई यांनी त्यांना पुस्तकाची प्रत भेट देऊन केले. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. यानंतर डॉ. गावडे यांच्या हस्ते डॉ. सुमन बेलवलकर व श्री. दळवी (परचुरे प्रकाशनाचे प्रतिनिधी) यांना रा. श्री. जोग पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. बेलवलकर यांनी मनोगत व्यक्त केले. पराग जोगळेकर यांनी डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्याविषयी काही आठवणी सांगितल्या यानंतर डॉ. गावडे यांच्या हस्ते डॉ. कृ. श्री. अर्जुनवाडकर यांना कै. डॉ. गं. ना. जोगळेकर पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ.

अर्जुनवाडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. सौ. लीला अर्जुनवाडकर यांनी उत्स्फूर्तपणे मनोगत व्यक्त केले. त्यानंतर डॉ. गावडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कोषाध्यक्ष श्री. ह. ल. निपुणगे यांनी आभार मानले.

दि. १६ ऑगस्ट २०१० : कै. डॉ. गं. ना. जोगळेकर स्मृतिदिनानिमित्त उत्तरार्धाचा कार्यक्रम :

डॉ. शोभा अभ्यंकर आणि त्यांचे सहकारी यांनी 'मराठी भावगीतांचे अंतरंग' हा विवेचन व प्रत्यक्ष सादरीकरण अशा तऱ्हेने साजरा केला गेला. प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा सत्कार करण्यात आला. तसेच सन्माननीय उपस्थिती म्हणून संगीत क्षेत्रातील डॉ. विकास कशाळकर यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. मधुवंती दांडेकर, शैला दातार इत्यादी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. कुमार करंदीकर, श्रुती करंदीकर, मानिनी गुर्जर, नीलिमा राडकर, अरुण गवई, स्वराली जोशी, ह्यानी कार्यक्रमात सहभाग घेतला.

कार्यवृत्त नोंद : **दीपक करंदीकर,**
स्वीकृत सदस्य, मसाप, पुणे

❖❖❖

सोलापूर शाखा

२७ फेब्रुवारी २०१० : कुसुमाग्रज जयंती :

प्रा. श्रुती वडगबाळकर यांचे व्याख्यान झाले. तसेच अरविंद जोशी यांचेही भाषण झाले. स्वागत व प्रास्ताविक बाबुराव मैंदर्गीकर, सूत्रसंचालन डॉ. व्यंकटेश नुले व आभार प्रदर्शन शोभना सागर यांनी केले.

२२ मार्च २०१० : महिला दिनानिमित्त काव्यलेखन स्पर्धा :

या स्पर्धेत ४३ महिलांनी भाग घेतला. दत्ता हलसगीकर व प्रा. डॉ. सुहास पुजारी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. सूत्रसंचालन सीमा होसुरकर व आभार प्रेमचंद मेने यांनी मानले. नारायण कुलकर्णी परीक्षक होते.

३१ मे २०१० : प्रा. ग. प्र. प्रधान यांना श्रद्धांजली :

वाहण्यात आली. प्रा. डॉ. सुहास पुजारी, मैंदर्गीकर, येळेगावकर इत्यादींनी श्रद्धांजलीपर भाषणे केली.

४ जुलै २०१० :

प्रा. शिवाजीराव भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा घेण्यात आली. दत्ता हलसगीकर, श्रीकांत येळेगावकर, डॉ. पुजारी, मैंदर्गीकर यांची भाषणे झाली.

कार्यवाह

पाथर्डी शाखा

१७ जुलै २०१० : श्रद्धांजली :

स्व. प्रा. शिवाजीराव भोसले यांना श्रद्धांजलीपर सभा आयोजित करण्यात आली. ग्रामीण साहित्यिक कैलास दौंड यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी बाळासाहेब चिंतामणी होते. अविनाश मंत्री, दिलीप सरसे, प्रा. व्यवहारे, डाळीम्बकर, हुमायुन आतार, अरविंद बहुळे यांनी सुद्धा विचार व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. दीपक पावसे व सूत्रसंचालन विष्णुपंत पवार यांनी केले.

कार्यवाह

❖❖❖

ठाणे शाखा

८ ऑगस्ट २०१० :

ठाणे शाखेच्या ३१व्या वर्धापनदिनानिमित्त 'कविवर्य बोरकरांची प्रेमकविता' या विषयावर प्रा. प्रवीण दवणे यांचे व्याख्यान झाले.

कार्यवृत्त नोंद :

दीपक करंदीकर — **डॉ. माधवी वैद्य**
स्वीकृत सदस्य, मसाप, पुणे — प्रमुख कार्यवाह

❖❖❖

नवे आजीव सभासद

२२९) हसवनीस दिनेश, शिराळ
२३०) दुवळे ऊर्मिला, शिराळ
२३१) नलवडे विजयराव बळवंतराव, शिराळ
२३२) कुंभार कल्पना शिवाजी, शिराळा
२३३) अत्तार दस्तगीर गुलाब, शिराळा
२३४) शेटे सचिन चंद्रकांत, शिराळा
२३५) जाधव अजय भाऊसाहेब, शिराळा
२३६) पाटील अशोक सखाराम, शिराळा
२३७) महाजन सुमंत, शिराळा
२३८) पावले विष्णू नारायण, पातलेवाडी
२३९) पाटील सर्जेराव जगन्नाथ, बिलाशी
२४०) शिंदे प्रभा रामचंद्र, मांगले
२४१) पाटील एस. एन., कोकरूड
२४२) काळे माधव नारायण
२४३) सौ. काळे अरूंधती माधव

❖❖❖

अनुक्रमणिका

Maharashtra Sahitya Patrika. Quarterly : July to September 2010
Registered with the register of Newspaper for India under No. 6398/57



प्रेषक
प्रमुख कार्यवाह,

बुक–पोस्ट

महाराष्ट्र साहित्य परिषद

टिळक रस्ता, पुणे–४११०३०.

अनुक्रमणिका